रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड | शुक्रवार । दि. १९ जून २०२६ । अंक १३ । पृष्ठे १२ । किंमत ४₹ | । आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## घरफोडीतील तीन आरोपी जेरबंद

**पनवेल :** तळोजा पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाने घरफोडी चोरीच्या गुन्ह्यांचा यशस्वी तपास करत तीन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून सुमारे ७ लाख २५ हजार रुपयांचा चोरीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या कारवाईमुळे तळोजा परिसरातील दोन घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. तक्रारदाराच्या तळोजा परिसरातील गोदामाच्या मागील बाजूस असलेली कंपाऊंडची भिंत फोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश केला होता. त्यानंतर गोदामातील क्रेन मशिनमध्ये बसविण्यात आलेले इलेक्ट्रॉनिक पान २ वर

## अवैध दारू विरोधातील मोहीम तीव्र

**नागोठणे:** गावठी दारूची केंद्रे समूळ उच्चाटन करण्यासाठी नागोठणे पोलिसांकडून गावठी हातभट्टीची शोधमोहीम व छापा सत्र सुरूच आहे. याचाच एक भाग म्हणून नागोठण्याजवळील वाघ्रणवाडी जंगल परिसरातील गावठी दारूची हातभट्टी उद्ध्वस्त करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वाघ्रणवाडी जंगल परिसरामध्ये अवैधरित्या दारू निर्मिती करून विक्री करता बाळगली जात आहे, अशी माहिती नागोठणे पोलिसांना मिळाली होती. त्यानंतर रोहाचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रसाद गोकुळे, सपोनि सचिन कुलकर्णी, पान २ वर

### वेधक

## म्हसळ्यातील दारू अड्ड्यांवर धाड



**म्हसळा :** पुणे येथे विषारी गावठी दारू प्राशनामुळे २५ जणांचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर राज्यभरात गावठी दारू निर्मितीविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम तीव्र केली आहे. त्याच पार्श्वभूमीवर म्हसळा पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे यांच्या नेतृत्वाखाली खामगाव आदिवासीवाडी येथे धडक कारवाई करत दोन गावठी हातभट्टी दारू अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. पान २ वर

## म्हसळ्यातील गुटखा विक्रेत्यावर कारवाई

**म्हसळा :** म्हसळा शहरातील एका पानटपरीवर प्रतिबंधित गुटखा विक्री होत असल्याची माहिती समोर आल्यानंतर म्हसळा पोलिसांनी धाड टाकून गुटखा जप्त केला आहे. तसेच, टपरी चालक प्रीतम धिमर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे त्याच्या भावावर यापूर्वीही अशाच प्रकारची कारवाई करण्यात आली होती.

दिघी नाका येथील पोलीस चौकीसमोरील पानटपरीवर एका ग्राहकाला गुटखा विक्री करण्यात आला. मात्र, दुसऱ्या ग्राहकाला गुटखा देण्यास नकार दिल्याने ग्राहक व टपरी चालक यांच्यात वाद निर्माण झाला. या वादानंतर संबंधित ग्राहकाने पान २ वर

## अहमदाबादमधील विद्यार्थ्याची आत्महत्या

अहमदाबाद : गुजरातच्या अहमदाबादमधून एक दुःखद घटना समोर आली आहे. दि.२१ जून रोजी होणाऱ्या नीट पुनर्परीक्षेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये वाढ होत आहे. कोईम्बतूरच्या १९ वर्षीय अनुकृत्नाच्या मृत्यूनंतर आता अहमदाबादमधील एका १७ वर्षीय विद्यार्थ्याने आत्महत्या केली आहे. नीट पुनर्परीक्षेच्या अवघ्या तीन दिवस आधी, त्या मुलाने तो राहत असलेल्या निवासी इमारतीच्या सहाव्या मजल्यावरून उडी मारली. जखमी मुलाला स्थानिक रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

## तळाला पोहोचले धरणाचे पाणी

# रायगडात पाणीबाणी

### पाऊस लांबला; धरणांमधील साठा घसरला

**अवघे पंधरा दिवस पुरेल इतकेच पाणी**



(संग्रहित छायाचित्र)

**28 धरणांमध्ये केवळ 13.287 एमसीएम पाणी**

**ठळक आकडेवारी**

| एकूण धरणे | एकूण साठवण क्षमता | उपलब्ध पाणीसाठा | जिल्ह्याचा सरासरी उपयुक्त साठा | टँकर फेऱ्या |
|---|---|---|---|---|
| 28 | 68.515 एमसीएम | 13.287 एमसीएम | 19.39 टक्के | 78 |

**राकेश लोहार**
**। चौल ।**

रायगड जिल्ह्यावरील मान्सूनचे ढग गायब झाले असून, जलसंकटाचे काळे ढग अधिकच गडद झाले आहेत. परिणामी, धरणांतील पाणीसाठा धोक्याच्या पातळीवर घसरला असून, तो जेमतेम पुढील १५ दिवसच पुरेल, अशी धक्कादायक माहिती जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. अनेक ठिकाणी विहिरींनी तळ गाठला आहे. नद्या-नाले कोरडे पडले आहेत, नैसर्गिक जलस्रोत आटले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना मोठी पायपीट करावी लागत आहे. अशा गंभीर परिस्थितीत जिल्ह्यातील २८ लघु पाटबंधारे प्रकल्पांमध्ये केवळ १३.२८७ दशलक्ष घनमीटर पाणी शिल्लक असून, उपयुक्त साठा अवघ्या १९.३९ टक्क्यांवर आला आहे. परिणामी, अनेक गावांची टँकरवर भिस्त वाढली असून, आगामी काही दिवसांत दमदार पाऊस न झाल्यास परिस्थिती आणखी बिकट होण्याची भीती व्यक्त होत आहे.

रायगड जिल्ह्यातील २८ लघु पाटबंधारे प्रकल्पांची एकूण साठवण क्षमता ६८.५१५ दशलक्ष घनमीटर (एमसीएम) इतकी आहे. मात्र, सध्या या धरणांमध्ये केवळ १३.२८७ एमसीएम पाणी उपलब्ध आहे, अशी माहिती रायगड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता राकेश धाकतोडे यांनी दिली. त्यामुळे जिल्ह्यात पाणीटंचाईची भीषणता किती तीव्र झाली आहे, हे दिसून येते. दरम्यान, अनेक गावांतील पारंपरिक जलस्रोत कोरडे पडल्याने नागरिकांना टँकरच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे. सध्या ७८ पान २ वर

**1** जिल्ह्यातील सर्वाधिक पाणीसाठा सुधागड तालुक्यात असून, कोंडगाव (३.३४१ एमसीएम), घोडवडे (२.७६८ एमसीएम), ढोकशेत (२.६३३ एमसीएम), कवेळे (२.८१७ एमसीएम) आणि उन्हेरे (१.८५९ एमसीएम) या धरणांमध्ये मिळून १३.४१८ एमसीएम पाणी उपलब्ध आहे. खालापूर तालुक्यातील भिलवले (२.१०० एमसीएम), कलोते-मोकाशी (४.१९० एमसीएम) आणि डोणवत (३.६७० एमसीएम) या धरणांमध्ये मिळून ९.९६० एमसीएम साठा शिल्लक आहे.

**2** महाड तालुक्यातील वरंध, खिंडवाडी, कोथुर्डे आणि खैरे या धरणांमध्ये मिळून ८.३७१ एमसीएम, तर श्रीवर्धन तालुक्यातील कार्ले, कुडकी आणि रानिवली धरणांमध्ये मिळून ६.१०६ एमसीएम पाणीसाठा उपलब्ध आहे. तसेच जिल्ह्यातील काही प्रकल्पांमधील पाण्याची टक्केवारी एक अंकी आकड्यावर पोहोचल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे.

**3** दुसरीकडे वावा (५० टक्के), आंबेघर (४१ टक्के), सुतारवाडी (३९ टक्के), भिलवले (३९ टक्के) आणि मोरबे (३७ टक्के) या धरणांमध्ये तुलनेने अधिक पाणी शिल्लक असले तरी जिल्ह्याच्या एकूण परिस्थितीवर त्याचा फारसा परिणाम होत नसल्याचे चित्र आहे.

> सध्याचा उपलब्ध पाणीसाठा विचारात घेतल्यास अनेक योजनांमध्ये जेमतेम १५ दिवस पुरेल इतकेच पाणी शिल्लक आहे. पावसाने लवकर हजेरी लावली नाही तर पाणीकपात करण्याशिवाय पर्याय नाही. आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा वाढविण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा.
> – मोहन सरवदे, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा अधिकारी, रायगड जिल्हा



## बोटींनी तोडलं कांदळवन

### कांदळवन विभाग कुंभकर्णी झोपेत; बेली-आक्षी खाडीत शेकडो बोटींचा विळखा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील बेली आणि आक्षी परिसरातील खाड्यांमध्ये शेकडो बोटी थेट कांदळवनात घुसवून उभ्या केल्याने मोठ्या प्रमाणावर कांदळवनाची हानी झाली आहे. मात्र, हाकेच्या अंतरावर कार्यालय असलेल्या कांदळवन विभागाला हे दृश्य दिसत नाही का, की त्यांनी जाणीवपूर्वक डोळ्यांवर पट्टी बांधली आहे का, असा संतप्त सवाल आता स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. पान २ वर

**कांदळवनाचे महत्त्व काय?**

कांदळवन हे किनारी भागातील नैसर्गिक संरक्षक कवच मानले जाते. समुद्राची धूप रोखणे, जैवविविधतेचे संरक्षण करणे, माशांच्या प्रजननासाठी सुरक्षित अधिवास उपलब्ध करून देणे आणि वादळांच्या तडाख्यापासून किनाऱ्यांचे रक्षण करणे, अशी महत्त्वाची भूमिका कांदळवन बजावते. त्यामुळे कांदळवनाची होणारी हानी ही केवळ पर्यावरणालाच नव्हे तर, मत्स्यव्यवसाय आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही धोकादायक ठरू शकते.

**गुन्हे दाखल होणार का?**

कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण, तोडफोड किंवा पर्यावरणाची हानी झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्याचे अधिकार कांदळवन विभागाकडे आहेत. मात्र, बेली-आक्षी खाडीत शेकडो बोटी कांदळवनात घुसवून उभ्या असतानाही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली दिसून येत नाही. त्यामुळे या प्रकरणातील जबाबदारांवर गुन्हे दाखल होणार की त्यांनाच अभय दिले जाणार, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## उलव्यातील महिला दलालाला अटक

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

उलवा परिसरात अल्पवयीन मुलींना पैशांच्या आमिषाने वेश्याव्यवसायात ढकलल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, या प्रकरणी एका महिला दलालाविरुद्ध गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उलवा पोलिसांनी कारवाई करत आरोपी महिलेला अटक केली असून, न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सेक्टर १९ मधील एका लॉजमध्ये अल्पवयीन मुलींना ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिले जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचण्यात आला. पान २ वर

## प्रांत कार्यालयात लाच लुचपतची कारवाई

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धनयेथीलप्रांतकार्यालयात लाच लुचपत प्रतिबंधक विभाग अलिबाग यांनी धडक कारवाई केली. या कारवाईत दोन लाचखोर कर्मचाऱ्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. यावेळी त्यांना एका शेतकऱ्याकडून ३० हजारांचा हप्ता घेताना पकडण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, म्हसळा तालुक्यातील पाभरे या ठिकाणचा एक शेतकरी आपल्या सातबारा उताऱ्यातील दुरुस्ती करण्यासाठी मागील अनेक दिवसांपासून श्रीवर्धन येथील प्रांत कार्यालयामध्ये फेऱ्या मारत होता. मात्र, अनेक फेऱ्या मारून सुद्धा त्यांचे काम होत नव्हते.



अखेर तेथील कर्मचाऱ्याने हे काम करण्यासाठी ६० हजार रुपयांची लाच या शेतकऱ्याकडे मागितली होती. या लाचेचा पहिला ३० हजारांचा हप्ता देण्यासाठी हा शेतकरी प्रांत कार्यालयात आला होता. ही लाच देण्याच्या अगोदर या शेतकऱ्याने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. यानुसार लाच लुचपत प्रतिबंधक विभाग अलिबाग पान २ वर

## चाणजेत वनजमिनींचा महाघोटाळा

### सरकारी जमीनी विकल्याचा आरोप

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चाणजे परिसरात वनजमीन महाघोटाळ्यामुळे संपूर्ण रायगड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. शासनाच्या मालकीच्या वनजमिनी खासगी व्यक्तींच्या नावावर करून त्या सिडकोला विकण्यात आल्याचा आरोप होत असून, या व्यवहारातून हजारो विकसित प्लॉट, कोट्यवधी रुपयांचा आर्थिक फायदा आणि राजकीय-अधिकारी-दलाल साखळीचा मोठा खेळ उघड होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

चाणजे परिसरातील जमिनींचे भाव विमानतळ, जेएनपीए, अटल सेतू आणि वाढत्या नागरीकरणामुळे सोन्याच्या भावाने वाढले. या सुवर्णसंधीचा फायदा घेण्यासाठी काही भूमाफिया, दलाल आणि भ्रष्ट अधिकाऱ्यांनी थेट वन विभागाच्या जमिनींवरच डल्ला मारल्याची चर्चा आता उघडपणे होऊ लागली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वन विभागाच्या मालकीच्या जमिनींच्या नोंदींमध्ये पान २ वर

## प्रभारी नगराध्यक्षपदी ॲड. मानसी म्हात्रे

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग नगरपरिषदेच्या प्रभारी नगराध्यक्षपदाची धुरा उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांच्याकडे सोपविण्यात आली असून, गुरुवारी (दि.१८) त्यांनी पदभार स्विकारला. यावेळी मानसी म्हात्रे यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.

यावेळी विज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक, ॲड. निलम हजारे, मुख्याधिकारी सागर साळुंखे, पाणी सभापती अनिल चोपडा, महिला व बाल कल्याण उपसभापती ॲड. अश्वीनी ठोसर, नगरसेविका



निवेदिता वाघमारे, ॲड. ऋषीकेश माळी, माजी नगरसेवक अजय झुंजारराव आदी उपस्थित होते.

अलिबाग नगरपरिषदेच्या थेट नगराध्यक्ष अक्षया नाईक आहेत. त्यांनी काही दिवसांसाठी नगराध्यक्ष म्हणून उपनगराध्यक्षा ॲड. मानसी म्हात्रे यांच्याकडे धुरा सोपविली आहे. प्रभारी नगराध्यक्ष म्हणून ॲड. मानसी म्हात्रे यांनी गुरुवारी (दि.१८) सकाळी पदभार स्विकारला. अलिबागचे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान वीज व बांधकाम सभापती प्रशांत नाईक यांच्या प्रमुख उपस्थित प्रभारी नगराध्यक्षपदाची धुरा हाती घेण्यात आली.

## ठाकरेंची सेना पुन्हा फुटली

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

आम आदमी पक्ष, तृणमूल काँग्रेस पाठोपाठ शिवसेना ठाकरे गटाचे खासदार देखील फुटले आहेत. लोकसभेत ठाकरेंचे ९ खासदार असून, ऑपरेशन टायगर लक्षात घेता उद्धव ठाकरेंकडून सर्व खासदारांची बैठक बोलावण्यात आली होती. मात्र, या बैठकीला ९ पैकी केवळ ३ खासदार उपस्थित राहिले. त्यामुळे ठाकरेंची अडचण वाढली असून, गेल्या ३ महिन्यांत ३ पक्षांचे खासदार फुटले आहेत. पान २ वर

**पोलिओमुक्त रायगडसाठी लसीकरण मोहीम | जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण केंद्र**

## पावणे दोन लाख बालकांना पोलिओ लस

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिम राबविण्यात येणार आहे. या अनुषंगाने प्रशासनाने हालचाल सुरु केली आहे. जिल्ह्यामध्ये रविवारी (दि.२८) पोलिओ लसीकरण मोहीम घेण्यात येणार आहे. या मोहिमेद्वारे जिल्ह्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील १ लाख ८९ हजार २७ बालकांना पोलिओ



प्रतिबंधक लस देण्यात येणार आहे. यावेळी एकही बालक लसीकरणापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत.

पोलिओमुळे कायमचे अपंगत्व येते. त्यामुळे पोलिओ मुक्त रायगडसाठी जिल्हा प्रशासनने कंबर कसली आहे. याबाबत जिल्हा स्तरावर उपजिल्हाधिकारी रविंद्र शेळके यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक आयोजित करण्यात आली. यावेळी त्यांनी या मोहिमेबद्दल माहिती दिली.

जिल्ह्यात दि.२८ जून रोजी पोलिओ लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. यावेळी जिल्हाभरात २ हजार ३४१ लसीकरण केंद्र उभारण्यात येणार आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, ग्रामीण रुग्णालये, शहरी आरोग्य केंद्रे, अंगणवाडी केंद्रे तसेच इतर निश्चित ठिकाणी सकाळी ८.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत लसीकरणाची सुविधा उपलब्ध असणार आहे. स्थलांतरित कुटुंबे, बांधकाम कामगारांची वस्ती, वीटभट्ट्या, बसस्थानके, रेल्वे स्थानके तसेच दुर्गम भागांमध्ये विशेष पथकांद्वारे लसीकरणाची व्यवस्था करण्यात आली आहे. दरम्यान, ० ते ५ वर्षे वयोगटातील प्रत्येक बालकाला जवळच्या पल्स पोलिओ बूथवर घेऊन जाऊन पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजावेत आणि पोलिओमुक्त रायगड घडविण्यास सहकार्य करावे, पान २ वर

## भानंग येथे जनसुविधा योजनेत अपहार


### ग्रामस्थांची पंचायत समितीकडे तक्रार

**। तळा । प्रतिनिधी ।**

तळा तालुक्यातील भानंग येथील बौद्धवाडी ते नदीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी जनसुविधा योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या ५ लाख रुपयांच्या निधीचा अपहार झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यासंदर्भात संबंधितांनी पंचायत समितीकडे लेखी तक्रार दाखल करून चौकशीची मागणी केली आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, बौद्धवाडी ते नदीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या विकासकामासाठी जनसुविधा योजनेतून ५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता. मात्र, प्रत्यक्षात कोणतेही काम न करता केवळ बनावट माहितीचा फलक उभारून निधी खर्च झाल्याचे दाखविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाच्या निधीचा गैरवापर करून नागरिकांची फसवणूक झाल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकरणात संबंधित कामाची प्रत्यक्ष पाहणी करून मंजूर निधीचा वापर नेमका कुठे आणि कसा करण्यात आला, याची सखोल पान २ वर

> भानंग ग्रामस्थांच्यावतीने पंचायत समिती कार्यालयात निवेदन देत निधीच्या वापराबाबत पारदर्शकता नसल्याचे सांगितले आहे. तक्रारीची गंभीर दखल घेतली असून, संबंधित अधिकाऱ्याकडे चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.
> – सुनिल गायकवाड, गटविकास अधिकारी, पंचायत समिती तळा



पान १ वरून

## घरफोडीतील तीन आरोपी जेरबंद

कंट्रोल मॉड्यूल चोरी करून नेण्यात आले होते. या प्रकरणाचा तपास सुरू असताना तळोजा पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाला गुप्त माहिती मिळाली. त्याआधारे सापळा रचून तीन संशयितांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान आरोपींनी चोरीची कबुली दिली. अधिक तपासात त्यांनी तळोजा परिसरातील आणखी एका घरफोडी चोरीत सहभाग असल्याचेही उघड झाले. पोलिसांनी आरोपींकडून चोरीतील मुद्देमाल हस्तगत केला असून त्याची किंमत सुमारे ७ लाख २५ हजार रुपये असल्याचे सांगितले आहे. साहिल पप्पू अली शहा (२१), साकीब हारून इनामदार (२७) आणि मोहम्मद हुसेन अखलाक शेख (२३) असे आरोपींचे नाव आहे.

## रायगडात पाणीबाणी

हून अधिक टँकर्सच्या माध्यमातून जवळपास दीड लाख नागरिकांना पाणीपुरवठा केला जात आहे.

जून महिना अर्धा उलटूनही धरणांमध्ये अपेक्षित पाऊस झाला नसल्याने प्रशासनाची चिंता वाढली आहे. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून उपलब्ध साठा मर्यादित असल्याने अनेक भागांत पाणीपुरवठ्यावर निर्बंध आणण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जिल्हा ग्रामीण पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता मोहन सरवदे यांनी सध्या धरणांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा जेमतेम १५ दिवस पुरेल, असे स्पष्ट केले आहे. पावसाने लवकर हजेरी लावली नाही तर पाणीकपात करण्याशिवाय पर्याय नाही, असेही त्यांनी सांगितले. शासनाच्या आदेशानुसार यापुढे औद्योगिक प्रकल्पांमधील पाणीपुरवठ्यात कपात करण्यात आली असून, पिण्यासाठीच्या पाण्याला प्रथम प्राधान्य देणार असल्याचे सरवदे यांनी स्पष्ट केले. मात्र, पंधरा दिवसात पाऊस पडला नाही, तर परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये, यासाठी आतापासून आकस्मिक आराखडा प्रशासनाकडून तयार करण्यात येत असल्याचे ते म्हणाले. त्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठ्यावर भर देणार असल्याचे सरवदे यांनी सांगितले.

| तालुकानिहाय | पाणीसाठा |
|---|---|
| सुधागड | १३.४१८ एमसीएम |
| खालापूर | ९.९६० एमसीएम |
| महाड | ८.३७१ एमसीएम |
| श्रीवर्धन | ६.१०६ एमसीएम |
| पनवेल | ५.६०० एमसीएम |
| कर्जत | ४.२३० एमसीएम |
| म्हसळा | ४.०१३ एमसीएम |
| उरण | ३.७१० एमसीएम |
| तळा | ३.१३४ एमसीएम |
| अलिबाग | २.९५३ एमसीएम |
| पेण | २.४९० एमसीएम |
| मुरुड | २.२६६ एमसीएम |
| रोहा | २.२६४ एमसीएम |

**आकाशाकडे लागले डोळे**

जूनचा अर्धा महिना उलटल्यानंतरही धरणांमध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही. उलट, जलसाठा झपाट्याने कमी होत असल्याने पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अधिक गंभीर बनत चालला आहे. ग्रामीण भागात टँकरच्या फेऱ्या वाढत असून अनेक गावांमध्ये नागरिकांना पाण्यासाठी तासन्‌तास प्रतीक्षा करावी लागत आहे. मान्सून लवकर सक्रिय होऊन धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दमदार पाऊस झाला तरच रायगडकरांना दिलासा मिळणार आहे. अन्यथा आगामी काळात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**रायगड जिल्ह्यातील २८ लघु पाटबंधारे प्रकल्पांमध्ये सध्या केवळ १३.२८७ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध असून, उपयुक्त साठा १९.३९ टक्क्यांवर आला आहे. जून महिना अर्धा उलटूनही धरणांमध्ये अपेक्षित पाण्याची आवक झालेली नाही. त्यामुळे जलसाठ्याची परिस्थिती चिंताजनक आहे. पावसाच्या पुढील स्थितीनुसार पाणी नियोजन करावे लागणार आहे.**

**– राकेश धाकतोडे, कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड**

## पावणे दोन लाख बालकांना पोलिओ लस

असे आवाहन करण्यात आले आहे. कोणताही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी नियोजन करण्याच्या सुचना संबंधित विभागाला देण्यात आल्या आहेत. नियमित लसीकरण झालेले असले तरी प्रत्येक बालकाला पल्स पोलिओ लसीचे दोन थेंब देणे आवश्यक आहे. मोहिमेच्या पहिल्या दिवशी केंद्रावर लसीकरण केल्यानंतर पुढील टप्प्यात आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका घरभेटी देऊन लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांचा शोध घेऊन त्यांना लस दिली जाणार असल्याची महिती देण्यात आली आहे.

## चाणजेत वनजमिनींचा महाघोटाळा

संशयास्पद फेरफार करण्यात आले आहेत. महसूल अभिलेखांमध्ये बदल करून सातबारा उताऱ्यांवर खासगी व्यक्तींची नावे चढविण्यात आली. त्यानंतर या जमिनींचे व्यवहार करून त्या सिडकोच्या घशात घालण्यात आल्याचा आरोप होत आहे. विशेष म्हणजे या व्यवहारांच्या बदल्यात संबंधितांना विकसित भूखंड, हजारो प्लॉट आणि कोट्यवधी रुपयांचा लाभ मिळाल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. या कथित घोटाळ्यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे सिडकोच्या एका अधिकाऱ्याने स्वतःच्या पत्नीच्या नावावर जमीन खरेदी केल्याची माहिती समोर येत आहे. नंतर संबंधित जमीन शासकीय असल्याचे समोर आल्यानंतर अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. जर हा दावा खरा असेल तर हा केवळ जमीन व्यवहाराचा विषय नसून हितसंबंधांच्या संघर्षाचा आणि सत्तेच्या गैरवापराचा गंभीर प्रकार ठरू शकतो. याहून गंभीर आरोप म्हणजे एका प्रभावशाली राजकीय नेत्याने जमीन न घेता तब्बल ६० लाख रुपये घेतल्याची माहिती एका जबाबदार शासकीय अधिकाऱ्याने दिल्याची चर्चा सुरू आहे. या पैशांचा व्यवहार नेमका कशासाठी झाला? कोणाला वाचवण्यासाठी झाला? आणि त्यामागे कोणते राजकीय संरक्षण होते? असे प्रश्न आता नागरिक विचारू लागले आहेत.

## अवैध दारू विरोधातील मोहीम तीव्र

पोलीस हवालदार अथर्व पाटील, मनोज भोईर, शिपाई गणेश चोरगे व दोन पंच या पथकाने वाघ्रणवाडी जंगल परिसरामध्ये सुमारे २५ किलोमीटर आत जंगलात जाऊन गावठी हातभट्टी दारूचा आणखी एक अड्डा उद्‌ध्वस्त करून या अड्ड्याचे समूळ उच्चाटन केले आहे. या गुन्ह्यांमध्ये एकूण ९ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

## बोटींनी तोडलं कांदळवन

कांदळवन संवर्धनाचे गोडवे गाणाऱ्या आणि एखाद्या सामान्य नागरिकाने कांदळवनाला धक्का लावला तरी तत्परतेने गुन्हे दाखल करण्यासाठी धावणाऱ्या अधिकाऱ्यांची भूमिका आता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. बेली आणि आक्षी खाडीत शेकडो बोटी कांदळवनाच्या मुळांमध्ये घुसवून बांधण्यात आल्याने अनेक ठिकाणी कांदळवन तुटले असून, त्याचे अस्तित्व धोक्यात आले आहे. मात्र, या गंभीर प्रकाराकडे विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप होत आहे.विशेष म्हणजे, पर्यावरण संवर्धनाच्या नावाखाली नियमांचा बडगा उगारणाऱ्या याच विभागाचे अधिकारी या प्रकरणात मात्र कमालीचे शांत आहेत. त्यामुळे 'नियम फक्त सर्वसामान्यांसाठी आणि धनदांडग्यांसाठी मोकळे रान' अशी चर्चा परिसरात रंगू लागली आहे. कांदळवनाची उघडपणे होत असलेली तोड आणि त्यावर विभागाची मौन भूमिका पाहता, या प्रकारामागे नेमके कोणाचे हितसंबंध जपले जात आहेत, असा प्रश्नही उपस्थित होत आहे.पर्यावरण संरक्षणाची जबाबदारी असलेल्या विभागाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे करावेत, दोषींवर गुन्हे दाखल करावेत आणि कांदळवनाच्या विनाशाला जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. अन्यथा, कांदळवन विभागाची दुटप्पी भूमिका आणि निवडक कारवाईचे आरोप आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

## प्रांत कार्यालयात लाच लुचपतची कारवाई

येथील पोलीस उपअधीक्षक सरिता भोसले यांनी योग्य प्रकारे सापळा रचून ही कारवाई केली आहे. त्यामध्ये प्रांत कार्यालयातील अव्वल कारकून नितीन पवार व शिपाई सचिन पाटील या दोघांना लाच स्वीकारताना रंगेहात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. रात्री उशिरापर्यंत श्रीवर्धन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते. या अगोदर देखील श्रीवर्धन तहसील कार्यालयातील एका कारकुनाला नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई करण्याची घटना घडली होती. इतक्या घटना घडुन सुद्धा महसूल विभागातील कर्मचारी खुलेआमपणे जनतेकडे लाचेची मागणी करत आहेत. त्यामुळे कोकण आयुक्त नवी मुंबई यांनी या प्रकरणी योग्य लक्ष घालून संबंधित अधिकाऱ्यांवर देखील कारवाई करावी, अशी मागणी जनतेमधून केली जात आहे.

## उलव्यातील महिला दलालाला अटक

छापेमारीदरम्यान दोन अल्पवयीन मुलींची सुटका करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत आरोपी महिला स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी मुलींना देहव्यापारासाठी प्रवृत्त करत असल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कारवाईदरम्यान पोलिसांनी रोख रक्कम, मोबाईल फोन आणि इतर साहित्य असा सुमारे ३८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या रॅकेटमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, तसेच मुलींना या व्यवसायात आणण्यासाठी कोणते जाळे कार्यरत होते, याचा तपास पोलीस करत आहेत.

## ठाकरेंची सेना पुन्हा फुटली

मोदी सरकारकडून दि.१७ एप्रिल रोजी महिला आरक्षण सुधारणा विधेयक लोकसभेत मांडण्यात आले होते. त्या आडून मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मंजूर करण्याचा भाजपचा प्रयत्न होता. परंतु, इंडिया आघाडीने एकत्र राहून विधेयकाच्या विरोधात मतदान केले. घटना दुरुस्ती विधेयक असल्याने विधेयकाच्या बाजूने दोन तृतीयांश मतदान गरजेचे होते. मात्र, विधेयकाच्या बाजूने २९८ मते पडली, तर २३० मते विरोधात गेली. त्यामुळे दोन तृतीयांश बहुमतासाठी ३६२ चा आकडा आहे. तीन जागा रिक्त असल्याने बहुमताचा आकडा ३६० वर येतो. १७ एप्रिल रोजी मतदान झाले, तेव्हा १२ खासदार अनुपस्थित राहिले. त्या दिवशी ५२८ खासदार हजर होते. त्यांनी मतदान केले. तेव्हा दोन तृतीयांश मतदानासाठी ३५२ चा आकडा गरजेचा होता. परंतु, सत्ताधाऱ्यांना २९८ मते मिळवता आली. म्हणजेच ५४ मते कमी पडली. लोकसभेत एनडीएचे संख्याबळ ३१४ वर पोहोचले आहे. तृणमूलचे २० खासदार फुटल्याने एनडीएचा आकडा ३०० च्या पुढे गेला. आता ६ खासदारांनी ठाकरेंची साथ सोडल्याने हाच आकडा ३२० वर पोहोचला आहे.

## भानंग येथे जनसुविधा योजनेत अपहार

चौकशी करावी. तसेच, दोषींवर कठोर कारवाई करावी आणि अपहार झालेला निधी वसूल करावा, अशी मागणी तक्रारीत करण्यात आली आहे. ग्रामस्थांनी पंचायत समिती प्रशासनाकडे सादर केलेल्या निवेदनात संबंधित कागदपत्रांची तपासणी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणण्याची मागणी केली आहे. या तक्रारीमुळे परिसरात खळबळ उडाली असून, पंचायत समिती प्रशासन या प्रकरणाची दखल घेऊन चौकशी करणार का? याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या प्रकरणाबाबत संबंधित अधिकारी लोकप्रतिनिधी यांची भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नसून, चौकशीनंतरच वस्तुस्थिती समोर येणार आहे. ग्रामस्थांनी मात्र या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी कायम ठेवली आहे.

# शासकीय मंडळावर आशिष भट, विजय राणेंची वर्णी

**| रायगड | प्रतिनिधी |**



रायगडच्या विकासाचा आवाज आता थेट राज्याच्या धोरणात्मक निर्णय प्रक्रियेपर्यंत पोहोचणार आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड अ‍ॅग्रीकल्चर या राज्यातील सर्वोच्च आणि प्रभावशाली शासकीय मंडळावर (गव्हर्निंग कौन्सिल) रायगडचे आशिष चंद्रकांत भट आणि विजय काशीराम राणे यांची सदस्यपदी बिनविरोध निवड झाली आहे. महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार, कृषी आणि सेवा क्षेत्राशी संबंधित धोरणांवर प्रभाव टाकणारी संस्था म्हणून महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सची ओळख आहे. अशा संस्थेवर रायगड जिल्ह्यातील दोन प्रतिनिधींना संधी मिळाल्याने जिल्ह्याच्या विकासाशी संबंधित विविध प्रश्न राज्याच्या सर्वोच्च व्यासपीठावर मांडण्याचा मार्ग खुला झाला आहे.

रायगड हा औद्योगिक गुंतवणूक, पर्यटन, बंदरे, मत्स्यव्यवसाय, कृषी आणि शिक्षण क्षेत्रात मोठी क्षमता असलेला जिल्हा मानला जातो. मात्र, अनेक प्रश्न आणि विकासाच्या संधी राज्यस्तरावर प्रभावीपणे मांडल्या जात नसल्याची भावना नेहमीच व्यक्त होत आली आहे. अशा परिस्थितीत भट आणि राणे यांची निवड जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी ''गाव तिथे उद्योजक'' अशी प्रभावी संकल्पना राबवली आहे. त्या अनुषंगाने रायगड जिल्ह्याच्या ग्रामीण भागामध्ये अशी संकल्पना राबवणार असल्याचा मानस आशिष भट आणि विजय राणे यांनी अधोरेखित केला.

## म्हसळ्यातील दारू अड्ड्यांवर धाड

या कारवाईत तयार दारू, दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे रसायन व साहित्य जप्त करून नष्ट करण्यात आले असून, दोन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, दि.११ जून रोजी सायंकाळच्या सुमारास खामगाव आदिवासीवाडी येथे पोलिसांनी छापा टाकला असता सुनील नरेश वाघरे (२५) याच्या घराजवळ गावठी दारू निर्मितीचा अड्डा सुरू असल्याचे आढळून आले. या कारवाईत १३ लिटर गुळ व नवसागर मिश्रित पिवळ्या रंगाचे फेसयुक्त रसायन, तसेच ६० लिटर गावठी हातभट्टीची तयार दारू असा एकूण ४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी पोलीस शिपाई अक्षय दौलत पुरी यांच्या फिर्यादीवरून म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, दुसऱ्या कारवाईत खामगाव आदिवासीवाडी येथील मोतीराम बाबू पवार (२५) याच्या घराच्या आडोशाला ठेवलेल्या प्लास्टिक कॅनमधून १४ लिटर गावठी हातभट्टीची दारू जप्त करण्यात आली आहे. यावेळी सुमारे १ हजार ४०० रुपयांची दारू पोलिसांनी ताब्यात घेतली असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## म्हसळ्यातील गुटखा विक्रेत्यावर कारवाई

आरडा ओरडा करून पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास भाग पाडले. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित टपरीवर छापा टाकला. या छाप्यामध्ये महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेला 'विमल' व तत्सम प्रकारचा गुटखा विक्रीसाठी ठेवलेला आढळून आला. पोलिसांनी तो जप्त करून संबंधित टपरी चालकास ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान आरोपीने अन्य ठिकाणाहून गुटखा खरेदी करून किरकोळ विक्रीसाठी आणत असल्याची कबुली दिल्याची माहिती पोलिसांनी दिली. रायगड जिल्ह्यातील विविध भागांत मुंबईहून खासगी वाहनांद्वारे मोठ्या प्रमाणात गुटखा वाहतूक होत असल्याचे या कारवाईमुळे पुन्हा एकदा समोर आले आहे. आरोपी प्रीतम धिमर याच्याविरुद्ध म्हसळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) प्रज्वल विलास नागवेकर २) राज प्रविण शेवडे, ३) राजेश लक्ष्मण कदम रा. नागाव, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबतचा व्यवहार आमच्या अशिलांनी ठरविलेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| डावाले ता. अलिबाग | २१८ | ०-३१-०० ०-०२-२० एकूण ०-३३-२० | २.४१ |

सदर वर नमूद केलेली मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (७) सात दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख १८/०६/२०२६

सही/-
**अ‍ॅड. शैलेश प्रभाकर पाटील**
ऑफिस पत्ता-दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.



**जाहीर समन्स/नोटीस**
**अलिबाग येथील मे दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर सो यांचे न्यायालयात**
**दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७७/२०२६**

श्री. अमित उत्तमराव अहिरे वगैरे — अर्जदार
विरूद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर समन्स/नोटीसद्वारे आपणांस कळिवण्यात येते की, अर्जदार यांचे वडिल कै.उत्तमराव देवराम अहिरे यांचे दिनांक २४/०४/२०२५ रोजी मौजे पिंपळभाट, चेंढरे ता. अलिबाग येथील त्यांचे राहत्या घरी वयोमानपरत्वे निधन झाले आहे. कै.उत्तमराव देवराम अहिरे हे त्यांचे मृत्युपूर्वी मा. न्यायालयाचे स्थळसिमेत वास्तव्यास होते. तसेच अर्जदार यांची आई कै.सरला उत्तमराव अहिरे यांचे दिनांक ०१/०३/२०२६ रोजी मुंबई येथील 'हिंदुजा हॉस्पिटल' येथे उपचारादरम्यान निधन झाले आहे. कै. सरला उत्तमराव अहिरे हया त्यांचे मृत्युपूर्वी मा.न्यायालयाचे स्थळसिमेत मौजे पिंपळभाट, चेंढरे ता. अलिबाग येथे कायमस्वरूपी वास्तव्यास होत्या त्यांचे पश्चात त्यांचे कायदेशिर वारस म्हणुन अर्जदार यांस (अ) मौजे चेंढरे, ता. अलिबाग येथील 'पी.एन.पी. नगर' या निवासी गृह संकुलातील तळमजल्यावरील वाणिज्य गाळा क्र.०५ क्षेत्र २६ चौ. मीटर (बिल्ट अप) ज्यास अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र. ALB000001813 (जुना मालमत्ता क्र. Z1PNP001825) (मॅन्युअल मालमत्ता क्र.१५४० ब 'ए' विंग) असे वर्णन आहे. आणि (ब)मौजे चेंढरे, ता अलिबाग येथील 'पी.एन.पी. नगर' या निवासी गृह संकुलातील तळमजल्यावरील वाणिज्य गाळा क्र. १८ क्षेत्र २२.९५ चौ.मीटर (बिल्टअप) ज्यास अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्र ALB000001824 (जुना मालमत्ता क्र. Z1PNP001837) (मॅन्युअल मालमत्ता क्र १५४० ड 'ए' विंग) असे वर्णन आहे. या मिळकतीबाबत अर्जदार यांनी कै.उत्तमराव देवराम अहिरे व कै.सरला उत्तमराव अहिरे यांचे वारस म्हणून ठराव करून मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सबब, या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे नावे असा वारस दाखला देण्यास व जाहीर ठराव करणेस कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर आपले नेमलेले प्रतिनिधी वा वकिल यांचे मार्फत या दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर अलिबाग यांचे न्यायालयात दिनांक १८/०७/२०२६ रोजी हजर रहावे. आपण हजर न राहील्यास एकतर्फी काम चालेल, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख: १५/०६/२०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व स्तर अलिबाग**



**जाहीर नोटीस**

सर्व संबंधितांस ह्या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे थळ, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खालील नमूद वर्णनाच्या मिळकती, सदर मिळकतींचे विद्यमान मालक सौ. पल्लवी सुजित वाघ व सौ. मीना सुजितकुमार उगल यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिध्द करीत आहोत.

संदर्भित जमीन मिळकती ह्या पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकारणी(रु.पै.) |
|---|---|---|---|
| थळ, ता. अलिबाग, जि.रायगड | २६१/६/अ | ०-०१-०० | ०.४२ |
| | २६१/६/ब | ०-०१-०० | ०.४२ |
| | २६१/५ | बागायत ०-०७-६० पोटखराबा ०-०१-५० एकुण ०-०९-१० | ३.१२ |
| | वर नमूद भूमापन क्र. २६१/५ या मिळकतीवरील घर मालमत्ता नं. ६४०, क्षेत्र १६६.३६ चौ.मी. | | |

अलिबाग,
दि. १८/०६/२०२६

**अ‍ॅड. महेश सुहास म्हात्रे**
बी.ए.एलएल.बी.
(MAH /5773/2006) पब्लिक नोटरी
कार्यालय : ऋतुराज प्लाझा, फ्लॅट क्र. १, तळमजला, शिवाजी चौक, गावडे ऑप्टिक्सजवळ, अलिबाग, रायगड-४०२२०१.
संपर्क क्रमांक: ०९८५००४२२३४/७७४१०३२२३४
ई-मेल आयडी: maheshmhatreoffice7@gmail.com



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे बारशिव, ता. मुरुड, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकती मिळकतीचे विद्यमान मालक यांचेकडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बारशिव ता. मुरूड | १२९/१ | जिरायत १-०४-०० वरकस ०-०५-०० पो.ख. ०-०३-०० एकुण १-१२-०० पैकी क्षेत्र ०-६४-०० | १४.३६ |
| | १२९/२ | जिरायत ०-१०-०० | ०.०६ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकती या नोटीसीचा विषय आहे.

सदर नोटीसीचा विषय असलेली मिळकत हि विद्यमान मालक १) शशिकांत गोपाळ महाडीक, २) चंद्रकांत गोपाळ महाडीक, ३) जगदिश गोपाळ महाडीक यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस पुर्ण कायदेशीर हक्क व अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिथे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहार हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात. मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती ह्या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असूनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरुन आमचे अशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली नाही. हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १८/०६/२०२६
मोबा. नं. ९९२२७०७०१२

**अ‍ॅड. स्वप्निल नरेंद्र म्हात्रे**
ऑफिस-लक्ष्मी नारायण, पहिला मजला, गाळा नं.७ व ८, ब्राह्मण आळी, राम मंदिर समोर, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२२०१



**जाहीर सूचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटिसीने कळवण्यात येते की, आमचे आशिलांनी खालील अनुसूचीमध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १) म्हाळसाकांत पांडुरंग नाखवा, २) श्रीराम पांडुरंग नाखवा, ३) देवयानी गोकुळ कोळी, (४) रेखा दत्ता कोळी, ५) हिरकन्या नवनाथ कोळी आणि ६) लक्ष्मी पांडुरंग नाखवा यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात आम्ही विद्यमान मालकांचे मालकी हक्क तपासत आहोत.

सदर मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष वहिवाटीतील असून ती विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या आशिलांना दिलेला आहे. मात्र, तरी देखील कोणत्याही व्यक्ती/संस्था सदर मालमत्ता किंवा त्यावरील कोणत्याही भागाच्या संदर्भामध्ये /विरुद्ध कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेप जसे की, विक्री, अदलाबदल, भाडेपट्टा, कुळवहिवाट, परवाना, विश्वस्त, धारणाधिकार, निर्वाह, सुविधाधिकार, वारसाहक्क, ताबा, जप्ती, गहाण, प्रभार, बक्षीस, प्रलंबित वाद, एफएसआय वापर किंवा अन्यकाही दावे असल्यास त्यांनी तसे सदरच्या लिखित सुचनेसह वाड्रा लीगल वकील आणि सॉलिसिटर्स, ४था मजला, जलाराम ज्योत, जन्मभुमी मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१ येथे तसे हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी आणि/किंवा आक्षेपाच्या कागदपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रतींसह या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत कळवाव्यात.

वरील मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत ही विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांची आहे असे गृहीत धरून आमचे आशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळवण्यात येते.

**अनुसूची**
**(मालमत्तेचे वर्णन)**

नोंदणीकृत जिल्हा व उप-जिल्हा रायगड यांचे कार्यक्षेत्र मधील गाव म्हात्रोळी, तालुका- अलिबाग, जिल्हा-रायगड येथे स्थित भूमापन क्रमांक व उपविभाग ३७१, एकूण क्षेत्र ००-३५-९० ( हे.आर.चौ.मी.) आकार रु. पै. १०.३१/-

ठिकाण : अलिबाग
दिनांक : १९/०६/२०२६
वाड्रा लीगल
सही/-
**विक्रांत झुंजाराव**



**जाहीर सूचना**

**याद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की,** आमच्या अशिलांच्या वतीने **डॉ. सौ. सई आसगेकर (यापुढे ''जमीन मालक'' असा उल्लेख)**, वयाने सज्ञान, भारतीय नागरिक, रा. ४०१, ७वा मजला, शिमरिंग हाइट्स, भागोजी कीर मार्ग, पॅराडाईज सिनेमा मागे, माहीम, मुंबई, महाराष्ट्र – ४०००१६, यांच्या मालकी हक्क, स्वामित्व, हुद्दा व हितसंबंधांची आम्ही चौकशी व पडताळणी करीत आहोत. सदर चौकशी **गट क्र. २५/३** असलेल्या आणि एकूण **२,०८० चौ. मीटर (सुमारे ०.५१ एकर)** क्षेत्रफळाच्या जमिनीबाबत तसेच त्या जमिनीवर उभारलेल्या सर्व बांधकामे, संरचना व इतर उपसुविधांबाबत करण्यात येत आहे. सदर मालमत्ता गाव ढोकावडे, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड येथे स्थित असून तिचे अधिक तपशील खालील **परिशिष्टामध्ये** नमूद केलेले आहेत (यापुढे ''**सदर मालमत्ता**'' असा उल्लेख करण्यात येईल).

सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर कोणत्याही व्यक्तीचा किंवा संस्थेचा प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हक्क, मालकी हक्क, स्वारस्य, दावा, आक्षेप किंवा मागणी असल्यास किंवा असल्याचा दावा असल्यास, मग तो विक्री, सामंजस्य करार, हस्तांतरण, अभिहस्तांतरण, अदलाबदल, वाटप, भार, बोजा, भाडेकरार, उपभाडेकरार, लीज, उप–लीज, परवाना, गहाण (समन्यायी किंवा अन्य प्रकारचा), वारसा, ताबा, कब्जा, वाटणी, हिस्सा, भेट, मृत्युपत्रीय तरतूद, धारणाधिकार, देय भार, विकास हक्क, देखभाल हक्क, उपभोगाधिकार, विश्वस्त हक्क, करारातील अटी व शर्ती, मुक्तता, हक्कत्याग किंवा कोणत्याही करार, दस्तऐवज, लेखी करारनामा, हस्तांतरणपत्र, मृत्युपत्र, वारसा, कौटुंबिक व्यवस्था / तडजोड, न्यायालयीन कार्यवाही, न्यायालय, न्यायाधिकरण, महसूल अथवा वैधानिक प्राधिकरण यांच्या आदेश, निर्णय, निवाडा, लवाद, ताबा, नियंत्रण किंवा इतर कोणत्याही प्रकारे निर्माण झालेला असल्यास, अशा सर्व व्यक्ती किंवा संस्थांनी त्यांचा दावा लेखी स्वरूपात, त्यासंबंधीच्या संपूर्ण व प्रमाणित सत्यप्रत कागदपत्रांसह, खाली सही करणाऱ्यांकडे खालील पत्त्यावर सादर करावा : वन वर्ल्ड सेंटर, ७वा मजला, टॉवर २ए, सेना बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई – ४०००१३ तसेच खालील ई–मेल पत्त्यांवर देखील पाठवावा : monika.bhonsale@trilegal.com आणि maithili.vagal@trilegal.com, ही सूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांका पासून **१० (दहा) दिवसांच्या** आत दावा सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा, संबंधित व्यक्ती किंवा संस्थेचा दावा, असल्यास, तो कायमस्वरूपी सोडून दिलेला व त्याग केलेला समजला जाईल आणि तो कोणत्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाही.

**परिशिष्ट**
**(मालमत्तेचे वर्णन)**

गाव ढोकावडे, तालुका अलिबाग, जिल्हा रायगड येथील, गट क्र. २५/३ (जुने गट क्र. २५/२ व २५/बी तसेच जुने सर्व्हे क्र. २अ१/३अ+३ब/१, १९५/१, १९४/५ आणि १९६/१ यास अनुरूप) असलेली, एकूण २,०८० चौ. मीटर (सुमारे ०.५१ एकर) क्षेत्रफळाची कृषी जमीन तसेच त्यावरील सर्व बांधकामे, संरचना व इतर उपसुविधांसह असलेली मालमत्ता, ज्याच्या सीमा खालील प्रमाणे आहेत :

उत्तरेस : गट क्र. २५/५
दक्षिणेस : गट क्र. २५/४ आणि २५/५
पूर्वेस : गट क्र. २५/५
पश्चिमेस: सार्वजनिक रस्ता

**आज दिनांक १९ जून, २०२६**

**मोनिका भोसले**
**भागीदार**
**ट्रायलीगल**
वकील आणि सॉलीसिटर्स
वन वर्ल्ड सेंटर, ७ वा मजला, टॉवर २ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई – ४०००१३.



**e-TENDER NOTICE**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-12/26-27 7000040372 | AMC for attending emergency breakdown, planned maintenance activities and restoration of collapse tower of 220kV & 100kV Lines as & when required at EHV Line maintenance sub - division, Dombivali under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee Rs. 5000/- + GST** | **Rs. 118.00 Lakhs including GST** |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 18.06.2026 at 11:00 Hrs. to 03.07.2026 up to 15:00 hrs, Opening date :- 03.07.2026 @ 15:30 Hrs.**
For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**
**Contact Person :** The Executive Engineer (Adm)
Mob. No. 8412050202. E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

# पूल कोसळण्याची वाट पाहताय का?

- आठ दिवसांचे आश्वासनही हवेतच
- सार्वजनिक बांधकाम विभागावर संताप



| चौल | प्रतिनिधी |

अलिबाग-रेवदंडा मार्गावरील धोकादायक नवेदर बेली पुलावर आठ दिवसात लोखंडी बॅरिअर्स उभारण्यात येतील, असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांनी दिले होते. या घटनेला आज आठ दिवस पूर्ण झाले, मात्र प्रत्यक्षात प्रत्यक्षात कोणतीही कार्यवाही झालेली नाही. जनतेच्या जीवाशी खेळणारे बांधकाम विभागाचे अधिकारी मोठा अपघात होण्याची वाट पाहात आहेत का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे. पुलाची अवस्था दिवसेंदिवस गंभीर बनत असताना, प्रशासन मात्र केवळ आश्वासनांची खैरात करत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला आहे.

जिल्हा वाहतूक शाखेने पुलावर अवजड वाहनांना प्रतिबंध करण्यासाठी लोखंडी बॅरिअर्स बसविण्याबाबत लेखी सूचना दिल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने आठ दिवसांत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, मुदत संपल्यानंतरही पुलावर एकही बॅरिअर उभा राहिलेला नाही. परिणामी, धोकादायक पुलावरून अवजड वाहने अद्यापही सर्रास धावत आहेत.

विशेष म्हणजे, पुलाच्या असुरक्षिततेमुळे एसटी सेवा बंद करण्यात आली असताना, दुसरीकडे अवजड ट्रकना मात्र मोकळीक मिळत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. पुलावरील गंजलेल्या सळ्या, ढासळलेले भाग आणि कमकुवत झालेली संरचना यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे विभागाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, प्रशासन दुर्घटनेची वाट पाहात असल्याची टीका होत आहे.

### धायतडकांना गांभीर्य नाही!

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता धायतडक यांना नवेदर बेली पुलाच्या दुरवस्थेबाबत गांभीर्य नाही. आश्वासनांची खैरात करीत त्यांनी खेळ मांडला आहे. त्यांच्याशी संपर्क साधला असता बोलण्यास टाळाटाळ केली. ऐन पावसाळ्यात पूल कोसळल्यास जिल्हा प्रशासनाने धायतडक यांना जाब विचारावा, अशी मागणी जनतेतून केली जात आहे.

### तडक कारवाई करा!

दरम्यान, नागाव येथील युवा कार्यकर्ते दीपक गुरव यांनी याप्रकरणी तीव्र भूमिका घेतली आहे. पुलावरील धोकादायक परिस्थितीची कल्पना असूनही आवश्यक सुरक्षात्मक उपाययोजना करण्यात दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, भविष्यात या पुलावर अपघात होऊन जीवितहानी झाल्यास सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता मोनिका धायतडक यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी त्यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

# रोहा तहसील कार्यालयाला झुडपांचा विळखा



- स्वच्छता राखण्यास महसूल प्रशासन उदासीन
- परिसर स्वच्छ ठेवण्याच्या आदेशाची पायमल्ली

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

कार्यालय आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे शासनाचे आदेश असतानाही रोहा तहसील प्रशासनाकडून या आदेशाची पायमल्ली होत असताना दिसून येत आहे. करोडो रुपये खर्च करून उभारण्यात आलेल्या या तहसील कार्यालयाच्या दुमजली इमारतीला झुडपांनी विळखा घातला आहे. या झुडपांचा आधार घेऊन कीटक व अन्य दंश करणारे प्राणी कार्यालयात घुसण्याचा धोका निर्माण झाला आहे. परिसराची स्वच्छता राखण्यास प्रशासन उदासीन ठरले आहे. त्यामुळे रोहा तहसील कार्यालयाच्या परिसरातील स्वच्छता फक्त कागदावरच असे चित्र दिसून येत आहे.

रायगड जिल्ह्यातील रोहा हे मध्यवर्ती ठिकाण म्हणून ओळखले जाते. कोलाड, तांबडी, खैराळे, सानेगाव या भागातील शेकडो गावे, वाड्यांमधील नागरिकांना उत्पन्न, वय अधिवास व इतर दाखल्यांसह शेतीविषयक कागदपत्रांसाठी रोहा तहसील कार्यालयात यावे लागते. मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या रोहा तहसील कार्यालयाची इमारत सुस्सज असून, ती दुमजली आहे. पुरवठा, महसूल विभागासह निवासी नायब तहसीलदार, महसूल नायब तहसीलदार, पुरवठा निरीक्षक, सेतू केंद्र तसेच तहसीलदारांचे कार्यालय याच इमारतीमध्ये आहे. अद्ययावत असलेल्या इमारतीमध्ये हजारो नागरिकांसह विद्यार्थ्यांची कामानिमित्त ये-जा असते. या इमारतीचा परिसर कायमच नागरिकांनी गजबजलेला असतो. मात्र, परिसर स्वच्छ ठेवण्यामध्ये तहसील प्रशासन उदासीन ठरल्याचे दिसून आले आहे.

तहसील कार्यालयाच्या बाजूच्या परिसरात वेगवेगळ्या प्रकारची झाडे उगविली आहेत. बाजूलाच मातीचा ढिगारा आहे. या ढिगाऱ्यातही लहान-मोठी झाडे आहेत. तसेच इमारतीला लागूनच जनरेटरच्या ठिकाणी वेलींचे झुडूप आहे. मोठ मोठ्या झाडांसह झुडपांनी या इमारतीला विळखा घातला आहे. मागील भागातही झुडपं मोठ्या प्रमाणात आहेत. याच झुडपांच्या बाजूलाच तळमजल्यावर सेतू कार्यालय आहे. त्यामुळे या ठिकाणी येणाऱ्या नागरिकांची सुरक्षा धोक्यात आली आहे. या झुडपांचा आधार घेत काही साप व अन्य दंश करणारे प्राणी कार्यालयात घुसण्याची भीती व्यक्त केली जात आहे. महसूल प्रशासनाकडून स्वच्छता राखण्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

## निवडक




### दिघोडे- चिर्ले मार्गावर वाहतूक कोंडी

**चिरनेर :** उरण तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अखत्यारित येणाऱ्या दिघोडे-चिर्ले मार्गावर वाढत्या अवजड वाहनांमुळे दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. या मार्गावरील प्रवासी या प्रवासाला अक्षरशः वैतागले आहेत. दिघोडे-चिर्ले मार्गावर वाढत्या अवजड वाहनांमुळे या मार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून रस्त्याची नादुरुस्ती झाली आहे. त्यामुळे वाहन चालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. सततच्या वाहतूक कोंडीमुळे विद्यार्थी, कामगार, प्रवासी आणि रुग्णांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. अटल सेतू मार्गे मुंबईहून कोकणाकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने या मार्गावर वाहतुकीचा ताण लक्षणीय वाढला आहे. दिघोडे येथील मुख्य नाक्यावरील घाऊक, बाजारपेठ, मच्छी मार्केट या भागात तर लांबच्या लांब रांगा लागत असल्यामुळे वाहतुकीचा ताण दररोज वाढत आहे. या मार्गावरून जाणाऱ्या अवजड व मालवाहू वहानांसह दुचाकी, रिक्षा व खाजगी वहान चालकांना मोठा मनस्ताप करावा लागत आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी वाहतूक पोलीस प्रयत्न करत आहेत. मात्र, वाहनांची संख्या अधिक असल्याने वाहतूक कोंडी नियंत्रणात येणे शक्य होत नाही.

### पेणमध्ये भटक्या कुत्र्यांचा उपद्रव



**पेण :** पेण शहरात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी रस्त्यांवर फिरणारे भटके कुत्रे दुचाकीस्वारांचा पाठलाग करत असल्याने अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, अनेक ठिकाणी कुत्र्यांचे कळप रस्त्यावर वावरत असल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. रात्रीच्या वेळी हा त्रास अधिक जाणवत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, शाळा सुरू झाल्याने लहान मुलांच्या सुरक्षिततेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. सकाळी व सायंकाळी शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांना भटक्या कुत्र्यांचा धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी पेण नगरपालिकेकडे भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. भविष्यात कोणतीही दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.



### प्रीपेड मीटरला तीव्र विरोध

**रसायनी :** खालापूर तालुक्यातील उबाठा पक्षाने स्मार्ट मीटर आणि प्रीपेड मीटरला तीव्र विरोध केला आहे. गुरुवारी (दि.१८) पक्षाच्या वतीने खालापूर येथे उप कार्यकारी अभियंता वीज मंडळ, खालापूर तहसीदार आणि खालापूर पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. महावितरण कंपनीने राज्यातील सर्व वीज ग्राहकांना स्मार्ट प्रीपेड मीटर्स लावणार असे जाहीर केले आहे. तसेच हे मीटर्स हे कंपनीच्या खर्चाने मोफत लावणार अशी फसवी व चुकीची जाहीरात केली आहे. परंतु, सदर वीज मीटरचा खर्चसुध्दा ग्राहकांच्या खिशातूनच वसूल केला जाणार आहे. त्यामुळे आम्ही या स्मार्ट व प्रिपेड मीटर्सना संपूर्ण विरोध करीत असल्याचे निवेदन उप कार्यकारी अधिकारी वीज वितरण खालापूर, तहसीलदार खालापूर व पोलीस निरीक्षक खालापूर यांना देण्यात आले आहे. यावेळी तालुका प्रमुख एकनाथ पिंगळे, उमेश गावंड, वैशाली खैर, अनिता पाटील, नितीन पाटील, रमेश पाटील, मंगेश पाटील, अनिल पिंगळे, अनिता पाटील, सुविधा विचारे, भारती लोते, कविता सुधीर पाटील, आदिती विठानी, भास्कर महाडिक उपस्थित होते.

# दर्शना दिनेश पाटील यांचे निधन



| अलिबाग | प्रतिनिधी |

कुरुळ येथील सामाजिक कार्यकर्ते, दिनेश कृष्णा पाटील यांच्या पत्नी, कुरुळ ग्रामपंचायतच्या माजी सदस्या दर्शना (अलका) पाटील यांचे दि.१३ जून रोजी निधन झाले. त्यांच्यावर कुरुळ येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्या मितभाषी, मनमिळाऊ स्वभावाच्या, सर्व कार्यांत हिरीरिने सहभाग घेणाऱ्या दर्शना पाटील निधना समयी ५५ वर्षांच्या होत्या. त्यांच्या अंत्ययात्रेला अनेक सामाजिक, राजकीय, क्षेत्रातील मंडळी, कुरुळ येथील ग्रामस्थ, माजी सरपंच, माजी सदस्य, नातेवाईक आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पती दिनेश पाटील, मुलगा ॲड. विनीत पाटील, मुलगी पर्णवी पाटील, इतर कुटुंबिय आणि मोठा पाटील परिवार आहे. त्यांचे दशविधीकार्य सोमवार दि.२२ जून रोजी कुरुळ तलाव येथे होणार आहेत. निधनाची वार्ता समजताच शेकाप महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या चित्रलेखा नृपाल पाटील यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले. यावेळी अवधूत पाटील, श्रीकांत पाटील, प्रदीप पाटील, अमोल नाईक, हर्ष ढवळे, रोहण पाटील, नितेश पाटील, अभिजीत घाडगे आदी उपस्थित होते.

### रस्त्यांवरील खडीमुळे नागरिक त्रस्त

**नवीन पनवेल :** शहरात खोदलेल्या रस्त्यांवर खडी टाकल्याने नागरिकांना आणि प्रवाशांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. खडीमुळे रस्त्यावरून वाहन चालवताना घसरण्याचा धोका वाढला आहे. याचा विशेष करून दुचाकी चालकांना त्रास होत आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर या खडीमिश्रीत रस्त्याचे डांबरीकरण करण्याची मागणी केली जात आहे. रस्त्यावर टाकण्यात आलेले या मोठ्या खडीमुळे छोटे मोठे अपघात होत आहेत. याचा त्रास पादचारी, ज्येष्ठ नागरिक आणि शालेय विद्यार्थ्यांना देखील होत आहे.

# सर्वेक्षणाला शेतकऱ्यांचा विरोध

| नवीन ग्रामीण | प्रतिनिधी |

कुंडेवहाळ येथील जमीन भूसंपादन सर्वेक्षणाला गुरुवारी (दि.१८) जून रोजी शेतकऱ्यांनी विरोध केला. यावेळी भूमापन अधिकारी आणि सिडको अधिकाऱ्यांना सर्वेक्षण न करताच परत जावे लागले. १८ जून रोजी भूमि अभिलेखचे अधिकारी आणि सिडकोचे अधिकारी जागेची सर्वेक्षण करण्यासाठी आले होते. मात्र, या जागेचा मोबदला शेतकऱ्यांना किती मिळेल आणि जागा कशासाठी भूसंपादन करण्यात येणार आहे, याची माहिती मिळाल्याशिवाय मोजणी करून देणार नाही असा पवित्रा शेतकऱ्यांनी घेतला.

शेतकऱ्यांचे संमती आणि योग्य नुकसान भरपाई व पुनर्वसनाची हमी मिळाल्याशिवाय कोणतेही भूसंपादन मान्य नसल्याची ठाम भूमिका येथील शेतकऱ्यांनी मांडली. शेतकऱ्यांच्या हरकती व सूचना विचारात न घेता भूसंपादनाची प्रक्रिया राबविण्यात येत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. यापूर्वीचा पनवेल आणि उरण परिसरातील अनेक गावांमध्ये भूसंपादन प्रक्रिये बाबत तीव्र नाराजी आहे. यावेळी दिबा पाटील यांच्या नावाच्या घोषणा देण्यात आल्या. ग्रामस्थांच्या तीव्र विरोधामुळे सर्वेक्षण तात्पुरते थांबवण्यात आले.

# आंबेवाडी स्वच्छतागृहांची दयनीय दूरवस्था



| कोलाड | प्रतिनिधी |

आंबेवाडीतील प्राथमिक आरोग्य केंद्राचा स्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनला आहे. रुग्णालयातील स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांकडून वारंवार तक्रारी करण्यात येत असूनही परिस्थितीत कोणतीही सुधारणा होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर एका गरोदर महिलेला लघुशंकेसाठी रुग्णालयातील स्वच्छतागृह उपलब्ध नसल्याने बाहेर जाण्यास सांगण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे संबंधित महिलेसह तिच्या कुटुंबीयांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. आरोग्य सेवेसाठी आलेल्या रुग्णांना मूलभूत सुविधा मिळत नसल्याने नागरिकांमधून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिलांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

शासनाकडून आरोग्य सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला जात असताना प्रत्यक्षात मूलभूत सुविधांची अशी अवस्था असल्याने प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची वरिष्ठ आरोग्य अधिकाऱ्यांनी चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी तसेच रुग्णालयातील स्वच्छता आणि स्वच्छतागृहांची तातडीने दुरुस्ती करून रुग्णांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत लोखंडे, महेंद्र वाचकवडे, संजय कुर्ले यांच्याकडून करण्यात आली आहे.

### आंबा फळबाग लागवडीचे प्रात्यक्षिक

| तळा | प्रतिनिधी |

महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या 'खरीप हंगाम मोहीम २०२६' अंतर्गत मालाठे येथे नलिनी लोखंडे यांच्या शेतामध्ये सीआरए तंत्रज्ञानाचा वापर करून आंबा फळबाग लागवड मोहिमेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाविषयी सविस्तर माहिती व प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. कार्यक्रमादरम्यान सहाय्यक कृषी अधिकारी योगेश कोळी, मंडळ कृषी अधिकारी संजय घालमे यांनी उपस्थित राहून शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

# बदलापूर-कर्जतदरम्यान लोकलसाठी तासभर प्रतीक्षा



**अर्ध्या तासाने गाड्या चालविण्याची मागणी**

| नेरळ | प्रतिनिधी |

मुंबई महानगर क्षेत्राचा विस्तार वेगाने होत असताना कर्जत, नेरळ, वांगणी आणि शेलू ही उपनगरे म्हणून विकसित होत आहेत. मात्र या भागातील प्रवाशांना आजही उपनगरीय लोकलसाठी तब्बल तासभर प्रतीक्षा करावी लागत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे. बदलापूर ते कर्जत दरम्यान किमान अर्ध्या तासाने लोकल सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी प्रवासी वर्गातून जोर धरू लागली आहे.

मुंबई पुणे मुख्य मार्गावरील नेरळ, वांगणी आणि शेलू परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरीकरण होत असून, रोजंदारी, नोकरी व व्यवसायासाठी मुंबई, ठाणे आणि कल्याण येथे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या लक्षणीय वाढली आहे. सकाळी आणि संध्याकाळी उपनगरीय लोकलमध्ये प्रचंड गर्दी होत असतानाही गेल्या दहा वर्षांत बदलापूर-कर्जत मार्गावर एकही नवीन लोकल वाढविण्यात आलेली नसल्याची खंत प्रवाशांनी व्यक्त केली आहे.

प्रवाशांच्या म्हणण्यानुसार, दुपार आणि संध्याकाळच्या काही वेळांमध्ये बदलापूर ते कर्जत दरम्यान लोकलच्या फेऱ्यांमध्ये ५० मिनिटे ते सव्वा तास इतके मोठे अंतर पडते. त्यामुळे प्रवाशांना स्थानकांवर दीर्घकाळ थांबावे लागते. विशेषतः नोकरीवरून परतणाऱ्या नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे.

### खासदारांना प्रवाशांचे साकडे

मावळ लोकसभा मतदारसंघाचे खा. श्रीरंग बारणे यांनी या प्रश्नात लक्ष घालून बदलापूर-कर्जत मार्गावर अतिरिक्त लोकल सुरू करण्यासाठी पाठपुरावा करावा, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे. तिसरी व चौथी मार्गिका पूर्ण होण्यास अद्याप बराच कालावधी लागणार असल्याने तत्पूर्वी ठाणे-कर्जत मार्गावर किमान चार अतिरिक्त लोकल सुरू करून लोकलमधील मोठी वेळेची तफावत कमी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# खाडे परिवाराची समाजोपयोगी भेट




| माणगाव | प्रतिनिधी |

संतोष खाडे यांच्या वाढदिवसानिमित्त खाडे परिवाराने माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील प्रस्तुतीगृह येथे नवीन प्रवेशद्वार उभारले आहे. या कामासाठी खाडे परिवार व जितेंद्र लक्ष्मण भोनकर यांचेही मोलाचे योगदान लाभले.

उपजिल्हा रुग्णालयातील प्रस्तुतीगृहाच्या प्रवेशद्वाराची अवस्था अनेक दिवसांपासून जीर्ण झाली होती. तुटलेल्या प्रवेशद्वारामुळे रुग्ण, गर्भवती महिला तसेच त्यांच्या नातेवाईकांना विविध अडचणींचा सामना करावा लागत होता. याबाबत रुग्णालयातील गवळी यांनी खाडे यांचे लक्ष वेधले होते. तसेच रुग्णालय प्रशासनानेही या आवश्यक कामासाठी मदतीची अपेक्षा व्यक्त केली होती.

या मागणीची तात्काळ दखल घेत खाडे यांनी कोणतीही प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता प्रवेशद्वार उभारण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या पुढाकारातून आणि खाडे परिवाराच्या सहकार्याने हे काम पूर्णत्वास गेले. त्यामुळे आता प्रस्तुतीगृहात येणाऱ्या महिलांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना अधिक सुरक्षित व सुसज्ज सुविधा उपलब्ध होणार आहेत.

**रस्त्यांवरील पार्किंग हटवण्याची मागणी | ठोस कारवाई न झाल्यास जनआंदोलनाचा इशारा**

# धाटाव एमआयडीसीला 'केमिकल टँकरचा विळखा




| चणेरा | प्रतिनिधी |

रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसी परिसरात रस्त्यांवर होणाऱ्या अवजड वाहनांच्या बेकायदेशीर पार्किंगमुळे वाहतूक, सुरक्षा आणि नागरिकांच्या जीवितास गंभीर धोका निर्माण झाला आहे. या प्रश्नावर मनसेना आक्रमक झाली आहे. मनसेचे रोहा तालुका अध्यक्ष अक्षय राटाटे यांनी प्रशासनाला थेट इशारा देत, पुढील आठ दिवसांत रस्त्यांवरील बेकायदेशीर पार्किंग हटवून ठोस कारवाई न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असे स्पष्ट केले आहे.

धाटाव एमआयडीसी परिसरात दररोज शेकडो केमिकल टँकर तसेच इतर अवजड वाहने मुख्य रस्त्यांच्या कडेला तासन्तास उभी राहत असल्याची तक्रार स्थानिक नागरिकांकडून सातत्याने होत आहे. या वाहनांमुळे रस्ते अरुंद होत असून वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. त्यामुळे अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत असल्याचे मनसेचे म्हणणे आहे.

> अनेक टँकरमध्ये धोकादायक रासायनिक पदार्थांची वाहतूक केली जाते. अशा परिस्थितीत एखादा अपघात, गळती किंवा आग लागल्यास मोठ्या प्रमाणावर जीवितहानी आणि वित्तहानी होऊ शकते. त्यामुळे हा केवळ वाहतुकीचा प्रश्न नसून सार्वजनिक सुरक्षेशी संबंधित अत्यंत गंभीर विषय आहे.
>
> -अक्षय राटाटे
> मनसेचे रोहा तालुका अध्यक्ष

दरम्यान, जैनवाडी स्टॉप परिसरात खासगी पार्किंग व्यवसाय मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याचा आरोपही मनसेने केला आहे. संबंधित पार्किंगला आवश्यक शासकीय परवानग्या आहेत का? तसेच ते कोणाच्या आश्रयाखाली सुरू आहे, याची सखोल चौकशी प्रशासनाने करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करून पार्किंग व्यवसाय सुरू असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिकाही मनसेने घेतली आहे.

मनसेच्या वतीने प्रशासनाला तातडीने रस्त्यांवरील बेकायदेशीर पार्किंग हटविणे, वाहतुकीसाठी अडथळा ठरणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन धाटाव एमआयडीसी परिसरात शिस्तबद्ध पार्किंग व्यवस्था निर्माण करणे या मागण्या करण्यात आल्या आहेत.

यासंदर्भात प्रशासनाने त्वरित पावले उचलली नाहीत, तर स्थानिक नागरिकांना सोबत घेऊन मनसे रस्त्यावर उतरेल आणि तीव्र आंदोलन छेडेल, असा इशारा अक्षय राटाटे यांनी दिला आहे.

# शांतता, करार चालू आहे

डोनाल्ड ट्रम्प स्वतःला अमेरिकेचेच नव्हे तर सगळ्या जगाचे बादशाह समजतात. मध्यंतरी त्यांनी व्हेनेझुएलाच्या राष्ट्रप्रमुखांच्या बंगल्यात सैनिक घुसवून त्यांना अमेरिकेत उचलून आणले. त्यांच्यावर अंमली पदार्थांच्या तस्करीचा खटला भरला. मनात आले तर आपण कुठेही कोणावरही हल्ला करू शकतो, कुठलाही देश कबजात करू शकतो, त्या देशांचा तेल व्यापार चालवायला घेऊ शकतो असा त्यांचा समज आहे. इस्रायल हे जगावरून ओवाळून टाकलेले कारटे आहे. इराणला कायमचे संपवून टाकू असे इस्रायलच्या नेतान्याहू यांनी ट्रम्प यांच्या डोक्यात भरवले. एकीकडे, मी जगातली इतकी युध्दे बंद केली, मला शांततेचे नोबेल द्या असे ट्रम्प मजकूर म्हणत होते. आपल्या कार्यकाळात जगात कोणत्याही देशातल्या युध्दात भाग घेण्यासाठी अमेरिकी सैनिक जाणार नाहीत असे आश्वासनही त्यांनी आपल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत दिले होते. पण आपलाच रिपब्लिकन पक्ष व मतदार यांना तोंडघशी पाडून ट्रम्प यांनी बेमुर्वतपणे २८ फेब्रुवारी रोजी इराणवर हल्ला केला आणि सगळ्या जगाच्या अर्थव्यवस्थेची ऐशी की तैशी करून टाकली. पण इराणने त्यांची सर्व मिजास उतरवली. आज ट्रम्प काहीही म्हणोत, पण अमेरिकेचे हात पोळले गेल्यानेच तेच इराणसोबत शांती करारासाठी अधिक उत्सुक व इच्छुक होते. त्यानुसार अखेर हा करार झाला आहे. जवळपास चार महिन्यांच्या संघर्षानंतर दोन्ही देशांनी युद्धविराम, होर्मुझ सामद्रधुनी पुन्हा खुली करणे, अणुकार्यक्रमावर चर्चा आणि आर्थिक निर्बंधांमध्ये टप्प्याटप्प्याने सवलत यांसारख्या मुद्द्यांवर सहमती दर्शविली आहे. हा करार टिकलाच तर ते स्वागतार्हच असेल. कारण, त्यामुळे जगाची अर्थव्यवस्था रुळावर यायला मदत होईल. भारतात एकीकडे अजूनही मान्सून पुढे सरकत नसल्याची चिंता असताना युध्दाचे काळे ढग दूर होत असतील तर ते चांगलेच होईल. होर्मूझ आखातावरील बंदी हटवणे या करारातला कळीचा मुद्दा होता. या संघर्षादरम्यान होर्मुझ सामुद्रधुनीत जहाजवाहतूक विस्कळीत झाली, अमेरिकेने इराणवर नौदल नाकेबंदी लादली आणि जागतिक तेलपुरवठ्यावर गंभीर परिणाम झाला. जगातील सुमारे २० टक्के तेल वाहतूक होर्मुझ सामुद्रधुनीतून होते. त्यामुळे या मार्गावरील अडथळ्यामुळे तेलाचे दर वाढले आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर मंदीचे सावट निर्माण झाले.

### इराणला फायदेशीर

खामेनी मारले गेल्यानंतर इराण कोसळेल अशी ट्रम्प यांची अपेक्षा होती. इराणी जनतेने आता तेथील सरकारविरुध्द उठाव करावा असे आवाहन त्यांनी वारंवार केले. इस्रायलने ज्या आतमध्ये घुसून इराणच्या प्रमुख नेत्यांना मारले ते पाहता इराण नावाची सत्ता पुरती पोखरली गेली आहे असे सर्वांना वाटत होते. खामेनी यांच्या चिरंजीवांना उत्तराधिकारी करण्यात आले. पण ते एकाही जाहीर कार्यक्रमात तोंड दाखवू धजावलेले नाहीत. त्यामुळे ट्रम्प यांच्या आवाहनानुसार उठाव होणार असेच चित्र पाश्चात्य माध्यमांमध्ये निर्माण झाले. पण तो उठाव इराणमध्ये आजतागायत झालेला नाही. उलट ट्रम्प गेले अनेक दिवस शांतता करार होणार असे सांगत असताना इराण मात्र शांतपणे वाट पाहत होता. ट्रम्प यांनी रविवारी अखेर करार झाला अशी सुवार्ता दिल्यावरही इराण बरेच तास गप्प होता. युध्दविरामासाठीच्या चर्चेसाठीही ट्रम्प यांनी पाकिस्तानला अक्षरशः भरीला घातले. ज्याचे पूर्ण दिवाळे निघाले आहे व जो देश स्वतः दहशतवादी कृत्ये आणि अमली पदार्थांच्या व्यापारामुळे बदनाम आहे त्या पाकिस्तानच्या खांद्यावर हात ठेवून अमेरिकेने वाटचाल करावी हाच एक विनोद होता. पण ती ट्रम्प यांची गरज होती. यामुळे अमेरिकेची इभ्रत मातीमोल झाली तरी त्यांना त्याची पर्वा नव्हती व नाही. त्यातूनच या युध्दविरामाच्या चर्चेला जबरदस्तीने पुढे नेण्यात आले व अखेर कालच्या करारापर्यंत या गोष्टी येऊन ठेपल्या आहेत. अखेर दोन्ही बाजूंकडून १४ कलमी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. या करारानुसार ६० दिवसांचा विस्तारित युद्धविराम लागू करण्यात आला आहे. होर्मुझ सामुद्रधुनी सर्व व्यावसायिक जहाजांसाठी खुली करण्यात येणार आहे. अमेरिकेने नौदल नाकेबंदी टप्प्याटप्प्याने हटविण्याचे मान्य केले आहे. इराणने अण्वस्त्र विकसित न करण्याची भूमिका पुन्हा स्पष्ट केली असून आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेच्या देखरेखीखाली अणुकार्यक्रमाबाबत सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे. त्याबदल्यात आर्थिक निर्बंध सैल करण्याची आणि इराणच्या आर्थिक पुनर्बांधणीसाठी अब्जावधी डॉलरच्या सहाय्याचा मार्ग खुला करण्याची तयारी अमेरिकेने दर्शविली आहे.

### इस्रायलचे काय

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या कराराला ''जागतिक मंदी टाळणारा ऐतिहासिक करार''असे संबोधले आहे. होर्मुझ सामुद्रधुनी खुली झाल्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा सुरळीत होईल आणि तेलाच्या किंमतींवरील दबाव कमी होईल, असा त्यांचा दावा आहे. तथापि, अमेरिकेतील अनेक पुराणमतवादी नेत्यांनी या करारावर टीका केली आहे. त्यांच्या मते इराणला आर्थिक सवलती देऊन अमेरिकेने खूप मोठी तडजोड केली आहे. इराणच्या नागरी अणुकार्यक्रमाला अप्रत्यक्ष मान्यता दिल्याबद्दलही काही नेत्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. इराणच्या दृष्टीने पाहिले तर हा करार आर्थिक जीवनरेखा ठरू शकतो. गेल्या काही वर्षांपासून अमेरिकन निर्बंधांमुळे इराणची अर्थव्यवस्था गंभीर अडचणीत होती. तेल निर्यातीवरील निर्बंध, गोठवलेली मालमत्ता आणि आर्थिक व्यवहारांवरील निर्बंध यामुळे इराणला मोठा फटका बसला होता. आता निर्बंध शिथिल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परंतु इराणमध्येही या कराराला विरोध होत आहे. कट्टरवादी गटांच्या मते हा करार म्हणजे अमेरिकेसमोर शरणागती आहे. काही जणांच्या मते इराणने होर्मुझ सामुद्रधुनीवरील दबावाचे महत्त्वाचे शस्त्र गमावले आहे. त्यामुळे देशांतर्गत राजकीय संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कराराचा सर्वात तात्काळ परिणाम तेलबाजारावर दिसून येईल. होर्मुझ सामुद्रधुनीतून सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती, कुवेत, इराक आणि इराण या देशांचे तेल जगभर निर्यात होते. संघर्षामुळे तेलाचे दर वाढण्याची भीती निर्माण झाली होती. सामुद्रधुनी खुली झाल्याने पुरवठा स्थिर राहील आणि तेलाच्या किमतींमध्ये अस्थिरता कमी होण्याची शक्यता आहे. ऊर्जा आयात करणाऱ्या भारत, चीन, जपान आणि युरोपीय देशांसाठी ही सकारात्मक बाब आहे. विशेषतः भारताच्या आयात बिलावर याचा अनुकूल परिणाम होऊ शकतो.या करारातील सर्वात मोठी अनिश्चितता म्हणजे इस्रायलची भूमिका. करारामुळे अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव कमी झाला असला तरी इस्रायल आणि इराणमधील वैर संपलेले नाही. लेबनॉन, हिजबुल्लाह आणि इतर प्रादेशिक गटांच्या प्रश्नांवर अजूनही मतभेद कायम आहेत. इस्रायलची युध्द खुमखुमी लक्षात घेता तो गप्प बसेल का हे पाहावे लागेल. त्यामुळेच या कराराला अंतिम समाधान म्हणता येणार नाही. हा केवळ पुढील चर्चांसाठीचा आराखडा आहे. ६० दिवसांच्या कालावधीत अणुकार्यक्रम, निर्बंध हटविणे, प्रादेशिक सुरक्षा आणि दीर्घकालीन शांतता यावर सविस्तर करार करण्याचे उद्दिष्ट आहे. या वाटाघाटी यशस्वी झाल्यास पश्चिम आशियात नव्या स्थैर्याचा अध्याय सुरू होऊ शकतो. मात्र त्या अपयशी ठरल्यास संघर्ष पुन्हा भडकण्याची शक्यताही कायम आहे.

---

**विचार**

# हर्षद मेहतानंतर राजेश मेहता

***भारतीय भांडवली बाजाराची नियामक संस्था असलेल्या 'सेबी'च्या डोळ्यात धूळफेक करून गुंतवणूदारांच्या पैशावर डल्ला मारण्याचे प्रकार अनेकदा घडले. 'राजेश एक्सपोर्टस' प्रकरणाने हेच केले. नियामक संस्था अधिक सक्षम बनवण्याची, नियम कडक करण्याची आणि पारदर्शकता वाढवण्याची चर्चा नेहमी होते, मात्र जागतिक स्तर, परदेशी उपकंपन्या, विविध देशांमधील व्यवहारामुळे सत्य शोधणे अधिक कठीण बनले आहे.***



**कैलास ठोळे**

भारतीय शेअर बाजाराने गेल्या काही दशकांमध्ये अनेक चढ-उतार पाहिले आहेत. काही कंपन्यांनी आपल्या कामगिरीने गुंतवणूकदारांचा विश्वास जिंकला, तर काहींनी फसवणूक, गैरव्यवहार आणि दिशाभूल करणाऱ्या आर्थिक अहवालांमुळे बाजाराच्या विश्वासाला तडा दिला. अलीकडेच समोर आलेल्या 'राजेश एक्सपोर्टस' प्रकरणाने कंपनीच्या बॅलन्स शीटमध्ये दिसणारे आकडे कितपत खरे असतात आणि त्यांची पडताळणी करणाऱ्या यंत्रणा किती सक्षम आहेत, असा प्रश्न पुन्हा एकदा उपस्थित केला आहे. सामान्य माणूस 'पंधरा लाख कोटी रुपयांचा घोटाळा' असा शब्दप्रयोग ऐकतो, तेव्हा त्याच्या डोळ्यांसमोर देशातील सर्वात मोठ्या आर्थिक गैरव्यवहारांचे चित्र उभे राहते. पंधरा लाख कोटी रुपये ही रक्कम इतकी प्रचंड आहे, की तिची कल्पना करणेही अवघड आहे. भारताच्या वार्षिक निर्यातीच्या मोठ्या भागाइतकी ही रक्कम आहे. त्यामुळे तीन हजार कोटी रुपयांच्या बाजारमूल्याची कंपनी इतक्या मोठ्या आकड्यांशी जोडली जाते, तेव्हा सामान्य गुंतवणूकदार गोंधळून जातो; परंतु या प्रकरणाचा गाभा समजून घेतला, तर लक्षात येते, की येथे पैशांची चोरी किंवा बँकांचे कर्ज बुडवण्यापेक्षा अधिक गंभीर ठरणारा प्रश्न आहे तो आर्थिक विश्वासार्हतेचा. शेअर बाजार विश्वासावर उभा असतो. गुंतवणूकदार एखाद्या कंपनीचे शेअर्स खरेदी करताना तिच्या उत्पादनांवर नव्हे, तर आर्थिक अहवालांवर, लेखापरीक्षणावर आणि व्यवस्थापनाच्या प्रामाणिकपणावर विश्वास ठेवतो. कंपनीने जाहीर केलेले उत्पन्न, नफा, मालमत्ता आणि व्यवसायाच्या व्याप्तीसंदर्भातले सर्व आकडे गुंतवणूकदारांच्या निर्णयाला दिशा देतात. हेच आकडे संशयास्पद ठरल्यास संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो.

'राजेश एक्सपोर्टस'चे प्रकरण नेमके याच कारणासाठी महत्त्वाचे ठरते. 'सेबी'च्या प्राथमिक निष्कर्षांनुसार कंपनीने गेल्या काही वर्षांमध्ये प्रचंड प्रमाणात विक्री झाल्याचे दाखवले; परंतु त्या विक्रीचा मोठा भाग प्रत्यक्ष व्यवहारांवर आधारित नसून कागदोपत्री असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. येथे एक गोष्ट स्पष्टपणे समजून घेणे आवश्यक आहे. पंधरा लाख कोटी रुपये म्हणजे कंपनीच्या तिजोरीत असलेले किंवा कुठे तरी गायब झालेले पैसे नव्हेत. हा आकडा कंपनीने दाखवलेल्या एकूण उलाढालीचा आहे. म्हणजेच प्रश्न पैशांच्या चोरीचा नाही, तर आर्थिक वास्तव आणि दाखवलेले वास्तव यातील तफावतीचा आहे. आजच्या कॉर्पोरेटजगतात आकडे हे शक्तिशाली शस्त्र बनले आहेत. मोठी उलाढाल, मोठे उत्पन्न आणि मोठी वाढ यांची भाषा गुंतवणूकदारांना आकर्षित करते. बाजारात कंपनीची प्रतिमा उंचावते. बँका अधिक विश्वासाने कर्ज देतात. संस्थात्मक गुंतवणूकदार पैसा गुंतवतात. विश्लेषक कंपनीच्या भविष्यासंबंधी सकारात्मक मत व्यक्त करतात. अशा वेळी या आकड्यांमागील वास्तव वेगळेच निघाले, तर नुकसान केवळ आर्थिक राहत नाही, तर नैतिक आणि संस्थात्मक स्वरूपाचेही असते. या प्रकरणाने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न समोर आणला आहे, तो म्हणजे लेखापरीक्षण व्यवस्थेची विश्वासार्हता. कोणत्याही कंपनीचे आर्थिक अहवाल स्वतंत्र लेखापरीक्षकांकडून तपासले जातात. त्यांचे काम म्हणजे कंपनीने दिलेली माहिती सत्य, अचूक आणि नियमांनुसार असल्याची खात्री करणे. अनेक वर्षे मोठ्या प्रमाणावर संशयास्पद व्यवहार होत असतील आणि ते लेखापरीक्षकांच्या नजरेतून सुटत असतील, तर ही बाब चिंताजनक आहे. अशा वेळी प्रश्न एका कंपनीपुरता न राहता संपूर्ण 'कॉर्पोरेट गव्हर्नन्स'च्या चौकटीवर येतो.

'राजेश एक्सपोर्टस' प्रकरणातील परदेशी उपकंपन्यांचा उल्लेख याच संदर्भात महत्त्वाचा आहे. आज व्यवसायाचे जागतिकीकरण झाले आहे. एका देशात मुख्यालय, दुसऱ्या देशात उत्पादन आणि तिसऱ्या देशात विक्री अशी व्यवस्था सामान्य झाली आहे; पण या जागतिक रचनेचा वापर पारदर्शकतेसाठी होतो की माहिती लपवण्यासाठी हा प्रश्न प्रत्येक वेळी विचारावा लागतो. नियामक संस्थांसाठीही ही मोठी कसोटी असते. सामान्य गुंतवणूकदाराच्या दृष्टीने या प्रकरणातील सर्वात मोठा धडा म्हणजे केवळ आकड्यांच्या मोहात न पडणे. अनेक गुंतवणूकदार कंपनीची उलाढाल किंवा बाजारातील प्रतिष्ठा पाहून गुंतवणूक करतात; परंतु उलाढाल मोठी असणे म्हणजे कंपनी मजबूत असणे, असे समीकरण नेहमीच खरे नसते. व्यवसायातून प्रत्यक्ष रोख प्रवाह किती निर्माण होतो, कर्जाचे प्रमाण किती आहे, नफा टिकाऊ आहे का, व्यवस्थापन किती पारदर्शक आहे, हे प्रश्न अधिक महत्त्वाचे असतात. शेअर बाजारात अनेकदा 'कथा' विकल्या जातात. एखादी कंपनी वेगाने वाढत आहे, जगभर विस्तार करत आहे, नवीन क्षेत्रात प्रवेश करत आहे, अशी कथा गुंतवणूकदारांना आकर्षित करते; परंतु शेवटी कोणतीही कथा आर्थिक वास्तवावर टिकली पाहिजे. अन्यथा, ती फक्त आकड्यांची जादू ठरते. आणि जादूचा पडदा सरकला की वास्तव समोर येते. या संपूर्ण प्रकरणात 'सेबी'ची भूमिकाही महत्त्वाची आहे. बाजार नियामक म्हणून गुंतवणूकदारांचा विश्वास टिकवून ठेवण्याची जबाबदारी तिच्यावर आहे. एखाद्या कंपनीने आर्थिक माहितीबाबत दिशाभूल केली असेल, तर त्यावर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

न्यायाच्या तत्त्वानुसार अंतिम निष्कर्ष येईपर्यंत कंपनीला आपली बाजू मांडण्याची संधी मिळाली पाहिजे. कारण नियामकांचा आरोप आणि न्यायालयीन किंवा अंतिम प्रशासकीय निष्कर्ष यांमध्ये फरक असतो. 'राजेश एक्सपोर्टस'ने सर्व आरोप फेटाळले आहेत आणि आपले आर्थिक अहवाल योग्य असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे अंतिम सत्य पुढील तपासणीतूनच समोर येईल; मात्र या टप्प्यावरही एक गोष्ट निर्विवादपणे स्पष्ट होते, ती म्हणजे कॉर्पोरेट जगतातील पारदर्शकता हा पर्याय नसून अत्यावश्यक खबरदारी आहे. भारतीय अर्थव्यवस्था आज जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. देशात लाखो नवे गुंतवणूकदार शेअर बाजाराकडे वळत आहेत. म्युच्युअल फंड, डीमॅट खाती आणि डिजिटल गुंतवणूक यामुळे भांडवली बाजाराचा विस्तार अभूतपूर्व वेगाने होत आहे. अशा काळात प्रत्येक आर्थिक घोटाळा किंवा संशयास्पद व्यवहार केवळ एका कंपनीची प्रतिमा मलिन करत नाही; तो संपूर्ण गुंतवणूक संस्कृतीवर परिणाम करतो. विश्वास हे बाजाराचे सर्वात मोठे भांडवल असते. बाजारात पैसा गमावल्यास गुंतवणूकदार पुन्हा कमवू शकतो; परंतु विश्वास गमावलेला गुंतवणूकदार बाजारापासून कायमचा दूर जाऊ शकतो. म्हणूनच नियामक, लेखापरीक्षक, संचालक मंडळे आणि व्यवस्थापन यांच्यावर अधिक जबाबदारी येते. त्यांना केवळ नियमांचे पालन करायचे नसते, तर विश्वासाची जपणूक करायची असते.

'राजेश एक्सपोर्टस' प्रकरणात कोणतेही तथ्य पुढे येवो; या घटनेने एक महत्त्वाचा संदेश दिला आहे. आर्थिक अहवालातील प्रत्येक आकडा हा केवळ संख्या नसतो, तर तो लाखो गुंतवणूकदारांच्या विश्वासाचे प्रतीक असतो. त्या आकड्यांपुढे प्रश्नचिन्ह निर्माण होते, तेव्हा केवळ एका कंपनीची विश्वासार्हता धोक्यात येत नाही, तर संपूर्ण बाजारव्यवस्थेच्या नैतिकतेवर प्रश्न उपस्थित होतात. आज गरज आहे ती अधिक पारदर्शक, अधिक जबाबदार आणि अधिक उत्तरदायी कॉर्पोरेट संस्कृतीची. कारण आकडे कितीही मोठे असले, तरी त्यांच्यापेक्षा मोठी बाब म्हणजे विश्वास. आणि एकदा विश्वास ढासळला, तर कोणताही ताळेबंद त्याची भरपाई करू शकत नाही. त्यामुळे पंधरा लाख कोटींच्या या कथेकडे केवळ एका कंपनीच्या संकटाच्या रूपात न पाहता, भारतीय कॉर्पोरेट व्यवस्थेला मिळालेल्या गंभीर इशाऱ्याच्या रूपात पाहणे अधिक योग्य ठरेल.

---

**चर्चा आजची**

# 'पक्षांतर' राजकारणाची कीड

**सुयोग आंग्रे**

तृणमूल काँग्रेसपाठोपाठ शिवसेना-उद्धव गटातील नऊपैकी सहा लोकसभेच्या सदस्यांनी शिवसेना-शिंदे यांच्यात जाण्याची तयारी दाखवल्याने ते सत्ताधारी पक्षासोबत जाण्यास उत्सुक असल्याचे दिसून येत नाही, तर भारतीय राजकारणात संधीसाधूपणा वाढत असल्याचेही अधोरेखित होते. शिवसेनेतला हा दुसरा ब्रेक आहे. यापूर्वीही त्यांचे आमदार आणि खासदार फुटले असून पक्षाचे निवडणूक चिन्ह गमावले आहे. या आणखी एका धक्क्यातून सावरणे त्याच्यासाठी कठीण होईल. आता त्याचे अस्तित्व वाचवण्याचे संकट त्याच्यासमोर आहे. या निमित्ताने भारताच्या राजकारणात पक्षांतर करणे हि सहज शक्य असणारी गोष्ट देशाच्या वैचारिक अधिष्ठानाला तडा देणारी ठरत आहे. भारताची जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून प्रतिष्ठा आहे, जिथे संपूर्ण राजकीय रचना आदेशावर आधारित आहे, परंतु अलिकडील घटनांमुळे या संरचनेला धक्का बसला आहे. अलिकडेच, एनडीए आणि शिवसेना खासदारांना आपला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी तृणमूल काँग्रेसच्या सुमारे २० लोकसभेच्या सदस्यांनी एका छोट्या अज्ञात प्रादेशिक पक्षात विलीन होऊन शिंदे गटाकडे वाटचाल केल्याने पक्षांतराची समस्या पुन्हा राष्ट्रीय चर्चेत आली आहे. स्वातंत्र्यानंतर ही संस्कृती राजकारणाचा अविभाज्य भाग राहिली आहे. १९५१ ते १९६७ या १६ महिन्यांत ५४२ आमदारांनी पक्ष बदलला, तर १९६७-६८ या अवघ्या १२ महिन्यांत अशा ४३८ प्रकरणांची नोंद झाली. या राजकीय अराजकतेने अनेक सरकारे पाडली आणि १९८५ मध्ये ५२ व्या घटनादुरुस्तीद्वारे १०वी अनुसूची आणली गेली, परंतु हा कायदा देखील पूर्णपणे अपयशी ठरल्याचे आकडेवारीवरून दिसून येते. पक्षांतरामुळे एखाद्या विशिष्ट पक्षात केवळ अस्थिरता निर्माण होत नाही तर मतदारांचा विश्वासही डळमळीत होतो. १९६७-७० च्या दरम्यान राज्यांमध्ये १२४० हून अधिक पक्षांतर झाले, त्यापैकी बहुतेक मंत्रीपदाच्या लालसेने किंवा आर्थिक लाभाने प्रेरित होते. कायद्याच्या अंमलबजावणी नंतर, १९८५-९५ च्या दशकात ही संख्या सुमारे १२० पर्यंत घसरली, जी ७० टक्क्यांनी सुरुवातीची घट दर्शवते, परंतु २००० नंतर ती पुन्हा वाढली. २०००-२०२३ दरम्यान विविध पक्षांकडून शेकडो प्रकरणे नोंदवली गेली, ज्यात भाजप आणि काँग्रेस या दोन्हींचा समावेश आहे. महाराष्ट्रातील २०२२ चे संकट याचे ज्वलंत उदाहरण आहे, जिथे एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील ४० शिवसेना आमदारांच्या बंडाने उद्धव ठाकरे सरकार पाडले. त्याचप्रमाणे, मध्य प्रदेश (२०२०), कर्नाटक (२०१९) आणि अरुणाचल प्रदेश (२०१६) मध्ये मोठ्या प्रमाणावर पक्षांतराने लोकशाही जनादेशाचा भंग केला. या घटनांनी हे सिद्ध केले की १० व्या अनुसूचीतील त्रुटी पक्षांतराला वैध ठरवत आहेत. या समस्येचा राजकीय स्थिरतेवर सर्वात खोल परिणाम होतो. युतीच्या काळात जिथे केंद्रात आणि राज्यांमध्ये बहुसंख्य बहुमत नाजूक असते, तिथे एका लहान गटाचे पक्षांतर सरकारला अस्थिर करू शकते. यामुळे धोरणात्मक सातत्य बाधित होते, विकास योजना ठप्प होतात आणि जनहिताचे प्रश्न सत्तासंघर्षात दडले जातात. एका अभ्यासात असे दिसून आले आहे की पक्षांतर करणाऱ्या आमदारांना सामान्य आमदारांपेक्षा दोन ते तीन पटीने मंत्रीपद मिळण्याची शक्यता असते, ज्यामुळे भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळते. पक्षाच्या अजेंड्यावर उमेदवारनिवडलेल्यामतदारांनाफसवणूकझाल्याचेजाणवते. विद्यमान पक्षांतरविरोधी कायद्याची सर्वात मोठी कमकुवतता म्हणजे सभापतींची भूमिका, जी अनेकदा सत्ताधारी पक्षाच्या प्रभावाखाली असते. निर्णय दीर्घ कालावधीसाठी प्रलंबित राहतात, ज्यामुळे नेत्यांना शिक्षेशिवाय त्यांची जागा ठेवता येते. २००३ च्या ९१ व्या घटनादुरुस्तीने एक तृतीयांश ऐवजी दोन तृतीयांश सदस्यांच्या विलीनीकरणास परवानगी दिली, परंतु तृणमूल काँग्रेसच्या २० खासदारांनी या सूटचा फायदा घेतला आणि एका लहान पक्षात विलीन केले. सर्वोच्च न्यायालयाने सभापतींच्या निर्णयावर न्यायालयीन पुनर्विलोकनाला वाव दिला, परंतु प्रत्यक्षात विलंब होतच राहिला. परिणामी कायद्याचा उद्देशच फसला. सर्व विश्लेषणे दर्शवतात की हा कायदा पक्षांतर रोखण्यात यशस्वी ठरला नाही. पक्षांतराची संस्कृती भ्रष्टाचाराला संस्थात्मक स्वरूप देते असे म्हणतात. आणि अनेकदा ते सत्य आहे हे समोर आले आहे. पक्षांतर आता खुलेआम होत आहे, जिथे खासदार आणि आमदारांना मंत्रीपदे, तिकीट किंवा अन्य लाभ देऊन आपल्या बाजूने आणले जाते. लहान पक्षांच्या फुटीमुळे फेडरल रचनेवरही परिणाम होतो. २०००-२०१५ दरम्यान अशी डझनभर प्रकरणे नोंदवली गेली ज्यात मोठ्या प्रमाणात पक्ष बदलले गेले. या आजाराला आळा घालण्यासाठी मजबूत कायदा आवश्यक आहे. अपात्रतेचा अधिकार सभापतींऐवजी स्वतंत्र न्यायाधिकरण किंवा निवडणूक आयोगाकडे सोपवावा, जेणेकरून पक्षपात दूर होईल. विलीनीकरणाची सूट पूर्णपणे रद्द करावी किंवा किमान मर्यादा वाढवावी. पक्षांतर करणाऱ्याला तात्काळ अपात्र ठरवून चालणार नाही तर पुढील पाच वर्षे निवडणूक लढविण्यासही बंदी घातली पाहिजे. पक्षांतर्गत लोकशाही मजबूत करण्यासाठी निवडणूक आयोगाने पक्षांच्या अंतर्गत निवडणुकांवर लक्ष ठेवले पाहिजे. मतदार जागृती मोहीम राबवून अशा नेत्यांबद्दल जनतेला सावध केले पाहिजे. काही लोक पक्षांतराला अभिव्यक्ती स्वातंत्र्य मानतात, परंतु प्रत्यक्षात ते तत्त्वांपेक्षा सत्तेच्या लालसेने प्रेरित होते. जर्मनी आणि न्यूझीलंड सारख्या देशांमध्ये पक्षांतर रोखण्यासाठी कठोर तरतुदी यशस्वी झाल्या आहेत, जिथे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामूहिक आदेश यांचा समतोल राखला गेला आहे. भारतात कायद्याचे पुनरावलोकन करण्यासाठी संसदेने एक संयुक्त समिती स्थापन करावी. या समस्येकडे दुर्लक्ष करत राहिल्यास लोकशाही ही केवळ निवडणूक औपचारिकता बनून जाईल. पक्षांतर हा भारतीय राजकारणाचा जुना आजार आहे. भक्कम कायदे, पारदर्शकता आणि अंतर्गत सुधारणा यातूनच हे थांबवता येईल. तरच जनादेशाची प्रतिष्ठा अबाधित राहील आणि लोकशाही खऱ्या अर्थाने बळकट होईल. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी जनतेला उत्तरदायी असले पाहिजे, हीच या व्यवस्थेची खरी कसोटी आहे.

---

**लोकसंसद**

### ज्येष्ठ गायक पंडित प्रसाद सावकार काळाच्या पडद्याआड

गेल्या सात दशकांहून अधिक काळ आपल्या अष्टपैलू अभिनय आणि सुगम व शास्त्रीय गायकीने संगीतनाट्य रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे पंडित प्रसाद सावकार यांच्या जाण्याने संगीत नाटक परंपरेतील एका सशक्त अभिनयपर्वाचा आणि संगीत नाटकांच्या वैभवाचा सुवर्णकाळ लयास गेला आहे. गोमंतकीय संगीत रंगभूमीची मोठी परंपरा असलेल्या प्रसिद्ध सावकार घराण्यात प्रसाद सावकार यांचा जन्म झाला होता. खरे तर अनेक कारणांमुळे संगीत नाटके त्या काळात मागे पडली होती आणि संगीत नाटकांचा प्रेक्षकवर्ग मोठ्या प्रमाणात कमी झाला होता. अशा संगीत रंगभूमीच्या पडत्या काळात १९६० च्या दशकात विद्याधर गोखले, पंडित जितेंद्र अभिषेकी आणि पंडित वसंतराव देशपांडे यांच्यासह प्रसाद सावकार यांच्या गायकीच्या जोरावर संगीत नाटकांनी पुन्हा भरारी घेतली आणि संगीत नाटकांचे सुवर्णयुग पुन्हा सुरू झाले. मग त्यांनी मागे वळून पाहिले नाही. 'कट्यार काळजात घुसली', 'पंडितराज जगन्नाथ', 'सुवर्णतुला', 'मानापमान', 'सौभद्र' आणि 'मंदारमाला' यांसारख्या अनेक गाजलेल्या रसिकप्रिय संगीत नाटकांचे हजारो प्रयोग त्यांनी केले. त्यांनी गायलेली 'नारायणा रमारमणा' (संगीत जय जय गौरीशंकर), 'जय गंगे भागीरथी' (पंडितराज जगन्नाथ), 'रागिणी मुखचंद्रमा' (संगीत सुवर्णतुला) आणि 'घेई छंद मकरंद' व 'मुरलीधर श्याम' (कट्यार काळजात घुसली) ही नाट्यपदे आजही रसिकांच्या मनात अढळ स्थान टिकवून आहेत. त्यांचे 'संत गोरा कुंभार' या चित्रपटातील 'ऊठ पंढरीच्या राजा' या भक्तीगीताचे भावस्पर्शी स्वर मराठी मनावर कायमचे कोरले गेले आहेत. संगीत नाट्यातील अमूल्य योगदानासाठी त्यांना 'पद्मश्री' पुरस्कारासह अनेक पुरस्कारांनी यथोचित गौरविण्यात आले होते. पं. प्रसाद सावकार यांना भावपूर्ण आदरांजली!

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

---

**दिनविशेष**

# जागतिक सिकलसेल दिन

सिकलसेल हा अनुवंषिक आजार असून आईवडिलांकडून अपत्याला होत असल्याने याबाबत वेळीच रक्ताची तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. १९ जून हा सिकलसेल दिवस म्हणून साजरा केला जात असून सद्यस्थितीत राज्यात एकूण सिकलसेलचे २७ हजार रुग्ण आढळले असून व्यापक चाचणी करण्यात आल्यास दीड लाख रुग्ण आढळून येतील, असे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. त्यामुळे राज्यातील जास्तीत जास्त नागरिकांनी आपली सिकलसेलची रक्त तपासणी आपल्या जवळच्या शासकीय आरोग्य केंद्रामध्ये जाऊन करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य विभागानेही केले आहे. सिकलसेल नियंत्रण कार्यक्रमांतर्गत सिकलसेल आजारविषयी नागरिकांमध्ये जनजागृती, रुग्णांना मोफत औषधे आणि त्यांचे समुपदेशन केले जाते. याशिवाय, मोफत सोल्युबिलीटी चाचणी, इलेक्ट्रोफोरेसिस केंद्रावर मोफत इलेक्ट्रोफोरेसिस चाचणी, सिकलसेल रुग्ण व्यक्तींसाठी नियमित आरोग्य तपासणी, रुग्णांना गरजेनुसार फॉलीक ॲसिडच्या गोळ्या, ॲन्टीबायोटीक्स (प्रतिजैविके), वेदनानाशक औषधांचा पुरवठा, आवश्यकतेनुसार रक्त चाचण्यांची सुविधा, रक्तपेढी असल्यास सिकलसेल रुग्णांना रक्तसंक्रमण सुविधा, एचपीएलसी चाचणी केंद्रामध्ये मोफत चाचणी, तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यासाठी टेलिमेडिसीन आदी सुविधा आरोग्य विभागाच्या मार्फत पुरविल्या जातात. सिकलसेल आजार हा आनुवंशिक असून आई-वडिलांपासून अपत्यांना होतो. सिकलसेल रक्त पेशीशी संबंधित आजार आहे. सामान्य रक्तपेशी या वर्तुळाकार व लवचिक असतात; तर सिकलसेल रक्तपेशी या विळ्याच्या आकाराच्या व ताठर असतात. सशक्त लाल रक्त पेशी रक्त वाहिन्यांतून सरळ निघून जातात. परंतु, सिकलसेल आजाराच्या रक्तपेशी वाहिन्यांना चिकटून राहतात. त्यामुळे अडथळा निर्माण होऊन त्या भागातील रक्तपुरवठा खंडित होतो. त्याला सिकलसेल क्रायसिस म्हणतात. यामुळे असहा वेदना होतात. अशी इजा वारंवार झाल्यामुळे अवयवाला जबरदस्त इजा होऊन तो अवयव निकामी होतो. प्लीहा मध्ये नष्ट झालेल्या रक्तपेशी जमा होतात, सिकलसेल आजाराच्या रक्तपेशी अडकल्यामुळे प्लीहेवर जबरदस्त सूज येते. त्यामुळे त्याची कार्यक्षमता कमी होते. यामुळे आजारा विरुद्धची रोगप्रतिकारक क्षमता कमी होते. रोगप्रतिकारक क्षमता कमी झाल्यामुळे आजाराचे प्रमाण अधिक वाढते. हा आजार रक्तातील हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे, हातापायावर सूज येणे, भूक मंदावणे,सांधे दुखणे, असह्य वेदना होणे, लवकर थकवा येणे, चेहरा निस्तेज दिसणे आदी लक्षणे दिसतात. सिकलसेल हा अनुवंशिक आजार असून या आजाराचा संपूर्ण उपचार नाही पण नियंत्रण करणे शक्य आहे. सिकलसेल रुग्णांना नियमित आणि समतोल आहार आवश्यक आहे. सिकलसेल रुग्णाचे योग्य औषधोपचाराने आयुष्य वाढते. सिकलसेलग्रस्त रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून नियमित तपासणी व रक्त चाचणीची आवश्यकता असते, फॉलिक ॲसिडच्या गोळ्या निदमित घेणे, सोडामिंटच्या गोळ्यांचे सेवन महतत्वाचे असते. भरपूर पाणी पिणे (दररोज ८ ते १० ग्लास), वेदनाशामक गोळ्या, नियमित तपासणी व सल्ला घेणे. गरज भासल्यास रक्त संक्रमण करणे. समतोल आहार : सिकलसेल रुग्णांनी आहारात विविधता ठेवावी. दिवसातून तीन वेळा आहार घ्यावा. मासे, अंडी, संत्री, हिरव्या पालेभाज्या, मोड आलेली कडधान्य, शेंगा, झिंक असलेले पदार्थ खाणे- बोनमरो ट्रान्सप्लांटेशन करून हा आजार पूर्णतः बरा होऊ शकतो. सिकलसेलग्रस्त रुग्णांना (एसएस पॅटर्न) संजय गांधी निराधार योजने अंतर्गत शासनाचा आर्थिक लाभ मिळतो. महत्त्वाचे म्हणजे, सिकल सेल आजार आता दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१७ अंतर्गत समाविष्ट करण्यात आला आहे, ज्यामुळे या आजाराने बाधित झालेल्या व्यक्तींना, विशेषतः मुलांना, शैक्षणिक आरक्षण व सामाजिक मदत मिळण्याचा अधिकार मिळाला आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

१९ जून
१) श्रीम.श्रद्धा प्रवीण शहा
चेंढरे, अलिबाग, १९-६-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

**वाढदिवस साजरा करा अन्नदानाने**

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# नालेसफाईची कामे अपूर्ण

## • मिरा-भाईंदरमध्ये पाणी तुंबण्याची भीती



**। पालघर । प्रतिनिधी ।**

दरवर्षीप्रमाणे यंदाही पावसाळ्यापूर्वी मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नालेसफाई केली जात आहे. मात्र पावसाळा उंबरठ्यावर येऊन ठेपला असतानाही शहरातील अनेक भागांमध्ये नालेसफाईची कामे अपूर्ण असल्याचे वास्तव समोर आले आहे. तब्बल १७ कोटी रुपयांच्या खर्चातून नाले आणि गटारे स्वच्छ करण्यासाठी कंत्राटे देण्यात आल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला असला, तरी प्रत्यक्ष पाहणीमध्ये अनेक ठिकाणी नाल्यांमध्ये गाळ, प्लास्टिक, कचरा आणि साचलेली घाण मोठ्या प्रमाणात कायम असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होऊनही अपेक्षित परिणाम कुठेच दिसून येत नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

विशेष म्हणजे नालेसफाईची निश्चित मुदत संपूनही अनेक ठिकाणी कामे अपूर्ण अवस्थेत असल्याचा आरोप स्थानिकांकडून करण्यात येत आहे. काही भागांमध्ये गाळ पूर्णपणे बाहेर काढण्यात आलेला नाही, तर काही ठिकाणी बाहेर काढलेला गाळ अनेक दिवस नाल्यांच्या कडेलाच पडून असल्यामुळे तो पुन्हा पावसाच्या पाण्यासोबत नाल्यात जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिणामी, कागदोपत्री कामे पूर्ण झाल्याचा दावा आणि प्रत्यक्षातील परिस्थिती यामध्ये मोठी तफावत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

याशिवाय काही ठिकाणी खासगी जागांचे संरक्षण करण्यासाठी नाल्यांचा नैसर्गिक प्रवाह बदलण्यात आल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. नाल्यांचा मूळ मार्ग बदलल्यास पावसाच्या पाण्याचा निचरा विस्कळीत होण्याची शक्यता असून भविष्यात अनेक भागांमध्ये पाणी तुंबणे, घरांमध्ये पाणी शिरणे आणि नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाची तांत्रिक आणि स्वतंत्र चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणीही जोर धरू लागली आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार अनेक नाल्यांमध्ये अजूनही प्लास्टिक पिशव्या, बांधकामाचा मलबा, झाडांच्या फांद्या आणि इतर घनकचरा मोठ्या प्रमाणात अडकून पडलेला आहे. काही ठिकाणी साफसफाई केवळ वरवर करण्यात आली असून नाल्यांच्या तळातील गाळ तसाच राहिल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे पहिल्याच मुसळधार पावसानंतर शहरातील विविध भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याचा धोका नाकारता येत नाही.

### कामांची सखोल तपासणी करण्याची मागणी

दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाईवर मोठ्या प्रमाणात सार्वजनिक निधी खर्च केला जातो. मात्र त्यानंतरही नागरिकांना पाणी तुंबणे, वाहतूक कोंडी, दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि साथीच्या आजारांचा धोका यासारख्या समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यामुळे केवळ कागदोपत्री अहवालांवर समाधान न मानता प्रत्यक्ष कामांची सखोल तपासणी व्हावी, दोषी आढळणाऱ्या कंत्राटदारांवर कठोर कारवाई करावी आणि उर्वरित नालेसफाई तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

## आगीत २५ जनावरांचा होरपळून मृत्यू

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**

खेड तालुक्यातील रजवेल मोहल्ला येथे गुरुवारी (दि.१८) पहाटे गुरांच्या गोठ्याला भीषण आग लागली. या आगीत १७ म्हशी, १ गाय आणि ७ वासरे अशा एकूण २५ जनावरांचा होरपळून मृत्यू झाला असून दोन म्हशींना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. तसेच, गोठ्याचेदेखील मोठे नुकसान झाले आहे. रजवेल मोहल्ला येथे पहाटे सुमारे ५.१० वाजण्याच्या सुमारास गोठ्याला अचानक आग लागली. अवघ्या काही मिनिटांत आगीने रौद्र रूप धारण केल्याने गोठ्यातील जनावरे आत अडकून पडली. घटनेची माहिती मिळताच खेड नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. अग्निशमन पथकाच्या अथक प्रयत्नानंतर आग नियंत्रणात आली. मात्र, तोपर्यंत २५ जनावरांचा मृत्यू झाला होता. यात १७ म्हशी, १ गाय आणि ७ वासरांच्या समावेश आहे. दोन म्हशींना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. मात्र या दुर्घटनेमुळे पशुपालकाचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून संबंधित यंत्रणांकडून तपास सुरू आहे.

## विविध फळझाडांची लागवड

### • रोटरी क्लब ऑफ खोपोलीचा स्तुत्य उपक्रम

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत रोटरी क्लब ऑफ खोपोली यांच्या वतीने चौक येथील राधेश्याम गोशाळा परिसरात वृक्षारोपण उपक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमांतर्गत आंबा, सीताफळ, लिंबू, नारळ, चिकू आणि बेल आदी विविध प्रजातींच्या फळझाडांची लागवड करण्यात आली.

मोरबे धरणाच्या जलाशयालगत व वर्षभर मुबलक पाणी उपलब्ध असलेल्या परिसरात हे वृक्षारोपण करण्यात आले. भविष्यात ही झाडे पर्यावरण समृद्ध करण्यासोबत जैवविविधतेच्या संवर्धनालाही चालना देतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. तसेच गोशाळा परिसराचे सौंदर्य वाढविणे आणि पर्यावरणीय संतुलन राखणे यासाठीही या वृक्षारोपणाचा मोठा उपयोग होणार आहे. विशेष म्हणजे, या फळझाडांचा भविष्यात मनुष्य, प्राणी आणि पक्षी या सर्वांनाच लाभ होणार असून पर्यावरणीय साखळी अधिक सक्षम होण्यास मदत मिळणार आहे. भविष्यात फळझाडांची वाढती गरज लक्षात घेऊन पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आल्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

## रस्त्यांवरील खड्ड्यांच्या तक्रारी एका क्लिकवर

**मुंबई :** नागरिकांच्या तक्रारींचे जलद व प्रभावी निवारण करण्याच्या उद्देशाने बृहन्मुंबई महानगरपालिकेने या वर्षी 'मायबीएमसी मार्ग' ही एकात्मिक तक्रार व्यवस्थापन प्रणाली कार्यान्वित केली आहे. या प्रणालीद्वारे नागरिकांना महानगरपालिकेशी संबंधित विविध ११४ प्रकारच्या तक्रारी एकाच ॲप्लिकेशनद्वारे नोंदविता येणार असून त्यांचा पाठपुरावादेखील करता येणार आहे. या अंतर्गत 'मायबीएमसी मार्ग' प्रणालीवर रस्त्यांवरील खड्ड्यांच्या तक्रारी नोंदविण्याची सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आली आहे.



## 'आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती' पुस्तकाचे प्रकाशन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

समाजकल्याण विभागाचे सह आयुक्त प्रमोद बळीराम जाधव हे अलिबाग तालुक्यातील चरी येथील रहिवासी आहेत. त्यांच्या लिखित आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच करण्यात आले. महाराष्ट्र राज्य समाजकल्याण विभागाच्या आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा पार पडला.

वनराई संस्था आणि कृषी विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने पुणे येथील वनराई मुख्यालयातील इको-हॉलमध्ये हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभाचे अध्यक्षस्थान वनराईचे गिरीश गांधी यांनी भूषविले. यावेळी कृषी प्रक्रिया व नियोजन, विस्तारचे कृषी संचालक, विनयकुमार आवटे, कृषी जैवविविधता तज्ञ संजय पाटील, पुणे येथील वैद्य खडीवाले वैद्यकत संशोधन संस्थेचे कार्यकारी विश्वस्त विनायक वैद्य खडीवाले, पुस्तकाचे लेखक आणि समाजकल्याण विभागाचे सह आयुक्त प्रमोद जाधव, वनराईचे सागर धारिया, अमित वाडेकर, ज्येष्ठ पत्रकार मधू कांबळे, प्रसिद्ध लेखक गौतमीपुत्र कांबळे, बालभारतीचे डॉ. संदीप निकम, पुणे येथील कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य, एसएनडीटी, टिळक, तसेच वाघोली येथील आयुर्वेद महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक उपस्थित होते. विशेष म्हणजे या कार्यक्रमास सिंधुदुर्ग, कोल्हापूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया व पुणे जिल्ह्यातील भात शेती व इतर शेती करणारे अनेक शेतकरीदेखील सहभागी झाले होते.

विषमुक्त अन्ननिर्मितीचा मार्गदर्शक असणाऱ्या आरोग्यदायी नैसर्गिक भातशेती या पुस्तकामध्ये प्रमोद जाधव, जे स्वतः नैसर्गिक शेतीचे गाढे अभ्यासक आणि प्रयोगशील शेतकरी आहेत, यांनी आपले संशोधन, पारंपरिक ज्ञान आणि प्रत्यक्ष शेतीतील त्यांचे व त्यांच्या सहकारी शेतकऱ्यांचे अनुभव उतरवले आहेत. हे पुस्तक केवळ भातशेतीबद्दल नसून, ते विषमुक्त अन्ननिर्मिती, आरोग्यदायी जीवनशैली आणि शाश्वत नैसर्गिक शेतीचा मार्ग उलगडणारे एक महत्त्वपूर्ण मार्गदर्शक आहे. या निमित्ताने भाताच्या विविध देशी वाणांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

## वडाळ्यात इंधन चोरीचा पर्दाफाश

■ **अन्न, नागरी पुरवठा विभागाची धडक कारवाई**
■ **१.३१ कोटींचा मुद्देमाल जप्त**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दक्षता पथकाने वडाळा येथे धडक कारवाई करत पेट्रोल, डिझेल आणि विमान इंधन (एटीएफ) चोरीच्या रॅकेटचा पर्दाफाश केला. या कारवाईत सुमारे १ कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. एका व्यक्तीस ताब्यात घेण्यात आले.

अन्न, नागरी पुरवठा विभागाचे नियंत्रक शिधावाटप चंद्रकांत डांगे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी (दि.१६) दक्षता पथकाने वडाळा परिसरात छापा टाकला. कारवाईदरम्यान दोन इंधन टँकरचे सील तोडून त्यातील इंधन प्लास्टिक कॅनमध्ये भरून चोरी केली जात असल्याचे आढळून आले.

दक्षता पथकाने घटनास्थळी एका व्यक्तीस रंगेहाथ पकडले. तपासात २० लीटर क्षमतेच्या प्लास्टिक कॅनमध्ये प्लास्टिक पाईप व व्हॉल्वच्या साहाय्याने इंधन काढले जात असल्याचे उघड झाले. पथकाने तपासणी केलेल्या एमएच-०४ केयू-१८२६ या टँकरमध्ये १० हजार लीटर पेट्रोल आणि १४ हजार लीटर डिझेल, तर एमएच-०४ एलवाय-६३८८ या टँकरमध्ये २९ हजार लीटर विमान इंधन (एटीएफ) असल्याचे आढळून आले.

कारवाईत जप्त करण्यात आलेल्या पेट्रोल, डिझेल व (एटीएफ) इंधनासह संबंधित टँकर आणि अन्य साहित्य असा एकूण १ कोटी ३१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई दक्षता पथकातील उपनियंत्रक शिधावाटप गणेश बेल्लाळे, उपनियंत्रक माधुरी शिंदे, मुख्य निरीक्षण अधिकारी नागनाथ हंगरगे, शिधावाटप अधिकारी गणेश पवार, सहायक शिधावाटप अधिकारी योगेश्वर मोरे तसेच शिधावाटप निरीक्षक रामराजे भोसले, चंद्रकांत कांबळे, विकास नागदिवे, राहुल इंगळे आणि अरुण काते यांनी केली.



## विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील गुडवणवाडी येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली. आधारवडकडून गुडवणवाडीमध्ये जाऊन हा उपक्रम राबविण्यात आला. कर्जत तालुक्यातील आदिवासी आणि शैक्षणिक क्षेत्रात आधारवड संस्थेकडून अनेक उपक्रम राबवले जातात. ट्रस्टच्या माध्यमातून गुडवणवाडीमधील जिल्हा परिषद शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची मदत करण्यात आली. शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय दप्तर व वर्षभर पुरेल इतके शैक्षणिक साहित्य देण्यात आले. यावेळी आधारवड संस्थेचे कार्यकर्ते आणि शिक्षक तसेच नागरिक उपस्थित होते.

## सह्याद्रीच्या खोऱ्यात अडकलेल्या दोन ट्रेकर्सची सुटका

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

खोपोली शहरातील प्रसिद्ध झेनिथ वॉटर फॉल आणि केपी वॉटर फॉल परिसरात ट्रेकिंगसाठी आलेल्या चेंबूर येथील दोन युवकांची हेल्प फाउंडेशन आणि खोपोली पोलिसांच्या समन्वयातून सुखरूप सुटका करण्यात आली.

आर्यन जितेश शिवलानी (१८) व जहान निलेश भाटिया (१८,) दोघेही रा. चेंबूर, हे युवक १४ जून रोजी सह्याद्रीच्या कुशीत निसर्गाचा आनंद घेण्यासाठी झेनिथ व केपी वॉटर फॉल परिसरात ट्रेकिंगसाठी आले होते. तळपते ऊन, अवघड चढ-उतार आणि प्रदीर्घ भटकंती दरम्यान त्यांच्याकडील पाणी आणि खाद्यपदार्थ संपले. दुर्दैवाने ते वाटही चुकले. सुरुवातीला सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यात भटकण्याची असलेली उत्सुकता हळूहळू भीतीत बदलू लागली. काही वेळात अंधार पडणार आणि त्यानंतर काय, या विचाराने ते चिंताग्रस्त झाले.

अखेर त्यांनी आपल्या पालकांशी तसेच पोलीस हेल्पलाईनवर संपर्क साधून आपल्यावर ओढवलेल्या संकटाची माहिती देत मदतीची अपेक्षा व्यक्त केली. संबंधित परिसर खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याने पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांनी आपल्या पथकाद्वारे तात्काळ मदतकार्य सुरू करत हेल्प फाउंडेशनलाही सहकार्याचे आवाहन केले.

हेल्प फाउंडेशनचे गुरुनाथ साठेलकर, सौरभ घरत, महेश भोसले, अमोल कदम, निलेश यादव, राजवर्धन मोहिते, भक्ती साठेलकर आणि धर्मा पाटील यांनी तत्काळ संबंधित युवकांशी संपर्क साधत त्यांना धीर दिला. ''आम्ही मदतीसाठी येत आहोत,'' असा विश्वास देत रेस्क्यू टीमने केपी वॉटर फॉलच्या दिशेने अवघड चढाई सुरू केली, त्यांच्या अथक प्रयत्नांनंतर ते त्या युवकांपर्यंत पोहोचले. त्यांना एनर्जी ड्रिंक, पाणी आणि खाद्यपदार्थ देत मानसिक आधार देण्यात आला. त्यानंतर कोणतीही शारीरिक इजा होऊ न देता दोन्ही युवकांना सुखरूपपणे खाली आणण्यात आले. खाली दत्त मंदिर येथे आल्यानंतर जगदीश जाखोटिया यांनी सर्वांची आस्थेने विचारपूस केली तसेच संबंधित युवकांच्या पालकांशी संपर्क साधून त्यांची मुले सुरक्षित असल्याची माहिती दिली.

यानंतर खोपोली पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आणि संबंधित युवकांना रवाना करण्यात आले.

**शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात** | **परिसरातील बहुसंख्य शेतकऱ्यांची उपस्थिती**

## वावोशी येथे 'खेत बचाओ अभियान'




**। वावोशी । प्रतिनिधी ।**

खालापूर तालुक्यातील वावोशी येथे 'खेत बचाओ अभियान', 'मेरा गाँव मेरा गौरव', 'खतांचा संतुलित वापर' आणि 'एल निनो जनजागृती' कार्यक्रमांतर्गत एका विशेष शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रम आयसीएआर-सेंट्रल इन्स्टिट्यूट ऑफ फिशरीज टेक्नॉलॉजी, मुंबई संशोधन केंद्र; कृषी विज्ञान केंद्र, किल्ला-रोहा (रायगड); महाराष्ट्र शासन कृषी विभाग (तालुका कृषी अधिकारी कार्यालय खालापूर) आणि आत्मा यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडला. या कार्यक्रमात परिसरातील बहुसंख्य शेतकऱ्यांनी उपस्थित राहून विविध शासकीय योजना व आधुनिक कृषी तंत्रज्ञानाची माहिती घेतली.

या कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक आणि एमआरसी, आयसीएआर-सीआयएफटी, मुंबई येथील शास्त्रज्ञ डॉ. अभय कुमार यांनी 'निरोगी माती-निरोगी पीक-समृद्ध शेतकरी' या संकल्पनेवर आधारित संतुलित खत व्यवस्थापन या विषयावर सविस्तर प्रकाश टाकला. मृदा परीक्षणावर आधारित खतांचा वापर, रासायनिक व सेंद्रिय खतांचा समतोल, जमिनीचे आरोग्य संवर्धन आणि शाश्वत शेतीचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. तसेच कंपोस्ट निर्मिती तंत्रज्ञान, सेंद्रिय पदार्थांचे व्यवस्थापन आणि आयसीएआर-सीआयएफटीद्वारे विकसित 'सीआयएफटी मायक्रो बूस्ट' या जैवउत्पादनाचे फायदे सांगताना ते म्हणाले की, या उत्पादनामुळे जमिनीतील सूक्ष्मजीवांची वाढ होते, पोषक तत्त्वे सहज उपलब्ध होतात आणि पीक उत्पादकता वाढते. याशिवाय त्यांनी मत्स्य संवर्धन, मत्स्य प्रक्रिया, मूल्यवर्धित मत्स्य उत्पादने आणि मत्स्य व्यवसायातील उद्योजकतेच्या संधींविषयीही शेतकऱ्यांना अवगत केले.

### तज्ज्ञांचे बहुमोल मार्गदर्शन

या कार्यक्रमात डॉ. जीवन आरेकर (विषय विशेषज्ञ, केव्हीके, किल्ला-रोहा) यांनी नैसर्गिक शेतीचे महत्त्व सांगून दशपर्णी अर्क, बीजामृत, जीवामृत व धनजीवामृत तयार करण्याबाबत सविस्तर माहिती दिली. माधव गीते (मत्स्य विषय विशेषज्ञ) यांनी मत्स्यपालन व मत्स्य प्रक्रिया उद्योगातील रोजगाराच्या व व्यवसायाच्या नवीन संधींवर मार्गदर्शन केले. तर डॉ. सचिन कार्ले (मृदा विज्ञान विषय विशेषज्ञ) यांनी माती नमुना संकलन, जमीन आरोग्य पत्रिका आणि जमिनीतील उपयुक्त जिवाणू संवर्धन याविषयी शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन केले.

## निवडक



### विमानतळाकडील मार्गांचे जाळे सज्ज

**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या उद्घाटनाच्या पार्श्वभूमीवर विमानतळाकडे जाणाऱ्या विविध संपर्क मार्गांचे आणि उड्डाणपुलांचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. लवकरच त्यांचे लोकार्पण होणार आहे. एनएच-४ महामार्गालगत उभारण्यात आलेले हे मार्ग विमानतळाशी थेट जोडणी निर्माण करणार आहेत. खांदेश्वर रेल्वे स्थानक ते कर्नाळा स्पोर्ट्स अकादमी परिसराला जोडणारा महत्त्वाचा मार्ग तसेच बेलापूर येथून विमानतळाकडे जाणारा स्वतंत्र संपर्क मार्ग तयार करण्यात आला आहे. या नव्या रस्ते व पुलांमुळे प्रवाशांना विमानतळापर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. वाहतूक कोंडी कमी होण्यासदेखील मदत होणार असून पनवेल, बेलापूर, खारघर आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना जलद व सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल. विमानतळ सुरू झाल्यानंतर या संपर्क मार्गांमुळे संपूर्ण नवी मुंबई परिसराच्या विकासाला आणखी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



### सामाजिक उपक्रमांनी वाढदिवस साजरा

**पनवेल :** शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे पनवेल तालुका संघटक रामदास पाटील यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमाद्वारे साजरा करण्यात आला. यानिमित्त त्यांना शिवसेना उपनेते बबनदादा पाटील, जिल्हाप्रमुख दिपक निकम, उपजिल्हाप्रमुख रामदास पाटील यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. वाढदिवसानिमित्त ग्रामीण भागातील अनेक ठिकाणी वृक्षारोपण तसेच शालेय विद्यार्थ्यांना शालेपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.



### सुजल मोरेची सैन्य दलात निवड

**पनवेल :** देवद येथील सुजल मोरेची निवड भारतीय सैन्य दलात झाली आहे. याबद्दल शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाच्या देवद शाखेतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. उपविभाग प्रमुख जयंत पाखरे यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमात रायगड जिल्हा प्रमुख दिपक निकम यांनी शाल व पुष्पुच्छ देऊन सुजल विनोद मोरे याचा सत्कार केला. देशसेवा हीच खरी भक्ती आहे. मातृभूमीच्या रक्षणासाठी घेतलेला हा धाडसी निर्णयावर मार्गदर्शन केले. यावेळी मान्यवर डॉ.सेलचे राज्य उप उपाध्यक्ष डॉ.आशिष बांदेकर, तालुका सन्यवक शिवाजी पालांडे, पनवेल प्रभाग संघटक सिद्धेश चव्हाण, महिला संघटक तनुजा झुरे यांची उपस्थिती लाभली.नियमित प्रशिक्षण, शिस्तबद्ध व्यायाम व अभ्यासामुळे हे यश शक्य झाल्याचे सुजल विनोद मोरे यांने सांगितले. सुजल मोरेची सैन्य दलात निवड झाल्याने या यशाबद्दल गुरुदत्त माया सोसायटीतील पदाधिकारी अध्यक्ष विनायक काटकर, सेक्रेटरी देवराम खंदारे, उप सेक्रेटरी अन्वर शेख यांच्याकडून कौतुक करण्यात आले.



### स्मृती दिनानिमित्त मोफत वह्या वाटप

**पनवेल :** स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पार्टीचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी आपल्या मातोश्री सुमन साळुंखे यांच्या स्मृती दिनानिमित्त रायगड जिल्हा परिषदच्या वडघर प्राथमिक शाळा येथे मोफत वह्या वाटप केले. या कार्यक्रमाला मुंबई प्रदेशाध्यक्ष अमित हिरवे, महाराष्ट्र राज्य सहसचिव अरुण जाधव, विमानतळ प्रकल्पग्रस्त नेते प्रेम पाटील, उद्योजक सुजित गुळवे, उद्योजक राहुल पाटील, पनवेल तालुका अध्यक्ष प्रशांत सोनवणे, पनवेल महानगरपालिका अध्यक्ष निलेश कांबळे, मनोज कांबळे, वडघर प्राथमिक शाळेचे स्थानिक स्कूल कमिटीचे उपसभापती अरूण कांबळे, अशोक कदम, किशोर कदम, महिला आघाडी अध्यक्ष ममताज पठाण, अल्पसंख्यांक अध्यक्ष आसिफ शेख, जावेद मास्टर, प्राथमिक शाळेचे शिक्षक जयदास घरत, जितेंद्र महाले व शाळेतील विद्यार्थ्यांचे पालक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

### धान्याची काळ्या बाजारात विक्री

**वसईत रेशन दुकानावर धाड**

**ठाणे :** गरीबांच्या रेशन धान्याची काळ्या बाजारात विक्री होत असल्याचा प्रकार वसईमध्ये उघड झाला. पुरवठा विभागाच्या पथकाने वसईतील धान्य दुकानावर धाड टाकून एक टनहून जास्त धान्य काळ्या बाजारात विकताना पकडले. वसई पश्चिम झेंडा बाजार परिसरात असलेल्या शिधावाटप केंद्रावर एका व्यापाऱ्याकडून हे धान्य जप्त करण्यात आले. याप्रकरणी वसई पोलीस ठाण्यात व्यापाऱ्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. पुरवठा विभागाच्या माध्यमातून वसई, विरारमध्ये शिधापत्रिकाधारकांना स्वस्त धान्याचे वितरण केले जाते. मात्र काही शिधापत्रिकाधारक शिधा वाटप केंद्रातून स्वस्तात धान्य घेऊन नंतर ते बाहेरील व्यक्तींना चढ्या भावाने विक्री करत असल्याचे प्रकार समोर येत आहेत. वसई पश्चिम झेंडा बाजार परिसरात असलेल्या एका शिधावाटप केंद्रावर शिधापत्रिकाधारक धान्य घेऊन खासगी व्यापाऱ्याला विक्री करत असल्याची तक्रार पुरवठा विभागाच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार सोमवारी धाड टाकून धान्याचा सुरू असलेला काळा बाजार उघड केला. या कारवाईत ११०० किलो धान्यसाठा जप्त केला असल्याची माहिती पुरवठा अधिकारी भागवत सोनार यांनी दिली.

## निवडक



• (छायाचित्र : शैलेश पालकर)

### नालेसफाईची पहिल्याच पावसात पोलखोल

**पोलादपूर :** गेल्या मंगळवारी पाच मिनिटे झालेल्या पावसात महामार्गावर गेल्याप्रमाणे वीतभर पाणी तुंबल्याने महामार्ग विभाग व नगरपंचायत पोलादपूरच्या पावसाळ्यापूर्वीची नालेसफाईचा गैरकारभार उघड झाला. या पावसाने काही तासापुरता हवेत गारवा निर्माण केला तरी प्रशासनाचा गैरकारभार उघड केला. मंगळवारी पोलादपूर शहरात फक्त वीस मिनिट पाऊस पडला. पण या पावसाने महामार्ग विभागाच्या गलथान कारभारासह पोलादपूर नगरपंचायतीची पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई, गटारातून पाणी जाण्यासाठी चर खोदण्याची कामे झाली नसल्याची स्पष्टता पावसाने उघड केली. पोलादपूर शहरातील प्रभातनगर पूर्व पश्चिम विभागाला जोडणारा मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग वीतभर पाण्याखाली गेल्याने येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांवर महामार्गावरील साचलेल्या पाण्याचे फवारे उडत होते. महामार्गावर दोन्ही बाजूने वाहनांचे उडणारे पाणी आणि पावसाला सुरुवात झाली असताना महामार्गावरील साचणारे पाणी पाहता नगरपंचायत पोलादपूरचे प्रशासन आणि महामार्ग विभागामार्फत आगामी चार महिने उपाययोजना होतील अथवा कसे याबाबत नागरिक साशंकता व्यक्त करीत आहेत.

### रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**धाटाव :** रोह्यात जागतिक रक्तदानानिमित्त आयोजित केलेल्या शिबिरास तब्बल ३१२ रक्तदात्यांनी रक्तदान केल्याने विक्रम झाला आहे. त्यामुळे या सामाजिक उपक्रमाबद्दल रोहा नगरपरिषद, स्वर्गीय दत्ताजीराव तटकरे रक्तपेढी, वरदाई चॅरिटेबल ट्रस्ट, डॉक्टर भट नर्सिंग होम व गॅलेक्सी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल या सर्व आयोजकांचे या सामाजिक उपक्रमाबद्दल कौतुक होत आहे. रोहा नगरपरिषद व इतर आयोजकांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात तब्बल ३१२ रक्तदात्यांनी सहभाग घेतला. नगराध्यक्ष वनश्री शेडगे म्हणाल्या, की नगराध्यक्षपदावर काम करीत असताना रोहानगरीच्या विकासकामांच्या प्रश्नासोबत नागरिकांचे मूलभूत प्रश्नसुद्धा सोडवणे गरजेचे आहे. माझे आजोबा स्वर्गीय जनार्दन शेडगे यांनी शंभर वेळा रक्तदान केलेले आहे. त्यांच्या जन्मदिनी आम्ही रक्तदान शिबीर राबवितो.





### अध्यक्षपदी पुनीत बालन यांची निवड

**चिरनेर :** कै. सौ. लक्ष्मीबाई दगडूशेठ हलवाई दत्तमंदिर ट्रस्टच्या नव्या विश्वस्त मंडळाची निवड जाहीर करण्यात आली असून, ट्रस्टच्या अध्यक्षपदी पुनीत बालन यांची निवड करण्यात आली आहे. राजू बलकवडे यांची कार्यकारी विश्वस्त म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, ॲड. विवेक भरगुडे आणि वर्षा थोरवे यांची उपाध्यक्षपदी निवड झाली आहे. सूरज थोरात यांच्याकडे खजिनदारपदाची जबाबदारी सोपविण्यात आली असून, नितीन पंडित यांची उत्सव प्रमुख तर मनीषा खेडेकर यांची उपउत्सव प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पराग काळकर आणि महेंद्र गाढवे यांची विश्वस्त म्हणून निवड झाली आहे. दरम्यान, ट्रस्टच्या विश्वस्त निवड प्रक्रियेमध्ये अनियमितता झाल्याचा आरोप काही व्यक्तींनी केला होता. मात्र, या प्रकरणाची चौकशी झाल्यानंतर निवड प्रक्रियेत कोणतीही अनियमितता झालेली नसल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यानंतर धर्मादाय आयुक्तांच्या आदेशानुसार नव्या विश्वस्त मंडळाची निवड निश्चित करण्यात आली. नवीन विश्वस्त मंडळाच्या निवडीमुळे मंदिराच्या धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांना अधिक बळ मिळणार असल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली आहे.

### क्षुल्लक कारणावरुन वाद

**नवीन पनवेल :** दुकानासमोर साहित्य ठेवण्यावरून वाद होऊन शिवीगाळ केल्याप्रकरणी अलीसागर ओरा याच्याविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. यातील दिलीप तिवारी आणि अलिसागर ओरा हे एकमेकांच्या ओळखीचे आहेत. त्यांचे पनवेल भाजी मार्केट येथे शेजारी-शेजारी दुकान असून, दुकानासमोर साहित्य ठेवण्यावरून त्यांच्यामध्ये वाद झाला आणि विरोधक अलिसागर याने त्यांना शिवीगाळ केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• दुकानगाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८

• नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. ऑल राऊंडर कुक (कॉंटिनेंटल सुद्धा येणे आवश्यक) रेस्टॉरंट कॅप्टन, मेन्टेनन्स पर्सन, इच्छुक उमेदवारांनी सकाळी १० ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. मोबा. ७५५९१८४६१२

• घरकामासाठी कायमस्वरूपी राहून काम करणारी बाई हवी आहे. कामामध्ये जेवण बनवणे व घराची साफसफाई यांचा समावेश असेल. पगार : ₹ १५,०००/- राहण्यासाठी केयरटेकर रूम मिळेल. (फैमिली केयरटेकर रूम मध्ये राहू शकते.) इच्छुकांनी संपर्क साधावा. 7875866555

• आर्किटेक्चर आणि इन्टेरियर डिझाइनिंग ऑफिस करीता स्टाफ हवा आहे. संपर्क – 9762777975

• वाडगाव फाटा येथे कॉटेज सांभाळण्याकरीता माणूस हवा आहे. संपर्क – 9822938444

• नामांकित कंपनीसाठी ड्रायव्हर पाहिजे, अनुभवी परवाना धारक मासिक वेतन अनुभवानुसार मो.९०११०२६२६३.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# तळोजा पेंधर शाळेची दुरवस्था

**• ३५० हून अधिक विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला**



**| पनवेल | प्रतिनिधी |**

एकीकडे सरकार ''बेटी बचाव, बेटी पढाव'' तसेच विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी विविध योजना आणि उपक्रम राबवत असल्याचा दावा करत आहे. मात्र, दुसरीकडे तळोजा पेंधर गावातील जिल्हा परिषद शाळेची अवस्था गेल्या दोन वर्षांपासून अत्यंत दयनीय झाली असून, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे शेकडो विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक आणि पालकांनी केला आहे.

शाळेची इमारत धोकादायक घोषित झाल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी तात्पुरती पर्यायी व्यवस्था करण्यात आली. मात्र, शाळा व्यवस्थापन समितीकडून रायगड जिल्हा शिक्षणाधिकारी, पंचायत समिती शिक्षणाधिकारी आणि पनवेल महानगरपालिका शिक्षण विभागाकडे वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे समोर आले आहे. सध्या विद्यार्थ्यांना मंदिर तसेच इतर खासगी ठिकाणी शिक्षण घ्यावे लागत असून, वर्गखोल्यांच्या अभावामुळे शिक्षण व्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे.

तब्बल दोन वर्षांचा कालावधी उलटूनही शाळेची दुरुस्ती किंवा नवीन इमारत उभारण्याबाबत कोणताही निर्णय झालेला नसल्याने पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. यावर्षी शाळेत १५० हून अधिक नवीन प्रवेश झाले असून, एकूण विद्यार्थी संख्या ३५० च्या पुढे गेली आहे. एवढ्या मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षण घेत असताना त्यांच्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले आहे. गावकऱ्यांनी प्रशासनाकडे तातडीने पर्यायी शैक्षणिक व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. तसेच नवीन शाळा इमारत किंवा दुरुस्तीच्या कामाला त्वरित मंजुरी देण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश लक्ष्मण भोईर, वसंत महादू पाटील, राम कमलाकर खेरणेकर, वैशाली राम खेरणेकर, शिक्षक, कर्मचारी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष महेश भोईर यांनी प्रशासनाला इशारा देत म्हटले की, ''शाळेच्या प्रश्नावर तातडीने कार्यवाही झाली नाही तर पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थ्यांसह तीव्र ठिय्या आंदोलन छेडण्यात येईल.'' आता विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा हा गंभीर प्रश्न सरकार आणि प्रशासन कोणत्या पद्धतीने सोडवते, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# उरणच्या आकाशावर केमिकल धुराचे सावट?

**अर्धा जून उलटला तरी पावसाचा पत्ता नाही**

**| उरण | प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यात यंदा मान्सूनने अक्षरशः पाठ फिरवल्याचे चित्र दिसत आहे. जून महिना अर्धा उलटून गेला तरी दमदार पावसाची एकही सर कोसळलेली नसल्याने उरणसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शेतकरी, नागरिक, व्यापारी आणि प्रशासन यांची नजर आता आकाशाकडे खिळली असून, ''पाऊस कधी येणार?'' हा प्रश्न सतावत आहे.

१५ जूनपर्यंतच्या अधिकृत आकडेवारीनुसार, रायगड जिल्ह्यात वार्षिक सरासरीच्या तुलनेत अवघा २.६ टक्के पाऊस झाला आहे. विशेष म्हणजे, २०२५ मध्ये याच कालावधीत जिल्ह्यात तब्बल ५३ टक्के पाऊस झाला होता. जून महिन्याची सरासरी ३२७.९ मिमी असताना यंदा केवळ ८.५ मिमी पावसाची नोंद झाली आहे. १५ जून रोजी तर संपूर्ण जिल्ह्यात सरासरी फक्त ०.१ मिमी पाऊस पडल्याची नोंद आहे.

आधीच उरण तालुक्यात अनेक भागांमध्ये पाणीकपात सुरू झाली असून विहिरी आणि जलस्रोतांची पातळी खालावत आहे. पावसाने आणखी दडी मारल्यास भीषण पाणीटंचाईचे संकट निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, उरणमध्ये वाढत्या औद्योगिकीकरणामुळे निर्माण होणाऱ्या प्रदूषणाकडेही बोट दाखवले जात आहे. जेएनपीए परिसरासह विविध औद्योगिक पट्ट्यांमध्ये कार्यरत असलेल्या अनेक केमिकल कंपन्यांकडून वातावरणात सोडला जाणारा रासायनिक धूर आणि वायूप्रदूषण याचा परिणाम स्थानिक पर्यावरणावर होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. हवेत वाढणारे प्रदूषण, बदलणारे हवामान आणि अनियमित पावसाचे चक्र यांचा परस्पर संबंध असल्याचे पर्यावरण अभ्यासकांचे मत आहे.

## विमानतळ आस्थापनेवर कर आकारणीचे निर्देश

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आस्थापनेवर कर आकारणी करण्याचे निर्देश पनवेल पंचायत समितीने दिले आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या परिसरातील ग्रामपंचायत हद्दीत येणाऱ्या विविध व्यावसायिक मालमत्ता, सेवा सुविधा आणि संबंधित आस्थापनांवर नियमानुसार कर आकारणी करण्याबाबत ग्रामपंचायतींना निर्देश देण्यात आले आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ २५ डिसेंबरपासून सुरू झाले आहे. हे विमानतळ सुमारे १ हजार १६० हेक्टर क्षेत्रात पसरले आहे. ग्रामपंचायतचे उत्पन्न वाढीच्या दृष्टीने पंचायतीने सर्व आस्थापनांवर कर आकारणी करणे आवश्यक आहे. तरघर, उलवा, पारगाव, ओवळे, वडघर, वाघिवली या ग्रामपंचायत हद्दीत विमानतळ आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ही वाणिज्यिक, औद्योगिक आस्थापना आहे. या आस्थापनेवर ग्रामपंचायतीकडून कर आकारणी करणे क्रमप्राप्त आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आस्थापनेवर नियमानुसार कर आकारणी करावी, असे निर्देश पनवेल पंचायत समिती यांच्याकडून ग्रामपंचायत यांना देण्यात आलेले आहेत.

विमानतळामुळे परिसरातील आर्थिक व्यवहार वाढत असून, ग्रामपंचायतींच्या उत्पन्नातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या महसुलात वाढ होऊन नागरी सुविधा आणि विकासकामांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध होणार आहे. विमानतळाच्या विस्तारासह परिसरातील विकास प्रकल्पांना गती मिळत असल्याने स्थानिक प्रशासन आणि ग्रामपंचायतींची जबाबदारीही वाढली आहे. उरण जेएनपीए प्रशासनाकडून संबंधित ग्रामपंचायती कर वसूल करतात.



**पड रं पाण्या... पड रं पाण्या... कर पाणी पाणी, शेत माझं लय तान्हेलं चातकावानी ...**
**जून संपायला आला तरी पावसाचा पत्ता नाही. शेतकऱ्यांच्या पेरण्या खोळंबल्या आहेत. पाऊस पडल्यावरच शेतीच्या कामांना वेग येणार आहे. त्यामुळे पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहणारा शेतकरी टिपला आहे सत्यप्रसाद आडाव यांनी.**

## कळंबोलीमधील उद्यानाची दयनीय अवस्था

**| पनवेल | प्रतिनिधी |**

कळंबोली वसाहतीमधील सेक्टर ४ मधील उद्यानात झाडांना आणि हिरवाळीला पाणी न मिळाल्याने उन्हाच्या कडाक्याने हिरवळ करपून गेली आहे. कोट्यावधी रुपये खर्च करूनही उद्यानात सायंकाळी धुरळा उडत आहे. ज्या महत्त्वाच्या गोष्टीसाठी पैसे खर्च करायला पाहिजे तिथे खर्च न करता सीसीटीव्हीसाठी पैसे खर्च केले गेले. परंतु, उद्यान हिरवगार हवं यासाठी महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.



झाडांना पाणीच न मारल्याने झाडेही करपू लागली आहेत बसण्यासाठी करण्यात आलेल्या कठडे प्रचंड तापल्याने रात्री आठ वाजता ही त्याच्यावर उद्यानात येणारे नागरिक बसू शकत नाही एवढेच चटके नागरिकांना बसत आहेत. महापालिकेच्या उद्यान विभागाच्या भोंगळ कारभाराचा फटका उद्यानाबरोबरच रहिवाशांनाही बसत आहे.

कळंबोली वसाहती मधील सेक्टर ४ मधील एक उद्यान महापालिकेकडून विकसित करण्यात आलं. या ठिकाणी उद्यान ऐवजी छोटे छोटे कार्यक्रम करण्यासाठी एक थिएटरची निर्मिती करण्यात आली आहे. यासाठी महापालिकेने कोट्यावधी रुपये खर्च केल्याचे सांगण्यात येत आहे. या उद्यानाची निर्मिती करण्यापूर्वी सिडकोनेसुद्धा उद्यानावर लाखो रुपयांची उधळपट्टी केलेली आहे. नागरिकांना फक्त हिरवगार सुशोभित बहारदार झाडांनी भरलेलं उद्यान हवं होतं. परंतु या ठिकाणी उद्यानाचे पूर्णतः कॉंक्रिटीकरण केल्याने उद्यानाची व्याख्या पूर्णपणे बदलली गेली आहे. सद्यःस्थितीत सदरचे उद्यान महापालिकेकडून दुर्लक्षित होत असल्याचा आरोप नागरिक करीत आहेत. या उद्यानामधील हिरवळ केव्हाच करपून गेली आहे. पाणी मारलं नसल्याने काही झाडे सुकूनही गेली आहेत.

## कळंबोली अग्निशमनच्या संपर्क क्रमांकात तात्पुरता बदल

**| पनवेल | प्रतिनिधी |**

बीएसएनएल फायबर लाईनचे काम सुरू असल्यामुळे पनवेल महानगरपालिकेच्या कळंबोली अग्निशमन विभागाच्या काही दूरध्वनी सेवांवर तात्पुरता परिणाम होणार आहे. विशेषतः कळंबोली अग्निशमन केंद्राचे दूरध्वनी क्रमांक पुढील ३ ते ४ दिवस तात्पुरते बंद राहण्याची शक्यता असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

कळंबोली अग्निशमन केंद्राचे ०२२-२७४२०१३७ व ०२२-२७४२०१३८ हे दूरध्वनी क्रमांक बीएसएनएल फायबर केबलच्या कामामुळे तात्पुरते बंद राहणार आहेत. पनवेल, कामोठे, कळंबोलीतील नागरिकांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या कालावधीत आग, आपत्ती अथवा इतर आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास पर्यायी आपत्कालीन संपर्क क्रमांक : कळंबोली अग्निशमन केंद्र : ०२२-६९३६५८०२ मनीष ब्राह्मणकर (उपअग्निशमन अधिकारी) ८८८८५७७५४२, फत्तेसिंग गायकवाड (उप अग्निशमन अधिकारी) ७४१०१११६८, अग्निशमन केंद्र : ८४५४९२४८४५ /८५५४८१८९४५ येथे संपर्क साधावा.

## दिया सामंतच्या शैक्षणिक यशाचा गौरव

**| नवी मुंबई | प्रतिनिधी |**

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (एसएससी) परीक्षा २०२५-२६ मध्ये शंभर टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या दिया निलेश सामंत हिचा पाट हायस्कूल येथे सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख (बेलापूर विधानसभा क्षेत्र) तथा नवी मुंबई मनपाचे ज्येष्ठ नगरसेवक किशोर अशोक पाटकर यांच्या वतीने मान्यवरांच्या हस्ते तिला रोख एक लाख रुपये, शाल, श्रीफळ आणि सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रारंभी मुख्याध्यापक सयाजी बोंदर यांनी गुलाबपुष्प देऊन उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले व प्रास्ताविकातून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी होत असलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

याप्रसंगी नरेश परब (ग्रंथपाल, पणदूर हायस्कूल), अविनाश वालावलकर, हेबाळकर सर, दियाचे पालक निलेश सामंत व नेहा सामंत, सानिया सामंत उपस्थित होते. संस्था व विद्यालयाच्या वतीने सर्व मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. किशोर पाटकर हे शिक्षण क्षेत्रातील विविध उपक्रमांसाठी योगदान देत असून, त्यांनी यापूर्वीही विद्यार्थ्यांना मोफत २०० सायकलींचे वाटप केले आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शालेय विद्यार्थ्यांना दीड ते दोन हजार सायकलींचे वितरण करून शिक्षणासाठी प्रेरणादायी कार्य केले आहे.

## चाकूचा धाक दाखवून बलात्कार

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

चाकूचा धाक दाखवून महिलेवर वारंवार बलात्कार केल्याप्रकरणी आरोपी रोशन लहू शेळके (रा. आदई गाव) याच्याविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात १६ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. नोव्हेंबर २०२५ ते एप्रिल २०२६ पर्यंत रोशन शेळके याने पीडित महिलेला मोबाईलमध्ये अश्लील व्हिडिओ दाखवली आणि चाकूचा धाक दाखवून तिच्यावर अनेकदा अत्याचार केला. तसेच चाकू दाखवून व्हिडिओ काढून ते पीडित महिलेच्या वडिलांना दाखवण्याची धमकी देऊन पुन्हा अत्याचार केला.

## नैनाविरोधात प्रकल्पग्रस्तांचा एल्गार

**२५ जून रोजी लाक्षणिक उपोषणाचा इशारा**

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

नैना टीपीएस योजनेंतर्गत अंतिम भूखंडाचा ताबा देण्याबाबतची कार्यप्रणाली प्रसिद्ध करण्याबाबत आणि योजना मंजूर होऊन दोन वर्षे उलटली तरीही योजनेची अंमलबजावणी करण्यास टाळाटाळ करत असल्याने त्याच्या निषेधार्थ २५ जून रोजी नवी मुंबईतील नैना कार्यालयाखाली तळमजल्यावर प्रकल्पग्रस्त ग्रामविकास सामाजिक संस्था एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करणार आहे. याबाबतचे पत्र अध्यक्ष रामचंद्र गणा भगत यांच्याकडून नगरविकास मंत्री, नैना, सिडको, मुख्य दक्षता अधिकारी, भूमापन अधिकारी, आमदार, पोलीस ठाणे यांना देण्यात आले आहे.

टीपीएस योजनेतील आराखडा तयार करताना अनेक राहत्या घरांवर विविध आरक्षण टाकण्यात आल्याने ती संरक्षित करून नकाशात फेरबदल करण्यासाठी अर्ज देण्यात आलेले आहेत, त्यावर कार्यवाही करावी. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना अंतिम भूखंडाचा ताबा देण्याबाबत कार्यप्रणाली प्रसिद्ध करून त्वरित ताबा क पत्रासहित देणे, आदी विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

नैना योजनेतील प्रकल्पग्रस्तांच्या नावे महसूल अभिलेख सातबारा सदरील शेतकऱ्याच्या नावापुढील क्षेत्राप्रमाणे भूखंडाचे विभाजन करून स्वतंत्र अंतिम भूखंड मंजूर करणे. तसेच नैना क्षेत्रामध्ये छुप्या पद्धतीने बेकायदेशीर इमारत, सदनिका व व्यापारी गाळे यांची दस्तनोंदणी होत आहे. यावर एसीबी मार्फत चौकशी करून संबंधितांवर कारवाई करणे. या विविध मागण्यांसाठी एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात येणार आहे. प्रलंबित प्रश्न निकाली न काढल्यास कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा अध्यक्ष रामचंद्र भगत यांनी दिला आहे.

**मृण्मयी बचत गटाला राज्यभरातून मागणी | हस्तकला वस्तूंमधून वेगळी ओळख**

## लोकरीच्या कलाकुसरीला महिलांची पसंती

**| नेरळ | प्रतिनिधी |**

ग्रामीण महिलांच्या कौशल्याला बाजारपेठ मिळवून देत नेरळ येथील मृण्मयी महिला बचत गटाने लोकरीपासून तयार केलेल्या आकर्षक हस्तकला वस्तूंमधून वेगळी ओळख निर्माण केली आहे. हाताने तयार केलेल्या लोकरीच्या वस्तूंना प्रदर्शनांमध्ये मोठी मागणी मिळत असून, या माध्यमातून अनेक महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणालाही चालना मिळत आहे.



मृण्मयी महिला बचत गटातील महिला एकत्रितपणे लोकरीपासून क्रोशेचे गजरे, आकर्षक पिना, सजावटीच्या वस्तू तसेच मुलींसाठी विविध फॅशन ॲक्सेसरीज तयार करतात. नावीन्यपूर्ण आणि हस्तनिर्मित वस्तूंना ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने या बचत गटाला विविध हस्तकला प्रदर्शनांमधून सातत्याने निमंत्रणे मिळत आहेत. नवी मुंबईतील रोटरी क्लब प्रदर्शन, महालक्ष्मी सरस तसेच वांद्रे-कुर्ला संकुलातील प्रदर्शनांमध्ये मृण्मयी बचत गटाच्या स्टॉलला विशेष प्रतिसाद मिळाला. त्यामुळे राज्यातील विविध प्रदर्शनांमध्ये या बचत गटाची मागणी वाढली आहे. टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ आणि आकर्षक उत्पादने तयार करण्यावर भर दिल्याने महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होत आहे.

> लोकरीच्या वस्तू तयार करण्याचे कौशल्य मला माझी आई आणि आजीकडून मिळाले. हस्तनिर्मित आणि नावीन्यपूर्ण वस्तूंना महिलांकडून चांगली पसंती मिळत असून, त्यामुळे बचत गटातील महिलांना आर्थिक आधार मिळत आहे.
> – मृणालिनी शेळके, अध्यक्षा

## ज्युपिटर गाडीची चोरी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

शहरातील वेलनेस मेडीकल स्टोअर समोर उभी करून ठेवलेल्या टीव्हीएस ज्युपिटर गाडीची चोरी अज्ञात चोरट्यांनी केल्याची घटना घडली आहे. कृष्णा मल्हारी यांच्या निळ्या रंगाच्या टीव्हीएस ज्युपिटर गाडी क्र. एमएच-०१-डीव्ही-२८८२ हीची किंमत जवळपास ४० हजार रुपये आहे. ही अज्ञात चोरट्यांनी चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# हिवतापमुक्त गावासाठी विद्यार्थ्यांची प्रभातफेरी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, वडगाव आणि प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोप यांच्या संयुक्त विद्यमाने हिवताप (मलेरिया) जनजागृती अभियान राबविण्यात आले. यानिमित्त शाळा, अंगणवाडी तसेच गावामध्ये प्रभातफेरी काढण्यात आली. पथनाट्य, घोषणाबाजी आणि जनजागृतीपर फलकांच्या प्रदर्शनाद्वारे ग्रामस्थांना हिवताप प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी विद्यार्थी व ग्रामस्थांना मलेरियाचे डास ज्या ठिकाणी निर्माण होतात ती ठिकाणे स्वच्छ ठेवण्यास सांगितले.

प्राथमिक आरोग्य केंद्र लोहोपचे डी. ओ. भस्मा यांनी हिवतापाची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजनाविषयी सविस्तर माहिती दिली.

यावेळी मयुरी धायगुडे, कल्पना वाजेकर, भोईर , एम. एल. तांबडे, बाळासाहेब कोल्हे, रोशन निंबाळकर, दत्ता लाड, यशवंत पाटील यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## -: जाहीर नोटीस :-

सर्व लोकांस ह्या जाहीर नोटीसीने कळवण्यांत येते की, खाली नमुद केलेल्या शेत जमीन मिळकती ह्या खाली लिहीलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसुल दप्तरी नांवे असून, ती त्यांचे खुद्द ताबा, कबजा, मालकी, वहीवाटीतील आहे, त्या शेत जमीन मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मौजे घेरासुरगड, ता. रोहा, जि.रायगड येथील:-**

| मालकाचे नांव | गट/भुमापन क्र. | एकूण क्षेत्र हे. आर. | आकार रू. पै. | भोगवटा वर्ग |
|---|---|---|---|---|
| जगदीश बाबुलाल खडावाला व इतर ७ खाता क्र.४७ | २४ | ३-५३-०० | २.२७ | १- खालसा |
| | २५ | ०-०९-१० | ०.२३ | १-खालसा |
| | २७ | ०-०३-०० | ०.१८ | १-खालसा |
| | २८ | ०-१२-०० | ०.०३ | १-खालसा |
| | २९ | ०-०६-१० | ०.०८ | १- खालसा |
| | ३० | ८-७१-०० | ५.५८ | १- खालसा |
| | ३६ | ०-०५-१० | ०.२७ | १- खालसा |
| | ३७ | ०-१३-१० | ०.०५ | १- खालसा |
| | ३८ | ०-०६-९० | ०.०३ | १- खालसा |
| | ४२ | ०-१५-२० | ०.२५ | १- खालसा |
| | ४३/अ | ६-२७-०० | ४.६५ | १- खालसा |
| | ४३/ब | ३-६७-०० | ३.०२ | १- खालसा |
| | ४४ | ०-१०-१० | ०.१९ | १- खालसा |
| | ४५ | १-८०-०० | १.३९ | १- खालसा |
| | ४६/१ | ३-६०-०० | १.२ | १- खालसा |
| | ४७ | ३-८०-०० | २.८ | १- खालसा |
| | ४८/अ | ९-१२-०० | ६.८५ | १- खालसा |
| | ४८/ब | ४-७६-०० | ३.३४ | १- खालसा |
| | ५३ | ९-४४-०० | ५.७५ | १- खालसा |
| | ५५ | ०-०२-८० | ०.४८ | १- खालसा |
| | ५६ | ०-१३-१० | ०.९७ | १- खालसा |
| | ५७ | ७-०८-०० | ४.७२ | १- खालसा |
| | ५९ | ०-०६-८० | ०.०८ | १- खालसा |
| | ६२ | ०-०७-०० | ०.८६ | १- खालसा |
| | ६३ | ०-०९-९० | ०.५१ | १-खालसा |
| | ६५ | ०-०२-१० | ०.०२ | १- खालसा |
| | ६६ | ०-१७-२० | ०.४७ | १- खालसा |
| | ६७ | ०-०२-३० | ०.१९ | १- खालसा |

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला आहे, यास्तव वरील मिळकतींवर अन्य कोणाचा दान, गहाण, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, अखत्यार, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहीवाट, ताबा, कब्जा, वहीवाट वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉर्टगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझेशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक, हितसंबंध तसेच एकत्र कुटूंब मिळकत असल्याने ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५(पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल कराव्यात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील मिळकती पुर्णपणे निर्वेध असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी. हे कळावे,

दि. /०६/२०२६

**ॲड. सागर हिराकांत भगत,**
पत्ता : मौजे उन्हेरे-कुंभारशेत, पो.पाली, ता.सुधागड
मोबा.क्र.८९८३४५६८४७

## जाहीर नोटीस

मौजे ममदापूर ता.कर्जत जि. रायगड येथील स.नं. १५० प्लॉट नंबर ११ या मिळकतीवर बांधण्यात आलेली गोल्डन पालेस मधील तिसऱ्या मजल्यावरील ब्लॉक नंबर ३०३ क्षेत्र ४५८ चौ. फुट कारपेट अशी मिळकत दिनांक १२.११.२०२० रोजी हाय राईस डेव्हलपर्स तर्फे भागीदार शाकीब मुस्तफा पालटे व १ यांचेकडून राहूल बिजल मारु रा. चौथा मजला रुम नंबर ४५ उमेरखाडी बाळू चांगू पाटील मार्ग, जे.जे. हॉस्पीटल समोर डोंगरी मुंबई यांनी दस्त क्रमांक २५१९/२०२० असा खरेदी केला असून त्याबाबतची असलेली ओरीजनल प्रत दिनांक १२.०५.२०२३ रोजी नेरळ येथून मुंबई येथे प्रवास करीत असताना सदरचा दस्त प्लास्टीक पिशवीतून हरविलेला आहे. त्याबाबत सी.एस.टी. रेल्वे पोलीस ठाणे येथे दिनांक १२.०५.२०२३ रोजी सदर दस्त हरविल्याची तक्रार नोंदविलेली आहे. याबाबत कोणालाही सदर दस्त मिळाल्यास त्यांनी खालील पेपर नोटीस देणाऱ्या वकीलांच्या पत्त्यावर सात रोजात आणून देणे.

याकरीता सदरची जाहीर नोटीस देत आहोत.

**ॲड. अशोक पालू डुकरे**
रा. प्रभात दर्शन अपार्टमेंट, ब्लॉक नं. १०१
ममदापूर रोड नेरळ ता. कर्जत जि.रायगड
मोबाईल नंबर ९८८१२७९८१७

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल यांनी खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक प्रिती उर्फ शामा प्रकाश नागले रा.मुंबई यांचे कडून कायम विकत घेणेबाबत व्यवहार ठरविलेला आहे. सदरची मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र हे. आर | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| चौल ता. अलिबाग | १३२८ | ०-०२-२० पो.ख. ०-००-७६ एकुण ०-०२-९६ | १.२५ |
| | १३३० | ०-०४-०४ पो.ख. ०-०२-२८ एकुण ०-०६-३२ | २.३४ |
| | १३३२ बिनशेती | २.५८.०० आर. चौ. मी. | २५.८० |
| | १३३१ | ०-००-५१ | ०.३१ |
| | १३३३ | ०-०१-६५ पो.ख.०-००-४८ एकुण ०-०२-१३ | १.०० |
| | १३२७ | ०-०१-०१ | ०.५९ |

वर नमुद केलेल्या मिळकतींपैकी गट क्र. १३२८, १३३०, १३३२ चे संपूर्ण क्षेत्र तसेच गट क्र. १३३१, १३३३ व १३२७ यामधील विदयमान मालकांचा अविभाज्य हिस्सा हा या जाहीर नोटीशीचा विषय आहे.

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. १३-०६-२०२६

**ॲड. प्रदीप गो. तांडेल**
ओम निवास श्री. स्वामी समर्थ नगर,
पिंपळभाट चेंढरे अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग

दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**

**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## जाहीर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी तलाठी सजा-पेण, ता.पेण, जि.रायगड यांचे हद्दीतील मौजे-पेण ग्रामीण येथील खालील नमूद पड जमिन मिळकतीचे विद्यमान मालक श्री.जर्नादन बारक्या पाटील यांचेकडून कायम रजि. खरेदीखताने खरेदी करण्याचे ठरविले असून विद्यमान मालक व आमचे अशिल यांचेमध्ये चर्चा व वाटाघाटी होऊन उभयपक्ष यांचेमध्ये कायम रजि.खरेदीखताने खरेदी करण्याबाबत करार करण्यात आलेला आहे.

मिळकतीचे वर्णन :- मौजे-पेण ग्रामीण, तलाठी सजा-पेण, ता.पेण, जि.रायगड येथील खालील पड जमिन मिळकत.

| गांव | भूमापन क्र. व उपविभाग | एकूण क्षेत्र हे. आर. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| पेण ग्रामीण | ४५४/२ | ०.३०.१० | १.६९ |

वरील मिळकत या नोटीसचा विषय आहे.

येणेप्रमाणे सदर मिळकतीत आजमितीस अस्तित्वात असलेले सर्व काष्ट, पाषाण यासह विद्यमान जमिन मालक श्री. जर्नादन बारक्या पाटील यांचेकडून आमचे अशिलांनी कायम मालकी हक्क तत्वाने रजि.खरेदीखताने विकत घेण्याचे मान्य केले असून तसा साठेकरार उभयपक्ष यांचेमध्ये झालेला असून सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याची ग्वाही विद्यमान जमिन मालकांनी दिलेली आहे.

सदर मिळकतीबाबत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरहरकत, ताबाकब्जा, वहिवाट, इजमेंट, कोणत्याही व्यक्तीचा अथवा संस्थेचा तारण-गहाण, दान, बक्षीस, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा जप्ती, जामीन अगर कोणताही तत्सम हक्क व हितसंबंध असल्यास जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत नोंदवावी.

मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरहरकत न आल्यास त्यांनी त्यांचा असणारा हक्क आमचे अशिलांचे लाभांत सोडून दिला आहे असे समजून खरेदीखत पूर्ण करतील. मागाहून आलेली हरहरकत विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

पेण
दि. १८/०६/२०२६

खरेदीदाराचे वकील
**ॲड.श्री.विनोद शंकर म्हात्रे,**
ऑफिस:- शॉप नं. ७, माऊली जनता कॉम्प्लेक्स,
जनता हार्डवेअर शेजारी, राजू पोटे मार्ग, पेण,
ता. पेण, जि. रायगड ४०२ १०७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकती ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांनबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे-दहिगाव, ता.कर्जत, जि.रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकारणी | |
|---|---|---|---|---|---|
| १) श्री. दिपेश संतोष फराट<br>२) श्री. धनंजय संतोष फराट<br>३) श्री. रविंद्र सदाशिव फराट<br>४) श्री. सचिन सदाशिव फराट | ६ | २ | ०-४३-७० | ३ | ७५ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक- १९/०६/२०२६
मो.नं. ९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अपार्टमेंट,
कर्जत नगरपालिका कार्यालय शेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड, ४१०२०१. ई मेल:- adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे सायडोंगर, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतीचे मालक विवेक जटाशंकर सिंग यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १३/२/अ | ००-३६-७० या एकूण क्षेत्रापैकी रस्त्याकरीता दिलेले क्षेत्र वगळून ००-३४-७० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राच्या मिळकतीबाबत | ०१.६९ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतीबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून, १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १९ जुन २०२६

**ॲड. शरद आर.सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि. कोतवालनगर कर्जत
ता.कर्जत, जि.रायगड-४१०२०१
मो.नं. ९५२७२८२५२५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल १. कैलास नारायण बोराडे रा.एकसळ, ता.कर्जत, जि.रायगड २. सौ.गिता उमेश देशमुख रा. शिरसे, ता. कर्जत, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत जमिन मालक श्री. सुधाकर देहू सकपाळ रा. १०४ हिरजी बाग सीएचएस सुमती अपार्टमेंट जकेरिया बंदर रोड शिवडी मुंबई ४०००१५ यांच्या कडून कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे. ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार(रू. पै.) |
|---|---|---|---|
| ९१ | १२ | ०-३०-० | ०=१० |

सबब वरील मिळकतीबाबत कोणाचेही कसलेही गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, ट्रस्ट पोटगी, वारस, भाडेपावती, वहीवाट वा तत्सम कोणतेही हक्क हितसंबंध असतील तर आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांच्या आत खाली सही करणार खरेदीखत लिहुन घेणार यांचे वकील यांच्याकडे स्वतः येवुन लेखी कळवाव्यात. वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजण्यात येवुन विद्यमान मालकांबरोबर सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्या अशिलांच्यावर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

दिनांक : १९/०६/२०२६

**ॲडव्होकेट गितेश मोतीराम सावंत**
मु.शिरसे, पो.कोंदिवडे, ता.कर्जत,
जि. रायगड. ४१० २०१
मो.नं. ९६८९६८८२७२

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असुन त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे कळंबोशी, ता.सुधागड, जि. रायगड. येथील जमीन मिळकत.**

**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | स.नं. | क्षेत्र हे. आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. राजेश जगशी छेडा. | ६२/५ | ०-४९-०० | ०-३७ |
| श्री. किशोर जगशी छेडा. | ५७/८ | ०-७६-०० | ०-२५ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणातीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन त्यासंबंधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबंध नाही व असल्यास त्यानी ते जाणीवपुर्वक सोडुन दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पुर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १९/०६/२०२६

खरेदीदारांतर्फे,
**राठोड एण्ड एसोसिएट्स**
२८६ अ राठोड सदन ऑफिस नं. ७ पाली, ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९०२८६३५३३७/९२७०३६७२९०

## सार्वजनिक सूचना

बँक ऑफ इंडिया, भाल शाखा यांच्याद्वारे सूचित करण्यात येते की, श्रीमती समीक्षा सतीश पोसम आणि श्री. सतीश पोसम यांच्या मालकीच्या मालमत्तेचा पनवेल येथील दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणीकृत विक्री करारनामा (Agreement to Sale Deed) दस्तऐवज क्रमांक २९५१/२०२५ दि.१२/०२/२०२५ हरवला आहे. सदर मूळ दस्तऐवज बँकेच्या शाखेच्या आवारातून किंवा अन्य कोठूनतरी हरवला असून तो अद्याप सापडलेला नाही. जर कोणाकडे सदर मालमत्तेशी संबंधित तो मूळ दस्तऐवज असेल, तर त्यांनी तो खालील पत्त्यावर सुपूर्द करावा. ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांनंतर या दस्तऐवजाच्या आधारे केल्या जाणाऱ्या कोणत्याही दाव्याचा विचार केला जाणार नाही.

बँक ऑफ इंडिया, भाल शाखा, भाल नाका,
राज बंगला, अलिबाग-रेवस रोड,
अलिबाग - ४०२२०७.

## जाहिरनामा

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

कृष्णा जोमा ठाकूर,
रा.दुष्मी.पो.जिते, ता.पेण,जि.रायगड. अर्जदार

विरुद्ध

ग्रामपंचायत दुष्मी-खारपाडा,
ता.पेण,जि.रायगड. सामनेवाला

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा नितेश कृष्णा ठाकूर यांचा जन्म दिनांक १५/०७/१९८३ रोजी मौजे दुष्मी, पो. जिते, ता.पेण, जि.रायगड येथे झाला असून त्याच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत दुष्मी-खारपाडा, ता.पेण, जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने जन्म नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या जन्माची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे, कोणाचेही काही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे. कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा जन्म नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- पेण
दि. १९/०६/२०२६

सही
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) मंदार द्वारकानाथ पुरोहित २) सचिन पांडुरंग शिंदे यांचे कडुन कायम मालकी हक्क विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | एकुण क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड | ६६ | १२-५०-०० | १२५.०० |
| नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड | ७४ | ४०-२०-०० | ४०२.०० |

वर वर्णन केलेली जमिन मिळकती तसेच त्यावर असणारी ग्रुप ग्रामपंचायत नागांव, घर क्र. १६६, क्षेत्र १६६५ चौ. फूट हि घर मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५(पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक १८/०६/२०२६

**ॲड राहूल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

सत्यमेव जयते
Government of Gujarat

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर क्र.१, पनवेल यांचे कार्यालय**
**सिडको समाज मंदिर बिल्डिंग, पहिला मजला, बांठिया हायस्कूल जवळ, सेक्टर १८,**
**नवीन पनवेल, ता. पनवेल जि. रायगड ४१०२०६**

दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२५९०, फॅक्स क्र. ०२२-२७४५२५९०,email :- dclamc1panvel@gmail.com

क्रमांक : भूसंपादन/कात- १/विरार अलिबाग बहु. मा/२०२६/१६९७ दिनांक :- १७/०६/२०२६

**महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ चे कलम १९ (ब) अन्वये भूसंपादनाचा मोबदला स्विकारण्याचा विकल्प/पर्याय देणेबाबत**

**जाहिर नोटीस**

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमधील तसेच रायगड जिल्ह्यातील वाहतुकीच्या सर्वांगिण विकासाच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील विरार-अलिबाग बहुउद्देशिय महामार्ग प्रकल्प अर्थात राज्यमार्ग (विशेष) क्रमांक ४- करीता खालील तक्त्यात नमूद गावातील जमिनींच्या भूसंपादनाची महाराष्ट्र महामार्ग अधिनियम, १९५५ च्या कलम १५ (२) खालील अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात दि.१२/०८/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, उपरोक्त नमूद गावातील अधिसूचीत जमिनीच्या बाबतीत उक्त अधिनियमाच्या कलम १९ (ब) अन्वये जिल्हास्तरीय मोबदला निश्चिती समितीने भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करतांना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २६ ते ३० व अनुसूची-१ अन्वये दि. १२/०३/२०२६ रोजीच्या बैठकीत मोबदला निर्धारीत करून दिला आहे.

त्याअर्थी, जे भूधारक दिलेल्या मुदतीत संमतीपत्र दाखल करतील व त्याबाबत संपादनाखालील जमीन निर्वेध व निर्जोखमी असल्याची भूसंपादन अधिकारी यांची खात्री पटवुन देतील त्यांना उपरोक्त नमूद अधिनियमातील तरतुदींप्रमाणे निर्धारीत मोबदला रक्कमेवर महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाचे कलम १९ (ब) (२) अन्वये अतिरिक्त २५ टक्के वाढीव मोबदला देण्यात येईल. तसेच जे भूधारक दिलेल्या मुदतीत संमतीपत्र व संमती करारनामा करून देणार नाहीत, त्यांना सदरचा अतिरिक्त २५ टक्के वाढीव मोबदला मिळणार नाही व अशा प्रकरणात भूसंपादन अधिकारी यांचेकडून महाराष्ट्र महामार्ग अधिनियमाचे कलम १९ (ब) (३) अन्वये निवाडा घोषीत करून जमीन ताब्यात घेण्यात येईल. सदर संमती व विनासंमती मोबदला रक्कमेच्या तपशीलासहीत विकल्प देण्यासाठीची स्वतंत्ररित्या व्यक्तीक नोटीसा संबंधीत क्षेत्राचे प्राधिकृत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र.१, पनवेल तथा सक्षम प्राधिकारी, विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गीका यांनी निर्गमित केल्या असून, सदर वैयक्तिक नोटीसा हितसंबंधितांनी संबंधित गावांचे तलाठी यांचेकडून प्राप्त करून घ्याव्यात.

तसेच असेही कळविण्यात येते की, नोटीसमध्ये नमूद मोबदल्याबाबत आपली संमती मौजे मोर्बे करीता दि. २५/०६/२०२६ व मौजे वावंजे करीता दि. ०७/०७/२०२६ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत संबंधीत क्षेत्राचे प्राधिकृत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र.१, पनवेल तथा सक्षम प्राधिकारी, विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गीका यांचे कार्यालयात सदर नोटीसीत नमूद कागदपत्रांसह संमतीपत्र सादर करावेत. वरील तारखेपर्यंत संमतीपत्र प्राप्त न झाल्यास आपली संमती नाही असे समजून अतिरिक्त २५ टक्के वाढीव मोबदल्याशिवाय कलम १९(ब) (३) अन्वये भूसंपादनाचा निवाडा संबंधीत प्राधिकृत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) मेट्रो सेंटर क्र.१, पनवेल तथा सक्षम प्राधिकारी, विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गीका यांचेकडून घोषीत करण्यात येईल, याची हितसंबंधितांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव |
|---|---|---|
| १ | पनवेल | वावंजे |
| २ | | मोर्बे |

ठिकाण : पनवेल
दिनांक : १७/०६/२०२६

सही/-
**(जनार्दन कासार)**
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
मेट्रो सेंटर क्र.१, पनवेल तथा
सक्षम प्राधिकारी,
विरार अलिबाग बहुउद्देशिय मार्गीका

# नेरळची तहकूब ग्रामसभा 'हाऊसफुल्ल'

**● पाणी, अतिक्रमण, स्मार्ट मीटरसह विविध प्रश्नांवर चर्चा ● अनुचित प्रकार टाळण्यासाठी पोलिसांचा खडा पहारा**

**| नेरळ | प्रतिनिधी |**

**कर्जत तालुक्यातील सर्वात मोठ्या ग्रामपंचायतींपैकी एक असलेल्या नेरळ ग्रामपंचायतीची तहकूब ग्रामसभा ग्रामस्थांच्या विक्रमी उपस्थितीत आणि कडेकोट पोलीस बंदोबस्तात पार पडली. महिलांचा मोठा सहभाग लाभलेल्या या ग्रामसभेत पाणीटंचाई, अतिक्रमण, शासकीय जागांचे संरक्षण, स्मार्ट मीटर, वाहतूक कोंडी आदी विविध प्रश्नांवर जोरदार चर्चा झाली. बहुसंख्येने महिलांचा मोठा सहभाग असलेली नेरळच्या इतिहासातील ही पहिलीच ग्रामसभा ठरली आहे. दरम्यान, अनेक विषय मार्गी लावणारी आणि अनेक विषयांमध्ये ग्रामस्थांचे समाधान न झालेली अशी ही ग्रामसभा ठरली.**



नेरळ ग्रामपंचायतीची तहकूब ग्रामसभा प्रशासक सुजित धनगर यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी रायगड जिल्हा परिषदेच्या सदस्य सुनीता मोरे, कर्जत पंचायत समितीचे सदस्य भगवान चंचे, कविता शिंगवा आणि ग्रामपंचायत अधिकारी अरुण कार्ले आदी उपस्थित होते. या तहकूब ग्रामसभा असूनदेखील या ग्रामसभेला पहिल्यांदाच सर्वाधिक गर्दी होती. ग्रासमभेच्या सुरुवातीपासून गोंगाट आणि आपले प्रश्न झाले पाहिजेत यासाठी धावपळ सुरु होती. त्यात कर्जत पंचायत समितीच्या माजी सदस्य सुमित्रा सुगवेकर यांनी या गोंगाटात सभागृह सोडले आणि आपली प्रतिक्रिया दिली. त्यात सुनील पारधी हे आदिवासी समाजासाठी हक्काचा निधी मिळाला नाही म्हणून प्रश्नांनाची सरबत्ती केली. लव्हल वाडी आणि टपाल वाडी येथील महिलांनी पिण्याचे पाणी मिळत नाही म्हणून प्रश्न उपस्थित केले, तर आठ दिवसात जलवाहिनी टाकून पाणी दिले जाईल, असे आश्वासन देण्यात आले.सुनील पारधी यांनी लव्हाळवाडीतील धनगरांना घरकुल वस्तीला पाणी देण्यात आले तसेच सर्व वाड्यांमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना घरपोच पाणी देण्यात यावे.

साईकृपा व्हॅलीमधील रहिवासी मृणालिनी शेळके, ब्रिजिटा डीकोस्टा, श्रद्धा चव्हाण, अश्विनी जोशी, सुनीता बनसोडे, नरेश शेंडे तसेच अनेक रहिवाशांनी तेथील पाण्याचा प्रश्न उपस्थित केला. रहिवाशांनी महिलांनी गर्दी करीत पाणी मिळत नसल्याने पाणी नाहीतर टॅक्स नाही, अशी भूमिका घेतली. शेवटी आठ दिवसात दोन इंचाची जलवाहिनी टाकून देण्याचा निर्णय झाला.

नेरळ धरणाजवळील अतिक्रमण तात्काळ काढावे अशी मागणी तरुणांनी केली, तर ग्रामसेवक आणि प्रशासक यांना अ‍ॅट्रॉसिटी गुन्ह्याची धमकी देणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी असा ठराव एकमताने घेण्यात आला. प्रथमेश मोरे यांनी नेरळ ग्रामपंचायत हद्दीतील सर्व फूटपाथ मोकळे करून अतिक्रमण मुक्त फुटपाथ करण्याची मागणी केली. पाटील गुरुजी यांनी नेरळ परिसरात खूप समस्या आहेत. फुटपाथ, गाड्यांची ट्रॅफिक, कचरा, तसेच फुटपाथवर बरीच भाजी विक्रेती आहेत, तर ते खाली करण्यात यावे अशीदेखील मागणी करण्यात आली. सनी चंचे यांनी आपल्या ग्रामपंचायतीचे जे शासकीय जागा आहेत, त्या सर्व जागा ताब्यात घेऊन मोजणी करण्याचे मागणी केली. घरपट्टी पाणीपट्टी ही ऑनलाइन भरता यावी अशी सुधारणा तात्काळ करावी, असा ठराव भगवान चंचे यांनी मांडला. नेरळ ग्रामपंचायत हद्दीत हिंदू समाज मंदिरासाठी १५ गुंठे जमीन देण्याची मागणी केली असता त्याचा ठराव संमत करण्यात आला. नायजेरियन लोकांची वस्ती आपल्या वॉर्डात आहेत, तरी सदरच्या लोकांची चौकशी करून घेण्यात यावी अशी मागणी प्रफुल्ल यांनी केली. तर बाजारपेठेमध्ये जे व्यापार करतात ते कुठून येतात, ते बांग्लादेशी आहेत की कुठले आहे त्यांच्या माहिती घेण्यात यावी अशी मागणी शाम कडव यांनी केली. शाम कडव यांनी कल्याण कर्जत रस्त्यालगत रस्त्या शेजारील (हायवे) शेजारीला कचरा कुंडी कोणी तोडली असून, त्यामुळे पाण्याचा आऊटलेट बंद केला आहे, त्याच्यावर कारवाई करण्यात यावी आणि तेथे बांधलेले गाळे यांना परवानगी नाही आणि पोलीस बंदोबस्त घेऊन कारवाई करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. बंडू क्षीरसागर यांनी स्मार्ट मीटर लावण्यात येऊ नये असा ठराव मांडला आणि तो ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. ग्रामसभेत संजय मनवे, सावळाराम जाधव, परेश सुर्वे, सनी चंचे, भगवान चव्हाण, सूर्यकांत चंचे, प्रथमेश मोरे, बंडू क्षीरसागर, विशाल साळुंखे, पाटील गुरुजी, शाम कडव, उमेश भागीत, गोरख शेप, रोहिदास मोरे यांनी प्रश्न उपस्थित केले.

## उपाध्यक्षपदी नरेश जोशींची निवड

**| नेरळ | प्रतिनिधी |**



कर्जत तालुक्यातील उद्योजक नरेश जोशी यांची अखिल पोलीस मित्र सुरक्षा परिषदेच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. अखिल पोलीस मित्र सुरक्षा परिषद मोठ्या प्रमाणात सार्वजनिक क्षेत्रात सामाजिक क्षेत्रात अनेक उपक्रम असतात. उद्योजक नरेश जोशी यांच्याकडे प्रदेश उपाध्यक्ष देण्यात आल्याने आगामी काळात आणखी मोठे सामाजिक उपक्रम राबवले जातील, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर साळोखे आणि राज्य अध्यक्ष किशोर शितोळे यांनी दिली आहे. नरेश जोशींच्या निवडीवर सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## नि|व|ड|क

### कांतीलाल कडूंच्या कादंबरीचे रविवारी प्रकाशन

**उरण :** महाभारत या अजरामर ग्रंथाकडे आधुनिक दृष्टिकोनातून पाहणारी आणि राजकारण, समाजकारण, नीतीशास्त्र, विज्ञाननिष्ठ अध्यात्म, मानसशास्त्र तसेच तत्त्वज्ञानाचा संगम घडविणारी ज्येष्ठ साहित्यिक कांतीलाल कडू यांची बहुचर्चित व्यासांचे महाभारत ही कादंबरी आता वाचकांच्या भेटीला येत आहे. या कादंबरीचा प्रकाशन सोहळा रविवार, दि. २१ जून रोजी सकाळी १०.३० वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे आयोजित करण्यात आला आहे. शर्वय प्रकाशन प्रकाशित या कादंबरीची किंमत ५०० रुपये ठेवण्यात आली असून, प्रकाशनानंतर ती ॲमेझॉन, फ्लिपकार्ट तसेच पोस्टाद्वारेही उपलब्ध होणार आहे. साहित्यप्रेमी, अभ्यासक, विद्यार्थी, विचारवंत आणि महाभारताचा नव्या दृष्टीने अभ्यास करू इच्छिणाऱ्या वाचकांसाठी हा प्रकाशन सोहळा एक पर्वणी ठरणार आहे. सध्या या कार्यक्रमाची जोरदार तयारी सुरू असल्याचे आयोजकांकडून सांगण्यात आले.




### मगर संवर्धन दिनानिमित्त करंजखोल प्राथमिक शाळेत जनजागृती

**महाड :** जागतिक मगर संवर्धन दिनानिमित्त करंजखोल प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांसाठी मगर संवर्धन व वन्यजीव जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सिस्केप संस्था, महाड वनपरिक्षेत्र कार्यालय, वनविभाग रोहा तसेच प्रिव्ही आणि प्रीजीव स्पेशालिटी लिमिटेड, महाड यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. महाड शहरालगत वाहणाऱ्या सावित्री नदीमध्ये इंडियन मार्श क्रोकोडाइल (मगर) या जातीच्या मगरी आढळतात. नैसर्गिक किंवा अनैसर्गिक कारणांमुळे काही वेळा या मगरी मानवी वस्तीजवळ दिसून येतात. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते.

मात्र, मगरींबाबत वैज्ञानिक माहिती व संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी स्लाईड शोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मगरींची जीवनशैली, अधिवास, पर्यावरणीय महत्त्व तसेच वन्यजीव संरक्षणाविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. लहान वयातच वन्यजीवांबद्दल योग्य माहिती मिळाल्यास विद्यार्थ्यांमध्ये संवर्धनाची जाणीव निर्माण होते, असा संदेश यावेळी देण्यात आला. कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक स्वप्नील बनसोडे व शिक्षकवृंद यांनी सिस्केप संस्थेचे सदस्य प्रेमसागर मेस्त्री, गणेश खातू, प्रणव शेलार आणि विराज पाटील यांचे स्वागत केले. गेल्या अनेक वर्षांपासून सिस्केप संस्थेमार्फत शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी वन्यजीव संवर्धनासंदर्भातील विविध उपक्रम राबविले जात आहेत. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन विषय शिक्षिका स्नेहल गणेश खातू यांनी केले.

### अडीच कोटींची दागिन्यांची बॅग चोरली

**नवीन पनवेल :** टूर्स अँड ट्रॅव्हल्समधून प्रवास करत असताना अनोळखी इसमाने २ कोटी ६४ लाख १८ हजार रुपये किमतीचे दागिन्यांची बॅग चोरून नेल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात १७ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी विक्रमसिंग लाखसिंग हे काळबादेवी, मुंबई येथे राहात असून, ते १५ जून रोजी त्यांचे साथीदार हेमराज सुतार असे दोघेजण डॉल्फिन टूर्स अँड ट्रॅव्हल्स या कंपनीच्या बसमधून प्रवास करत होते. सीट क्रमांक सात आणि आठमधून विजापूर कर्नाटक ते पुणे-मुंबई एक्स्प्रेस हायवे संपल्यानंतर कळंबोली मॅकडोनाल्डच्या समोर पुणे-मुंबई लेनवर प्रवास करत असताना अज्ञात इसमाने त्यांच्या ताब्यातील दागिन्यांची असलेली बॅग चोरून नेली. यात सोन्याचे विविध प्रकारचे दागिने, अंगठ्या, पेंडल, लॉकेट, बाळ्या, टॉप्स, मंगळसूत्र यांचा समावेश आहे. याबाबतची तक्रार कामोठे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. पोलिसांनी अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल केला असून, अधिकम तपास पोलीस करीत आहेत. दिवसेंदिवस वाढत असणाऱ्या चोरीच्या घटनांनी चोरट्यांनी पोलिसांसमोर आव्हान निर्माण केल्याचे चित्र दिसून येत आहे.

# तवसाळकर रस्त्याजवळील मोरीचे काम थांबवा

**■ कार्यकारी अभियंता यांना निवेदन सादर**

**| आगरदंडा | प्रतिनिधी |**

मुरूड शहराजवळील तवसाळकर रस्त्यावरील सुरू असलेल्या मोरीच्या बांधकामात त्रुटी असल्याचा आरोप करत हे काम तातडीने थांबवून नव्याने अंदाजपत्रक तयार करावे, अशी मागणी नगरसेविका प्रांजली मकु यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केली आहे. याबाबतचे निवेदन अलिबाग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले असून ते मुरूड सार्वजनिक बांधकाम विभागाचे कनिष्ठ अभियंता रुतिक घोडेस्वार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.


(छायाचित्र : गणेश चोडणेकर)

निवेदनात म्हटले आहे की, तवसाळकर रस्त्यावरील मोरीचे काम चुकीच्या पद्धतीने सुरू असून तिची रुंदी व खोली अपुरी ठेवण्यात येत आहे. तसेच मोरीची उंचीही विद्यमान डांबरी रस्त्याच्या तुलनेत जास्त असल्याचा दावा करण्यात आला आहे. नवीन मोरी ही जुन्या मोरीपेक्षा अरुंद बांधली जात असल्याने पावसाळ्यात पाणी तुंबण्याचा धोका वाढू शकतो, अशी भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

भोसलेवाडीतील रहिवाशांच्या घरांमध्ये पूर्वीही पाणी शिरून आर्थिक नुकसान होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यासंदर्भात मे महिन्यात बांधकाम विभागाकडे पत्रव्यवहार केला होता. मात्र त्यानंतरही काम सुरू असल्याने सध्याचे बांधकाम थांबवून मोरीची रुंदी व खोली वाढविण्यात यावी, अशी मागणी केली आहे. या निवेदनाची प्रत तहसीलदार, बांधकाम विभाग तसेच मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. यावेळी नगरसेविका प्रांजली मकु, अरविंद गायकर, विशाल कोलवणकर, जाहिद फकजी आणि ऋत्विज मकु उपस्थित होते.

# नालेसफाई की बिलफुगवटा?

**■ उरणमध्ये कचऱ्याचे ढीग**
**■ डेंग्यूच्या सावटाखाली नागरिकांचे आरोग्य धोक्यात**
**■ ठेकेदाराचे दुर्लक्ष की प्रशासनाचे अभय?**

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण नगरपालिकेच्या हद्दीत पावसाळ्यापूर्वी करण्यात येणाऱ्या नालेसफाईच्या कामाचा फज्जा उडाल्याचे चित्र सध्या शहरभर पाहावयास मिळत आहे. नाल्यातील गाळ व कचरा काढून तो रस्त्याच्या कडेला ढीग करून टाकण्यात आला आहे. मात्र, अनेक दिवस उलटूनही हा कचरा उचलण्यात आलेला नसल्याने ठेकेदार आणि नगरपालिका प्रशासनाच्या निष्क्रिय कारभारावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

मान्सून तोंडावर आला असताना जून महिना अर्ध्याहून अधिक संपला, तरी नालेसफाईची कामे अद्याप सुरूच आहेत. विशेष म्हणजे, ज्या नाल्यांची सफाई करण्यात आली आहे, त्या नाल्यांमधून काढलेला कचरा जागोजागी उकिरड्याप्रमाणे पडून आहे. त्यामुळे शहराचे विद्रूपीकरण तर झालेच आहे, शिवाय दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांचे आरोग्यही धोक्यात आले आहे.

उरण शहरातील आनंदनगरसह इतर परिसरात नालेसफाईनंतर काढलेला कचरा अनेक दिवसांपासून रस्त्याच्या कडेला पडून आहे. जर मुसळधार पाऊस सुरू झाला, तर हाच कचरा पुन्हा नाल्यात वाहून जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे नाले पुन्हा तुंबतील आणि पुन्हा त्याच नाल्यांची सफाई करून लाखोंची बिले काढण्याचा डाव तर नाही ना, असा संशय नागरिक व्यक्त करू लागले आहेत.

सध्या उरण शहरात डेंग्यू, व्हायरल ताप, सर्दी-खोकला आणि इतर साथीच्या आजारांचे प्रमाण वाढू लागले आहे. अशा परिस्थितीत नाल्यातील कुजणारा कचरा, साचलेले पाणी आणि अस्वच्छ वातावरण हे डासांच्या उत्पत्तीसाठी पोषक ठरत आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. एकीकडे आरोग्य विभाग जनजागृतीचे फलक लावत आहे, तर दुसरीकडे रस्त्यावर पडलेला कचरा प्रशासनाच्या दाव्यांची पोलखोल करत आहे.

यासंदर्भात नगरपालिका आरोग्य निरीक्षक हरेश तेजी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, त्यांनी फोन उचलला नाही. तसेच त्यांच्या विभागात प्रत्यक्ष भेट दिली असता ते कार्यालयातही अनुपस्थित असल्याचे आढळून आले. त्यामुळे ठेकेदार आणि संबंधित अधिकाऱ्यांमध्ये आर्थिक साटेलोटे असल्याचा संशय नागरिकांमधून व्यक्त केला जात आहे.

## चेन खेचून चोरटा पसार

**नवीन पनवेल :** पायी चालत जाणाऱ्या फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची चेन खेचून चोर मोटारसायकल वरून पसार झाले. याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात १६ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील फिर्यादी हे व्हिके हायस्कूल ते पुणे मुंबई हायवेवर फुटपाथवरून पायी चालत जात होते. वडाळा तलावाच्या बाजूला असलेल्या नंदनवन सोसायटीच्या समोर आले असता त्यांच्यासमोर हेल्मेट घातलेला इसम आला. त्याने फिर्यादीच्या गळ्यातील चेन खेचून बाजूला उभ्या असलेल्या मोटारसायकलवरून पळून गेला.

## तालुक्यातील शाळांना शैक्षणिक साहित्य वाटप

**| पाली/गोमाशी | प्रतिनिधी |**

'द लाईफ फाऊंडेशन, मुंबई' यांच्यावतीने सुधागड तालुक्यातील १४७ जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व नांदगाव माध्यमिक विद्यालय यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, पाली पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर, पंचायत समिती प्रशासन अधिकारी थळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच द लाईफ फाऊंडेशनचे प्रदीप दबडे व प्रणय ओव्हाळ यांच्यासह तालुक्यातील सर्व केंद्र प्रमुख व विविध शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाटप करण्यात आलेल्या शैक्षणिक साहित्यात एकेरी,




दुरेगी, बॉक्स या विविध प्रकारच्या वह्यांचे समावेश होता. या उपक्रमामुळे ग्रामीण व दुर्गम भागातील हजारो गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाची सुरुवात अधिक सुलभतेने करता येणार आहे.

यावेळी पोलीस निरीक्षक हेमलता शेरेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षणाचे महत्त्व विशद केले. गटशिक्षणाधिकारी बांगारे यांनी सांगितले की, एका तालुक्यातील १४७ शाळांपर्यंत एकाच वेळी मदत पोहोचवणे हे कौतुकास्पद काम आहे. द लाईफ फाऊंडेशनचे प्रदीप दबडे म्हणाले, "शिक्षण हाच विकासाचा पाया आहे. सुधागडमधील एकही विद्यार्थी साहित्याअभावी मागे राहू नये, हा आमचा उद्देश आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राम संकाये व आभार प्रदर्शन केंद्र प्रमुख राणे केले.

## विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत

**| खांब | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील कृषीनिष्ठ बाहे गावातील प्राथमिक शाळेत इयत्ता पहिलीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मोठ्या उत्साहापूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले.

येथील प्राथमिक शाळेत १५ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात इयत्ता पहिलीच्या प्रवेश उत्सवाने झाली. या कार्यक्रमासाठी नायब तहसीलदार निलेश गव्हाणकर व चिल्हे सजा तलाठी रोहित रांजणे तलाठी यांनी आपली महत्त्वपूर्ण उपस्थिती नोंदविली तसेच त्यांच्यासमवेत पो.पाटील मनोज थिटे, राकेश देवकर, रोशन मोरे, संदीप थिटे आदींसह शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मोफत गणवेश, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत वह्या वाटप करून व वृक्षारोपण करून करण्यात आले. नायब तहसीलदार निलेश गव्हाणकर यांनी मार्गदर्शनपर माहिती देऊन उद्बोधन केले. तसेच या कार्यक्रमास बाहे गावाचे ग्रामस्थ, शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी व सदस्य, पालक, माता पालक, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## चिवेतील शेतकऱ्यांची तहसीलदार कार्यालयावर धाव

**■ फेरफार नोंदीत परस्पर बदलाचा आरोप**
**■ हितसंबंधितांना नोटीस न देताच फेरफार मंजूर केल्याचा दावा**

**| पाली/बेणसे | प्रतिनिधी |**

सुधागडतालुक्यातीलचिवेयेथील सर्व्हे क्रमांक ३ मधील जमिनीच्या फेरफार नोंदीवरून वाद निर्माण झाला असून, संबंधित जमीनधारकांना कोणतीही पूर्वसूचना अथवा कायदेशीर नोटीस न देता जमिनीची आकारफोड मंजूर करण्यात आल्याचा आरोप ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी केला आहे. याप्रकरणी संतप्त शेतकऱ्यांनी पाली-सुधागड तहसीलदारांकडे लेखी हरकत अर्ज दाखल करून फेरफार नोंद रद्द करण्याची मागणी केली आहे.



(छायाचित्र : धम्मशील सावंत)

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, सर्व्हे क्रमांक ३ मधील जमीन ही राकेश रामचंद्र ठाकूर व इतर ग्रामस्थांची वडिलोपार्जित मालमत्ता असून, संबंधित जमिनीवर त्यांचा प्रत्यक्ष ताबा आहे. तसेच प्रत्येकाच्या नावे स्वतंत्र ७/१२ उतारे अस्तित्वात आहेत. अर्जदारांच्या आरोपानुसार, गैरअर्जदार गजानन उत्तमराव मांटे (पाटील) यांनी महसूल विभागाकडे आरटीएस अर्ज सादर केल्यानंतर या जमिनीच्या आकारफोडीत बदल करण्यात आला. त्यानंतर पेडली येथील मंडळ अधिकाऱ्यांनी ४ जून २०२६ रोजी फेरफार क्रमांक १८३० मंजूर केल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### फेरफार नोंदीला स्थगितीची मागणी

चिवे गावातील शेतकऱ्यांनी तहसीलदारांकडे सादर केलेल्या अर्जात फेरफार क्रमांक १८३० तसेच सर्व्हे क्रमांक ३ संदर्भातील पुढील सर्व महसुली कामकाजावर तात्पुरती स्थगिती देण्याची मागणी केली आहे. तसेच प्रकरणाशी संबंधित सर्व शासकीय कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करून देण्यात याव्यात आणि सखोल चौकशी करून बेकायदेशीर ठरल्यास फेरफार नोंद रद्द करण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे.

**पनवेल जंक्शनवरील ताण होणार कमी | मालगाड्यांचा ११० मिनिटांचा वेळ वाचणार**

# सोमाटणे-चिखली कॉर्ड लाईनला १७२ कोटींची मंजुरी

**■ जेएनपीटी मालवाहतुकीलाही मोठा फायदा**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

रेल्वे पायाभूत सुविधांच्या बळकटीकरणासाठी भारतीय रेल्वेने सोमाटणे-चिखली रेल्वे कॉर्ड लाईन प्रकल्पाला १७२ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. मध्य रेल्वेच्या अखत्यारीतील ३.७ किलोमीटर लांबीच्या या प्रकल्पामुळे पनवेल जंक्शनवरील रेल्वे वाहतुकीचा ताण कमी होण्यासह मालवाहतुकीची कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे.



सध्याकर्जतमार्गावरूनरोहाच्या दिशेने जाणाऱ्या मालगाड्यांना पनवेल जंक्शनमध्ये प्रवेश करून इंजिनची दिशा बदलावी लागते. या प्रक्रियेमुळे वेळेचा अपव्यय होत असून पनवेल स्थानकावरील वाहतुकीवर अतिरिक्त ताण निर्माण होतो. प्रस्तावित कॉर्ड लाईनमुळे चिखली (कर्जत मार्ग) आणि सोमाटणे (रोहा मार्ग) यांच्यात थेट रेल्वे जोडणी निर्माण होणार आहे. त्यामुळे मालगाड्यांना पनवेलमध्ये प्रवेश न करता थेट मार्गाने प्रवास करता येणार आहे.

पनवेल एलिव्हेटेड कॉर्ड लाईन प्रकल्पाच्या एकात्मिक आराखड्याचा भाग असलेल्या या मार्गामुळे प्रत्येक मालगाडीचा सुमारे ११० मिनिटांचा विलंब टळणार असल्याचा अंदाज आहे. परिणामी रेल्वे नेटवर्कवरील गर्दी कमी होऊन मालवाहतुकीचा वेग वाढणार आहे.

देशातीलप्रमुखकंटेनरबंदरांपैकी एक असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट (जेएनपीटी) मार्गावरील मालवाहतुकीलाही या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार आहे. रेल्वे प्रशासनाच्या अंदाजानुसार, नव्या कॉर्ड लाईनमुळे दरवर्षी अतिरिक्त नऊ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळणे शक्य होणार आहे.

### प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये

- ✻ प्रकल्प खर्च : १७२ कोटी रुपये
- ✻ मार्ग लांबी : ३.७ किलोमीटर
- ✻ जोडणी : चिखली (कर्जत मार्ग) ते सोमाटणे (रोहा मार्ग)
- ✻ प्रत्येक मालगाडीचा सुमारे ११० मिनिटांचा वेळ वाचणार
- ✻ पनवेल जंक्शनवरील वाहतुकीचा ताण कमी होणार
- ✻ जेएनपीटीकडे जाणारी मालवाहतूक अधिक वेगवान होणार
- ✻ दरवर्षी अतिरिक्त ९ दशलक्ष टन मालवाहतूक हाताळण्याची क्षमता



## राशीभविष्य

- **मेष :** आजचा दिवस उत्साहाचा राहील. अपेक्षित भेटीतून फलप्राप्ती होईल. विद्यार्थ्यांना सुसंधी लाभतील.
- **वृषभ :** अनुभवींचा सल्ला ध्यानी घ्यावा. घाईगडबडीने निर्णय घेऊ नयेत. प्राप्तीचं प्रमाण उत्तम राहील.
- **मिथुन :** कौटुंबिक प्रश्नातून मार्ग निघेल. महत्त्वाची कामं विनासायास होतील. कला-गुणांना वाव मिळेल.
- **कर्क :** गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. स्थावर प्रश्नात लाभ होईल. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **सिंह :** नव्या कामांना चालना मिळेल. प्रेम प्रकरणात तडजोडीची भूमिका ठेवावी. प्रवास शक्यतो टाळावा.
- **कन्या :** अनावश्यक खर्च टाळावा. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. खरेदीचे व्यवहार विचारानं करावे.
- **तूळ :** रखडलेली कामं मार्गी लागतील. नोकरीच्या प्रयत्नात यश येईल. व्यवसायात उत्तम संधी लाभतील.
- **वृश्चिक :** गेलेल्या संधी पुन्हा लाभणार आहेत. स्वकर्तृत्त्वावर विश्वास ठेवा. नव्या विचारांना चालना मिळेल.
- **धनु :** अचानक नव्या समस्या उभ्या राहतील. इतरांचा सल्ला चुकीचा ठरेल. उष्णतेचे विकार उद्‌भवतील.
- **मकर :** नव्या योजनांना गती मिळेल. विवाहाच्या प्रयत्नात अडचणी येतील. विद्यार्थ्यांना समस्या संभवतात.
- **कुंभ :** स्थापत्य क्षेत्रात अनुकूलता राहील. यंत्र, वाहनांपासून जपून असावं. वरिष्ठांची मर्जी राखायला हवी.
- **मीन :** नोकरीत कामाचा ताण वाढेल. सहकाऱ्यांशी जमवून घ्यायला हवं. दिलासादायक घटना घडतील.

स्टाईल स्टेटमेंट

## जमाना ट्रेंडी बॉटम्सचा

गेल्या काही वर्षांमध्ये सलवार कमीझला नवा ट्विस्ट मिळाला आहे. महिला आता कुर्त्यासोबत फिटेड पँट, पलाझो किंवा अगदी स्कर्टही कॅरी करतात.

✻ मध्यंतरी मौनी रॉयने गुलाबी कुर्त्यावर त्याच रंगाची फ्लेअर्ड शरारा पँट घातली होती. या पँटवरचं गोटापत्ती वर्क शोभून दिसत होतं. या लूकसोबत तिने मोजडी कॅरी केल्या होत्या. ✻ व्हाईट कुर्त्यावर तिने त्याच रंगाची सिगारेट पँट घातली होती. या पँटला तिने गोटा लेस लावून घेतली होती. ✻ एका सणाच्या निमित्ताने तिने शरारा पँटवर शिमरी कुर्ता घातला होता. ✻ मौनी प्रवासादरम्यानही एथनिक्स कॅरी करत असते. विमानतळावरही ती फॅशन जपत असते. मौनीने हिरव्या अनारकली कुर्त्यावर व्हाईट फ्लेअर्ड पलाझो पँट कॅरी केली होती. तिचा हा लूक खूपच आकर्षक दिसत होता. मौनीप्रमाणे तुम्हीही एथनिक्समध्ये वेगवेगळे प्रयोग करू शकता. यामुळे तुमचं व्यक्तिमत्त्व चांगलंच उठून दिसेल. त्यामुळे आता लेगिंग्ज, सलवार ठेवा बाजूला आणि ट्रेंडी बॉटम्स ट्राय करा.

## १९ जून

दिन विशेष

**२०१३ :** उत्तराखंडमध्ये निसर्गाच्या रुद्रावतारापुढे प्रवासी, बचाव पथके आणि प्रशासन पथकं हतबल झाल्याचं चित्र.
**२०१५ :** सरकारने सुवर्ण रोखे आणण्याचं जाहीर केलं.
**२०१७ :** राष्ट्रपतीपदासाठी 'एनडीए'कडून रामनाथ कोविंद यांची उमेदवारी जाहीर.
**२०१८ :** भाजपाने दहशतवादाच्या मुद्द्यावर जम्मू-काश्मीरमधील पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टीबरोबरची तीन वर्षांची युती संपुष्टात आणली.

टेक फन

## टेकसॅव्ही छत्र्या

छोट्यांनो, पावसात खेळताना खूप मस्त वाटतं. पण रोज पावसात भिजून चालणार नाही. बाजारात नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून तयार करण्यात आलेल्या छत्र्याही आहेत.

✻ आता ब्लू टूथ कनेक्टिव्हिटी असणाऱ्या छत्र्या बाजारात आल्या आहेत. या छत्र्यांच्या दांड्यांचा वापर तुम्ही सेल्फी स्टीक म्हणूनही करू शकता. या दांड्यात स्मार्टफोन अडकवून फोटो काढण्याची सोय आहे. थ्रीडी प्रिंटेड डिझाइन हे अशा छत्र्यांचं खास आकर्षण आहे. ✻ काही छत्र्यांमध्ये ब्लू टूथ स्पीकरही देण्यात आले आहेत. या स्पीकर फोनला कनेक्ट करून मस्त गाणी ऐकता येतील. यात मायक्रो एसडी कार्ड बसवण्याची सोय आहे. आवाज कमी-जास्त करण्यासाठी छत्रीच्या दांड्यावर वेगळं बटण बसवण्यात आलं आहे. ✻ हँड्स फ्री छत्र्यांचीही सध्या चलती आहे. या छत्र्या हातात धरून चालण्याची गरज नसते. त्या डोक्यावर बसवल्यानंतर तुमचे हात मोकळे रहातात. तुम्ही सायकलवरून शाळेत जात असाल तर अशा छत्र्या उपयोगी पडतील.

### पंचांग

**शुक्रवार, १९ जून २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
निज ज्येष्ठ शु. ५, चंद्रराशी : कर्क,
नक्षत्र : आश्लेषा, योग : हर्षण,
सूर्योदय ६.०४ सूर्यास्त ७.१६

### फॉरवर्ड्स

**बात सजदों क़ी नहीं साहब नियत क़ी हैं...**

**मयख़ाने में हर क़ोई शराबी औऱ मस्ज़िद में हर क़ोई नमाज़ी नहीं होता...!**

आरोग्यमंत्र

## भागवा प्रथिनांची गरज

आहारातून शरीराची प्रथिनांची गरज भागत नसेल तर. ती भागवण्यासाठी सप्लिमेंट्स म्हणजे प्रोटिन शेक, प्रोटिन बार यासारख्या पर्यायी पदार्थांचा वापर केला जातो. पण ही वेळ येऊ नये यासाठी प्रथिनयुक्त घटकांचा आहारात समावेश करायला हवा. त्यासंबंधी...



✻ अंडी हा प्रथिनांचा सर्वोत्तम स्रोत आहे. स्नायूंची क्षमता वाढवण्यासाठी अंडी खाण्याचा सल्ला दिला जातो. प्रथिनांसोबतच यात अमिनो ॲसिड्‌सही असतात. ✻ अंड्यांनंतर चिकनमध्ये बरीच प्रथिनं असतात. त्यामुळे आहारात चिकनचा समावेश करता येईल. ✻ सुरमईमध्ये प्रथिनांचं प्रमाण २५ टक्क्यांनी जास्त असतं. हा मासा ओमेगा ३ फॅटी ॲसिड्‌सने समृद्ध असतो. त्यामुळे आहारात याचा समावेश असावा. ✻ शाकाहारींसाठी पनीर हा प्रथिनांचा चांगला स्रोत मानला जातो. ✻ चवळी, राजमा यासारखी कडधान्यंही प्रथिनांचा उत्तम स्रोत मानली जातात. वजन कमी करायचं असेल तर हा पर्याय निवडता येईल. ✻ बदाम, सूर्यफुलाच्या बिया, जवस, सुका मेवा आणि भोपळ्याच्या बियांमधून तुम्हाला प्रथिनं मिळू शकतात. ✻ रोजच्या आहारात डाळींचा समावेश करा. सकाळी आणि रात्रीच्या जेवणात आमटी, वरण अवश्य ठेवा. डाळींमध्ये प्रथिनांचं प्रमाण बरंच जास्त असतं. मिश्र डाळींची आमटी किंवा चणा डाळ घालून केलेल्या भाज्या हा सुद्धा प्रथिनं मिळवण्याचा चांगला पर्याय आहे. ✻ चणे आणि शेंगदाण्यामधूनही प्रथिनांची गरज भागवली जाते.

### फॅशन पॅशन

मुलांच्या ॲक्सेसरीजची संख्या मर्यादित आहे. त्यामुळे योग्य ॲक्सेसरी निवडताना बराच गोंधळ होतो. मण्यांचं ब्रेसलेट, वोव्हन बेल्ट अशा ॲक्सेसरीज ठेवा बाजूला आणि या नव्या ॲक्सेसरींनी तुमचा लूक खुलवा.

✻ दोस्तांनो, सूटसोबत जुने पॉकेट स्क्वेअर्स अजिबात कॅरी करू नका. सूटला चार चांद लावण्यासाठी सिल्व्हर कफलिंक्स तुमच्याकडे असायला हवेत. हे कफलिंक्स जवळपास प्रत्येक रंगाच्या शर्टवर उठून दिसतात. त्यामुळे छानसे सिल्व्हर कफलिंक्स नक्की विकत घ्या. **(क्रमशः)**

करिअरवाटा

## शिक्षण घ्या फलोद्यान शास्त्राचं

फळझाडं आणि फूलझाडांची लागवड करणं, त्यांची योग्य निगा राखणं, फळा-फुलांची वेळच्या वेळी काढणी करणं, योग्य साठवणूक करणं तसंच योग्य पॅकिंग करून विक्रीस पाठवणं ही संपूर्ण प्रक्रिया अभ्यासण्याजोगी असते. या संदर्भात व्यवस्थित शिक्षण घेतल्यास फायदेशीर व्यवसाय उभा राहू शकतो. देशातील जमिनीची उत्पादकता पूर्णपणे वापरली जावी यासाठी फलोद्यान शास्त्राचं ज्ञान असणारे लोक या व्यवसायात उतरणं गरजेचं आहे. वास्तविक आपल्या देशात फळं आणि भाज्यांच्या उत्पादनाची क्षमता प्रचंड आहे. त्यादृष्टीने फलोद्यान शास्त्राच्या अभ्यासक्रमाला भरपूर वाव आहे. हेच प्रशिक्षित विद्यार्थी वैयक्तिक किंवा सार्वजनिक बागा फुलवतात. फळे, फुले, भाज्या आणि शोभिवंत झाडांची लागवड करतात. अनेक कंपन्या, कारखाने, शाळा, महाविद्यालये परिसरात बागा लावतात. त्यांच्या देखभालीसाठी तज्ज्ञ माणूसच हवा असतो. अशा अनेक ठिकाणी या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींना बियांचं संकलन, झाडांची लागवड, त्यांची निगा, सजावट, झाडांवरील कीड आणि रोगांबाबत करावयाच्या उपाययोजना आदींवर काम करावं लागतं. म्हणूनच यासंदर्भातील अभ्यासक्रम पूर्ण करुन चांगल्या व्यवसायाची उभारणी करणं सहजशक्य आहे.



खेचाखेची

## सगळेच खुश

तीन मोठे राजकिय नेते दिल्लीला एकाच विमानात बसतात. विमान उडाल्यावर सत्ताधारी पक्षाचा नेता म्हणतो, मी शंभर रुपयाची नोट खाली फेकली तर ज्याला सापडेल तो खुश होईल. विरोधी पक्षाचा नेता म्हणतो, दहा हजार फेका. जास्त लोक खुश होतील. तिसऱ्या पक्षाचा नेता म्हणतो, तुम्हीच विमानातून उडी मारा. अजून जास्त लोक खुश होतील. मागे बसलेला एक प्रवासी म्हणतो, तुम्ही सर्वच उडी टाका, संपूर्ण भारत खुश होईल.

### वेगळं काही

चीनमधल्या शांघायमध्ये 'अल्ट्राव्हायोलेट' नावाची एक इमारत आहे. इथल्या एका रेस्टॉरंटमध्ये दर संध्याकाळी खास स्वयंपाक केला जातो. तिथे जाण्यासाठी चार महिने आधी बुकिंग करावं लागतं. रेस्टॉरंटमध्ये येणाऱ्या लोकांना विशिष्ट ठिकाणी बोलावलं जातं. मग तिथून त्यांना गुप्त पद्धतीने रेस्टॉरंटमध्ये नेतात.

दुबईमधील 'चिलआउट आईस लाउंज' या रेस्टॉरंटमध्ये चहूबाजूला फक्त बर्फच दिसतो. इथलं फर्निचरही बर्फाचंच आहे. अंतर्गत सजावटीसाठी बर्फाचाच वापर करण्यात आला आहे. खुर्चीवर ॲक्रेलिक पॅड्स बसवण्यात आले आहेत. थंडी वाजली तर ग्राहकांना जॅकेट्स उपलब्ध करून दिली जातात.

सौंदर्यसाधना

## विमानातली सौंदर्यसाधना



विमान प्रवास बराच दूरचा असेल तर शारीरिक ताण येतो त्याचप्रमाणे त्वचा टवटवीत कशी ठेवावी हा प्रश्नही उपस्थित होतो. ही समस्या टाळण्यासाठी कामी येतील अशा काही टिप्स...

✻ प्रवासाला निघताना मेक अप केला असला तरी कालांतराने उतरवावा. चेहऱ्यावर मेक अप ठेवून विमानात विश्रांती घेणं योग्य नाही. जास्त काळ मेक अप चेहऱ्यावर राहिल्याने त्वचेचं नुकसान होण्याची शक्यता असते. त्यामुळे हायड्रेटिंग क्लिंजिंग मिल्कने मेक अप उतरवावा. ✻ विमानासारख्या बंद ठिकाणी त्वचेला पुरेसा ऑक्सिजन मिळतोच असं नाही. त्यामुळे हायड्रेटिंग मिस्टचा स्प्रे चेहऱ्यावर फवारावा. यामुळे त्वचा रिफ्रेश होईल. ✻ अधिक कालावधीच्या विमान प्रवासात चेहऱ्यावर फेस मास्क लावू शकता. त्यामुळे एरवी या प्रक्रियांना द्यावा लागणारा वेळ वाचेल. ✻ अधिक कालवधीच्या प्रवासात पुरेशी झोप मिळाली नाही तर डोळ्याखाली काळी वर्तुळं निर्माण होण्याचा संभव असतो. अनेकांचे डोळे सुजतात. त्यामुळे प्रवासात अंडर आय मास्कचा उपयोग करावा. ✻ मोठ्या प्रवासादरम्यान सिरमचा वापरदेखील लाभदायक ठरू शकतो. यामुळे त्वचा मऊ होते आणि टवटवीत दिसते.

## सुडोकू ११७


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | | | | | ९ | | | |
| ९ | ५ | | | | १ | ६ | | |
| | | | | | ८ | ९ | | ५ |
| १ | | | ९ | ५ | २ | ७ | | ३ |
| | | | | ६ | | | | |
| ६ | | ७ | ८ | १ | ३ | | | ४ |
| ३ | | २ | १ | | | | | |
| | | ९ | २ | | | | ४ | ६ |
| | | | ७ | | | | | ८ |

**टीप -**
✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ११६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | ८ | ६ | २ | १ | ४ | ५ | ९ | ७ |
| २ | ४ | ५ | ९ | ३ | ७ | ८ | १ | ६ |
| १ | ७ | ९ | ८ | ६ | ५ | ३ | २ | ४ |
| ५ | ६ | १ | ७ | ९ | ८ | २ | ४ | ३ |
| ९ | ३ | ४ | १ | २ | ६ | ७ | ५ | ८ |
| ८ | २ | ७ | ४ | ५ | ३ | ९ | ६ | १ |
| ७ | ५ | २ | ६ | ८ | १ | ४ | ३ | ९ |
| ४ | १ | ३ | ५ | ७ | ९ | ६ | ८ | २ |
| ६ | ९ | ८ | ३ | ४ | २ | १ | ७ | ५ |

## शब्दकोडे क्रमांक ११७



**आडवे शब्द :-**
१) भांडण, दुही
५) मेंढपाळ
८) नवऱ्याची दुसरी पत्नी
१०) धनुष्यबाण
१२) लष्करातील एक हुद्दा
१४) किराणा व्यापारी
१६) कडक व चिवट झालेला पदार्थ
१७) गेरू
१८) धोबी
१९) चांगली वागणूक
२१) कामदेवाचे एक आयुध
२३) पळून गेलेला
२४) श्रीकृष्णाचे एक नाव,भ्रमर
२६) ऐकण्याचा अवयव
२७) शेवट,नाश
२८) पदार्थाचा सूक्ष्म भाग
२९) तरतूद
३१) प्रचंड
३२) बोभाटा
३६) होडी
३७) अरण्य
३८) उपवासाचे तांदूळ
३९) एक पांढरे बिनावासाचे फूल
४०) नूतन
४३) गबाळ
४४) आपुलकी
४५) एक मराठी संत
४७) खालती च्या विरुद्ध
४८) गुरांच्या पुढे रात्री टाकलेली वैरण
५१) नाटक
५२) नियमित यात्रेला जाणारा
५३) माझा
५४) प्रामाणिक
५५) नापसंती दर्शविण्याची एक क्रिया
५९) माळ, सर
६०) हेळसांड,दुर्लक्ष
६१) धमकी,धाप
६३) किंमत
६४) ढीग
६५) यमासारखा क्रूर
६७) धूर्त,लबाड
६९) सहाय्यक
७१) विटी कोलण्याचा बारीक खड्डा
७२) उपहास,चेष्टा
७५) दुष्ट
७६) घोड्यावरुन मारलेली चक्कर
७७) बाहेर घालविणे.
७९) तपासनीस
८१) टरफल
८२) तफावत,फरक
८३) जनतेने ठेवलेले जयललितांचे नाव,आई ८४) शहाणा,सुंदर
८५) खवा

**उभे शब्द :-**
१) कौशल्य
२) नगरपाल
३) मृत्तिका
४) चुका करत करत
५) द्रव्य, पैसा
६) हत्तीचे तोंड असलेला गणपती
७) माधवराव पेशवेंच्या पत्नीचे नाव
८) जळाऊ लाकूड
९) पोत्याचे कापड
११) गव्हाचे जाडसर पीठ
१२) नारळाचे झाड
१५) बैलाच्या शिंगाना बांधलेला दोर
१७) दिवसभराचे एकूण काम
२०) रमविणारा,पती
२२) माळी
२३) फसविले जाणे
२५) चांदी
२७) गोंधळ, गैरव्यवस्था
२८) केव्हा (ग्रा.)
३०) लढताना आलेला मृत्यू
३१) अपकर्ष, खाली खाली जाणे
३१) अवस्था,स्थिती
३३) तमाशा
३४) उष्ण
३५) काव्य करणारा
४०) साहित्यातील नऊ भावना
४१) वधू,पत्नी
४३) आश्रय
४४) निर्बंध, मर्यादा
४६) देऊळ
४९) राहणे,वस्ती करणे
५०) तल्लीन,तादाम्य
५१) नष्ट,पराभूत
५३) सम्राट
५४) समुद्र किनारा
५६) सरोज
५७) दात
५८) वाघ-सिंहाची गर्जना
६१) दु:ख,वेदना (हिं.)
६२) हाताचा एक अवयव
६५) व्यायाम
६६) आजच्या आधीचा दिवस
६८) भाकरीचे एक धान्य
७०) येऊन पोहोचलेले,ज्ञात
७२) बंगाली भाषेत रुपाया
७३) वाईट इच्छा
७४) अर्धांगवायू
७७) कांडे, खळ्यात मळणीसाठी कणसे पसरणे
७८) अर्धा
७९) पंख
८०) माफ

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



## निवडक

### वैभव सूर्यवंशीशी पंगा घेणं पडलं महागात

**नवी दिल्ली :** भारत अ आणि श्रीलंका अ यांच्यातील सामन्यादरम्यान, वैभव सूर्यवंशी आणि विशन हालंबागे यांच्यात जोरदार वाद आणि झटापट झाली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत, सामनाधिकारी प्रदीप जयप्रकाश यांनी श्रीलंकन खेळाडू विशन याला दंड ठोठावला आहे. मात्र, भारतीय खेळाडू वैभव सूर्यवंशी याच्यावर कोणतीही कारवाई किंवा बंदी घालण्यात आली आहे की नाही, याबाबतची माहिती अद्याप समोर आलेली नाही. श्रीलंकेचा अष्टपैलू खेळाडू विशेन हलांबागे याला सामना पंचांनी दंड ठोठावला आहे. तिरंगी मालिकेतील सामन्यादरम्यान २१ वर्षीय हलांबागे आणि वैभव सूर्यवंशी यांच्यात वाद झाला; यावेळी त्यांच्यात धक्काबुक्कीही झाली. मिळालेल्या माहितीनुसार, सामना सुरू होण्यापूर्वीच हलांबागे सूर्यवंशीवर टीका करत होता आणि त्याने या १५ वर्षीय खेळाडूवर वैयक्तिक स्वरूपाची टिप्पणीही केली होती. सामना संपल्यानंतरही त्याने सूर्यवंशीला काहीतरी म्हटल्यामुळे परिस्थिती अधिकच चिघळली. हा खेळाडू वैभव सूर्यवंशीच्या अगदी जवळ गेला आणि त्यानंतर सूर्यवंशीने त्याला धक्का दिला. या संपूर्ण घटनेत तो श्रीलंकन खेळाडू दोषी आढळला आहे. भारत अ विरुद्ध खेळणाऱ्या श्रीलंकेचा अनुभवी यष्टिरक्षक निरोशन डिकवेला याच्यावरही सामना पंचांनी दंड ठोठावला आहे. डिकवेला एका वेगळ्या घटनेत दोषी आढळला; वैभव सूर्यवंशी याच्याशी झालेल्या वादासाठी त्याला जबाबदार धरण्यात आलं नाही. विशेष म्हणजे, विशन हलांबागे आणि वैभव सूर्यवंशी यांच्यातील तणाव निवळण्यासाठी डिकवेलानेच मध्यस्थी केली होती. वैभव सूर्यवंशीवर काही कारवाई करण्यात आली आहे की नाही, हे अद्याप स्पष्ट झालेलं नाही. सूर्यवंशीने श्रीलंकेच्या एका खेळाडूला धक्काही दिला होता आणि या १५ वर्षीय खेळाडूवर कारवाई होऊ शकते अशी चर्चा होती; मात्र, तसं काही घडलेलं नाही. सूर्यवंशीशी संबंधित वादाच्या या प्रकरणावर बीसीसीआयनेही आपली प्रतिक्रिया दिली आहे. बीसीसीआयचे सचिव देवजित सैकिया यांनी भारतीय खेळाडूंना अनावश्यक गोष्टींवर लक्ष न देता मालिकेवर लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला दिला आहे.

### सिराज, तिलक आणि रायडू अडचणीत

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघातील स्टार खेळाडू मोहम्मद सिराज , तिलक वर्मा आणि माजी क्रिकेटपटू अंबाती रायुडू एका मोठ्या अडचणीत सापडले आहेत. टीजी २० लीगची नोंदणी झालेली नसतानाही मोहम्मद सिराज , तिलक वर्मा आणि अंबाती रायडूने त्याची जाहिरात केली. यानंतर तेलंगणा क्रिकेट असोसिएशनने तिघांनाही




कायदेशीर नोटीस पाठवली आहे. तेलंगणा क्रिकेट असोसिएशनकडे तेलंगणा टीजी २० लीगची नोंदणी झालेली नाही. मात्र, तरीही या भारतीय क्रिकेटपटूंनी या लीगची जाहिरात आणि प्रमोशन केले. बीसीसीआयकडूनही या खेळाडूंना अशा प्रकारच्या कोणत्याही जाहिरातीसाठी परवानगी मिळाली नव्हती. बीसीसीआयच्या नियमांनुसार, त्यांच्या परवानगीशिवाय कोणत्याही क्रिकेट लीगचे आयोजन करणे किंवा त्याचे प्रमोशन करणे हा नियमांचा भंग मानला जातो. या प्रकरणात केवळ क्रिकेटपटूच नाही, तर कलाकारही अडकले आहेत. सुपरस्टार विजय देवरकोंडा आणि व्यंकटेश यांनीही या लीगचे प्रमोशन केले. त्यामुळे तेलंगणा क्रिकेट असोसिएशनने या दोन्ही अभिनेत्यांनाही नोटीस पाठवली आहे. तेलंगणा क्रिकेट असोसिएशनने आपल्या नोटीसमध्ये हैदराबाद क्रिकेट असोसिएशनच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

### सचिन तेंडुलकरचा महारेकॉर्ड धोक्यात

**नवी दिल्ली :** मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर यांचा महारेकॉर्ड मोडण्यापासून इंग्लंडचा स्टार फलंदाज आणि कर्णधार जो रूट फक्त काही धावा दूर आहे. कसोटी क्रिकेटमध्ये १४ हजार धावांचा टप्पा गाठण्यासाठी रूटला केवळ ४८ धावांची आवश्यकता आहे. हा टप्पा गाठताच तो कसोटी इतिहासातील सर्वात वेगाने १४ हजार धावा पूर्ण करणारा फलंदाज ठरेल. सध्या रूटच्या नावावर १६४ कसोटी सामन्यात १३ हजार ९५२ धावा आहेत. त्यामुळे तो आपल्या १६५व्या कसोटीतच १४ हजारांचा टप्पा गाठू शकतो. तर, सचिन तेंडुलकरने १७१ कसोटी



सामन्यात १४ हजार धावा पूर्ण केल्या. रूटने हा टप्पा गाठल्यास सचिनचा अनेक वर्षांपासून कायम असलेला विक्रम मोडला जाईल.कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम सचिन तेंडुलकरच्या नावावर अबाधित आहे. सचिन तेंडुलकरने आपल्या कसोटी कारकिर्दीत एकूण १५ हजार ९५१ धावा केल्या आहेत. त्यानंतर या यादीत जो रूट १३ हजार ९५३ धावांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर ऑस्ट्रेलियाचा रिकी पॉटिंग (१३ हजार ३७८ धावा), जॅक कॅलिश (१३ हजार २८९ धावा) आणि राहुल द्रविड (१३ हजार २८८ धावा) अनुक्रमे तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर आहे. न्यूझीलंडविरुद्धही विक्रमाची संधीरूटसमोर आणखी एक मोठा विक्रम खुणावत आहे. कसोटी क्रिकेटमध्ये न्यूझीलंडविरुद्ध २००० धावा करणारा जगातील पहिला फलंदाज बनण्याची संधी त्याच्याकडे आहे. २०१२ मध्ये कसोटी पदार्पण केलेल्या रूटने न्यूझीलंडविरुद्ध २२ कसोटींमध्ये १ हजार ९३४ धावा केल्या आहेत.

### आयपीएल २०२७ स्पर्धेचा प्लान ठरला!

**नवी दिल्ली :** आयपीएल २०२७ स्पर्धेसाठी बीसीसीआयने आतापासूनच जोर बैठका सुरू केल्या आहे. आयपीएलच्या २०व्या पर्वाची सुरूवात लवकर होण्याची शक्यता आहे. बीसीसीआयने यासाठी एक साधारण प्लान आखल्याची चर्चा सुरू आहे. आयपीएल २०२७ स्पर्धा मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा लवकर सुरू होण्याची शक्यता आहे. ही स्पर्धा १० मार्च ते १५ मे दरम्यान करण्यासाठी बीसीसीआयने पावलं उचलली आहेत. सध्याची हवामानाची स्थिती पाहून बीसीसीआयने हा निर्णय घेणार असल्याचं बोललं जात आहे. बीसीसीआयच्या मते, खेळाडूंना तळपतं ऊन आणि असह्य उकाड्यापासून दिलासा मिळणार आहे. दुसरीकडे, आयपीएल सामन्यांची संख्या वाढण्याची शक्यता नाहीत. पुढच्या पर्वातही यंदासारखेच सामने होणार आहेत. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी आयपीएल २०२७ स्पर्धेबाबत पीटीआयशी बोलताना माहिती दिली. आयपीएल २०२७ स्पर्धेत सामन्यांची संख्या वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पण या चर्चांना आता पूर्णविराम लागला आहे. देवजीत सैकिया यांनी पीटीआयशी बोलताना सांगितलं की, बीसीसीआयचा असा कोणताही प्लान सध्यातरी नाही. पुढच्या पर्वात ७४ सामने खेळले जातील. यापूर्वी २० पर्वात ९४ सामने खेळले जातील अशी चर्चा होती. पण देवजीत सैकिया यांनी या चर्चांना पूर्णविराम दिला आहे.

# युद्धसमाप्तीनंतरही विश्वचषक लढतीत तणाव

**। लॉस एंजलिस । वृत्तसंस्था ।**




अमेरिका-इस्रायल विरुद्ध इराण संघर्ष अधिकृतपणे थांबला असला, तरी विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील इराणचा सहभाग असलेल्या सामन्यात मोठा तणाव कायम राहिला. फिफाने नाकारलेली विनंती, देशांतर्गत राजकीय विरोध अशा प्रतिकूल परिस्थितीतही इराणचा संघ विश्वचषकात खेळण्यासाठी उतरला आणि आपल्या मोहिमेची सुरुवात कमालीच्या जिद्दीने केली. सोमवारी रात्री झालेल्या अटीतटीच्या सामन्यात दोनदा पिछाडीवरून पुनरागमन करताना इराणने न्यूझीलंडला २-२ असे बरोबरीवर रोखले. सामन्यापूर्वी अनिवासी इराणी चाहत्यांनी निदर्शने करत देशातील सरकारला विरोधही दर्शवला.

इराणकडून रामिन रेझायान याने स्वत: एक गोल (३२व्या मिनिटाला) केला आणि मोहेब्बीच्या गोलसाठी (६४व्या मि.) सुंदर पास (असिस्ट) दिला. २८ फेब्रुवारी रोजी अमेरिका आणि इस्रायलने इराणविरुद्ध युद्ध सुरू केल्यापासून इराणी संघाचा विश्वचषक प्रवास प्रचंड उलथापालथीचा ठरला आहे. इराणची तिन्ही साखळी सामने अमेरिकेबाहेर हलवण्याची विनंती फिफाने फेटाळली. यानंतरही इराणने स्पर्धेत खेळण्याचा निर्णय घेतला. लॉस एंजलिस येथे झालेल्या सामन्यात इराणला चाहत्यांचा मोठा पाठिंबा मिळाला. न्यूझीलंडसाठी दोन्ही गोल एलाया जस्टने केले.

रेझायानचे वक्तव्य, मोहेब्बीच्या कृतीने वाद युद्धाच्या पार्श्वभूमीवर या सामन्याला खेळातील कौशल्यपेक्षा राजकीय वलयच अधिक होते.त्याचे पडसाद सामन्यात आणि सामन्यानंतरही पाहायला मिळाले. बरोबरी साधणारा दुसरा गोल केल्यावर इराणच्या मोहम्मद मोहेब्बी याने दोन बोटे हवेत उंचावून बंदुकीतून गोळी झाडल्यासारखा इशारा करत जल्लोष केला. त्याच्या या कृतीने वाद निर्माण झाला.त्याच वेळी अनिवासी इराणी चाहत्यांच्या राष्ट्रगीताला विरोध करण्याच्या कृतीविषयी सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत रेझायानने दिलेले उत्तरही असेच वादग्रस्त ठरत आहे. हा आमचा वैयक्तिक विषय असून आम्ही तो सोडवू, तुम्ही काळजी करू नका, असे उत्तर त्याने पत्रकारांना दिले.

#### प्रेक्षकांचा मोठा पाठिंबा

टीम मेल्ली या टोपण नावाने ओळखल्या जाणाऱ्या इराण संघाने तणावग्रस्त पार्श्वभूमीवर विश्वचषक मोहिमेची सुरुवात लॉस एंजलिस जवळील सोफाय स्टेडियमवर शानदार बरोबरीने केली. या भागात इराणी लोकांची जगभरातील (मायदेश वगळता) सर्वांत मोठी लोकसंख्या आहे. त्यामुळे मैदानात इराणला पाठिंबा देणारा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्याच वेळी स्टेडियमबाहेर शेकडो इराणी-अमेरिकन नागरिक सरकारचा निषेध करत होते, तर अनिवासी इराणी चाहत्यांनी राष्ट्रगीतादरम्यान मैदानाकडे पाठ फिरवून आपला निषेध नोंदवला. मात्र, सामना सुरू होताच हा सर्व विरोध, निषेध मावळला आणि जवळपास सर्वच चाहत्यांनी इराणी खेळाडूंना मनापासून पाठिंबा दिला.

#### ऑल व्हाइट्स अपयशी

क्रिकेटमध्ये न्यूझीलंड संघ ब्लॅक कॅप्स नावाने परिचित आहे. फुटबॉलमध्ये मात्र ऑल व्हाइट् नावाने ओळखल्या जाणाऱ्या न्यूझीलंडने सामन्यात दोन वेळा आघाडी घेतली. मात्र, इराणने दोन्ही वेळा चोख प्रत्युत्तर दिल्यामुळे न्यूझीलंड संघ विश्वचषक इतिहासातील पहिला विजय मिळवण्यापासून वंचित राहिला. यानंतरही न्यूझीलंडने आपल्या गेल्या दोन विश्वचषक मोहिमांमधील एकूण गोलसंख्येची बरोबरी केली.एलाया जस्टने सातव्या आणि उत्तरार्धात सामन्याच्या ५४व्या मिनिटाला गोल करत न्यूझीलंडला आघाडीवर नेले होते. दोन्ही वेळा संघातील सर्वांत अनुभवी खेळाडू आणि कर्णधार ख्रिस वूडने त्याला निर्णायक पास दिला. मात्र, उंचपुऱ्या जिद्दी इराणी खेळाडूंनी सामन्यात बरोबरी साधण्यात यश मिळवले. त्यांचे दोन्ही गोलमधील अंतर ३२ मिनिटांचे होते. पूर्वार्धात ३२व्या मिनिटाला रेझायान याने आपल्या बूटच्या बाहेरील बाजूने चेंडू टोलावत अप्रतिम गोल केला. तर दुसरा गोल ३२ मिनिटांनी म्हणजे ६४व्या मिनिटाला झाला. यावेळी रेझायान याने दिलेल्या अचूक पासवर मोहेब्बीने उत्कृष्ट हेडर करत गोल केला.

### मंधानाचा टी-२० मध्ये ६०० चौकारांचा विक्रम

**लीड्स :** भारताने महिला टी-२० विश्वचषकात नेदरलँड्सचा ९५ धावांनी पराभव केला. लीड्समध्ये स्मृती मंधानाने ७४ धावांच्या खेळीत अनेक विक्रम आपल्या नावावर केले. ती पुरुष आणि महिला टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ६०० चौकार पूर्ण करणारी पहिली फलंदाज ठरली. बुधवारी मंधानाने



मिताली राज आाणि हरमनप्रीत कौरला मागे टाकले. तिने स्पर्धेत भारतासाठी सर्वाधिक अर्धशतके करण्याचा विक्रमही आपल्या नावावर केला. दुसरीकडे, दीप्ती शर्माने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये झूलन गोस्वामीच्या सर्वाधिक विकेट्सच्या विक्रमाशी बरोबरी केली. मंधानाने नेदरलँड्सविरुद्ध ११ चौकार मारले. तिच्या नावावर टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये ६०३ चौकार झाले आहेत. ती पुरुष किंवा महिला टी-२० आंतरराष्ट्रीयमध्ये ६०० चौकार पूर्ण करणारी जगातील पहिली खेळाडू ठरली आहे. न्यूझीलंडची सुझी बेट्स ५२१ चौकारांसह दुसऱ्या स्थानावर आहे.

#### फिफा विश्वचषकाची क्रेझ

## खांदा कॉलनीतील मैदानांवर फुटबॉलप्रेमींची धूम

**। पनवेल । प्रतिनिधी ।**



जगभरात सुरू असलेल्या फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेची क्रेझ सध्या खांदा कॉलनी परिसरातही पाहायला मिळत आहे. फुटबॉलप्रेमी एकही सामना चुकवू इच्छित नसताना, स्थानिक युवक मैदानावर उतरून आपल्या खेळकौशल्याची झलक दाखवत आहेत. खांदा वसाहतीतील विविध मैदानांवर दररोज फुटबॉल सामन्यांचा थरार रंगत असून युवकांचा उत्साह ओसंडून वाहत आहे.

जून महिन्याचे पंधरा दिवस उलटून गेले तरी वरुणराजाने अद्याप हजेरी लावलेली नाही. कडक उन्हाची तमा न बाळगता खेळाडू मैदानावर घाम गाळत सराव आणि सामने खेळत आहेत. फुटबॉल हा केवळ खेळ नसून शिस्त, संघभावना आणि जिद्दीचे प्रतीक असल्याचे या युवकांच्या खेळातून दिसत आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर लिओनेल मेसी, ख्रिस्तियानो रोनाल्डो यांसारखे दिग्गज खेळाडू आपल्या देशासाठी सर्वोच्च मानाचा चषक जिंकण्यासाठी सर्वोत्तम कामगिरी करत असताना, त्यांच्यापासून प्रेरणा घेत खांदा कॉलनीतील युवा खेळाडूही मोठी स्वप्ने पाहत आहेत.

## लखनौ येथे तायक्वांदो पंच सेमिनार संपन्न

**। उरण । प्रतिनिधी ।**



तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडिया व उत्तर प्रदेश तायक्वांदो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न श्री अटल बिहारी वाजपेयी क्रीडा संकुल, के. डी. सिंह बाबू स्टेडियम, लखनौ (उत्तर प्रदेश) येथे दि. १२ ते १४ जून २०२६ दरम्यान राष्ट्रीय पंच सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या सेमिनारसाठी आंतरराष्ट्रीय प्रथम श्रेणीचे रेफरी व ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट सुभाष पाटील हे प्रमुख प्रशिक्षक म्हणून उपस्थित होते. या सेमिनारसाठी देशभरातील २०० हून अधिक तायक्वांदो खेळाडू व पंचांनी सहभाग नोंदविला.

२०२६ साली वर्ल्ड तायक्वांदोने लागू केलेल्या नवीन नियमांचा अभ्यास सुभाष पाटील यांनी इस्वातिनी (दक्षिण आफ्रिका) येथे जाऊन प्रत्यक्ष प्रशिक्षणाद्वारे केला असून, भारतात त्या नियमांचा प्रसार व प्रचार करण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. या नव्या नियमांवरील हे त्यांचे पाचवे राष्ट्रीय सेमिनार होते. तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियामध्ये या नियमांचा सखोल अभ्यास करणारे ते एकमेव आंतरराष्ट्रीय पंच आहेत.

उत्तर प्रदेश तायक्वांदो असोसिएशनचे महासचिव राजकुमार यांनी सांगितले की, आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्यांनी विविध देशांमध्ये जाऊन तायक्वांदो विषयक सेमिनार घेतले असून, ते प्रथम श्रेणीचे आंतरराष्ट्रीय पंच आहेत. राजकुमार पुढे म्हणाले की, तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियामध्ये सुभाष पाटील अतिशय प्रभावीपणे कार्य करत आहेत. स्वतः सातत्याने उपस्थित राहून ते भारतीय खेळाडू व पंचांना नवीन नियमांची माहिती देतात, ज्याचा देशातील तायक्वांदो क्षेत्राला मोठा लाभ होत आहे. त्यांनी उत्तर प्रदेशातील पंचांना उत्कृष्ट प्रशिक्षण देत विविध देशांतील अनुभवही सांगितले, त्यामुळे सहभागी पंचांना नियमांचे सखोल ज्ञान प्राप्त झाले.

या उल्लेखनीय योगदानाबद्दल उत्तर प्रदेश तायक्वांदो असोसिएशनतर्फे सुभाष पाटील यांचा विशेष सत्कार करण्यात आला. त्यांना अयोध्या धाम येथील श्री भगवान रामलल्ला यांची पवित्र मूर्ती भेट देऊन गौरविण्यात आले.

## भारताने केला नेदरलँड्सचा ९५ धावांनी पराभव

**लॉर्डस् :** आयसीसी वुमन्स टी २० वर्ल्ड कपे स्पर्धेत टीम इंडियाने विजयी घोडदौड यशस्वीरित्या कायम राखली आहे. टीम इंडियाने हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वात सलग आणि एकूण दुसरा विजय मिळवला आहे. टीम इंडियाने पाकिस्ताननंतर आता नेदरलँड्सवर मात केली आहे. भारतीय महिला संघाने नेदरलँड्सचा ९५ धावांनी धुव्वा उडवला आहे.शफाली वर्मा आणि स्मृती मंधाना या दोघींनी केलेल्या अर्धशतकाच्या जोरावर नेदरलँड्ससमोर २१० धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र भारतीय गोलंदाजांसमोर नेदरलँड्सला संपूर्ण २० ओव्हरही खेळता आलं नाही. भारताने नेदरलँड्सला १७.३ ओव्हरमध्ये ११४ धावांवर गुंडाळलं.

## मोहम्मद अझरुद्दीनचा बीसीसीआयला सवाल

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय एकदिवसीय संघाचा कर्णधार शुभमन गिल हा सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहे. एवढी शानदार कामगिरी करूनही आगामी टी-२० मालिकेसाठी त्याची निवड न झाल्याने बीसीसीआयवर टीका होत आहे. अनेक माजी खेळाडू आणि चाहत्यांनी या निर्णयावर प्रश्न उपस्थित केले आहेत.दरम्यान, भारताचा माजी कर्णधार मोहम्मद अझरुद्दीननेही या मुद्द्यावर मोठे वक्तव्य केले आहे. त्याने शुभमन गिलला टी-२० संघातून वगळल्याबद्दल आश्चर्य व्यक्त केले आहे. त्याचबरोबर सरफराज खान आणि औकिब नबी यांना कसोटी संघात संधी न मिळाल्याबद्दलही त्याने नाराजी व्यक्त केली आहे.

अझरुद्दीनच्या मते, शुभमन गिलने भारताच्या कसोटी आणि एकदिवसीय संघाचे नेतृत्व चांगल्या प्रकारे केले आहे. त्याच्या फलंदाजीतही मोठी सुधारणा झाली असून त्याला कोणत्याही फॉर्मॅटमधून बाहेर ठेवायला नको होते, असे त्याने पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे. मोहम्मद अझरुद्दीन म्हणाला, शुभमन गिल खूप चांगले नेतृत्व करत आहे. त्याची फलंदाजीही दिवसेंदिवस अधिक चांगली होत आहे. तो भारतातील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक आहे. मग त्याची टी-२० संघासाठी निवड का होत नाही, हे मला समजत नाही. तो तिन्ही फॉर्मॅटमध्ये खेळण्यास सक्षम आहे , असे मोहम्मद अझरुद्दीन म्हणाला.

## भारताचा १७० धावांनी विजय

#### शुबमन गिल १५४, इशान किशनने १२५

**। एकाना । वृत्तसंस्था।**




मालिकेतील दुसरा सामना लखनौच्या एकाना स्टेडियममध्ये पार पडला. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना शुबमन गिलने १५४, तर इशान किशनने १२५ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने ४०२ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करताना अफगाणिस्तानचा डाव अवघ्या २३२ धावांवर आटोपला. भारतीय संघाने हा सामना १७० धावांनी जिंकून मोठ्या विजयाची नोंद केली आहे. यासह या मालिकेत २-० ने विजयी आघाडी घेतली आहे.

प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या भारतीय संघाला सुरुवातीलाच मोठा धक्का बसला. सलामीला आलेला यशस्वी जैस्वाल अवघ्या ४ धावांवर माघारी परतला. त्यानंतर रोहित शर्मा अणि शुबमन गिलने मिळून संघाचा डाव सावरला. दोघांनी महत्वपूर्ण भागीदारी केली. रोहित ४८ धावांवर बाद झाला. त्यानंतर शुबमन गिल आणि इशान किशनने मिळून मिळून २०० हून अधिक धावांची भागीदारी केली. गिलने १५४ तर इशान किशनने १२५ धावांची खेळी केली. तर श्रेयस अय्यरने २६ धावा केल्या. वॉशिंग्टन सुंदरने १९ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर भारतीय संघाने ४०२ धावांपर्यंत मजल मारली.

अफगाणिस्तानला हा सामना जिंकण्यासाठी ४०३ धावांचा डोंगर सर करायचा होता. रहमानुल्लाह गुरबाजने ४१ धावांची सलामी दिली. तर इब्राहिम जादराानने २१ धावा केल्या. त्यानंतर सेदिकुल्लाह अटलने ४२ धावांची खेळी केली. अफगाणिस्तानकडून रहमत शाहने सर्वाधिक ७९ धावांची खेळी केली. पण अफगाणिस्तानचा डाव २३२ धावांवर आटोपला.

भारतीय संघाकडून अर्शदीप सिंगने ४५ धावा खर्च करुन ३ गडी बाद केले. तर गुरनूर ब्रारने ६० धावा खर्च करुन ३ गडी बाद केले. आपला पहिलाच सामना खेळत असलेल्या प्रिन्स यादवने ५६ धावा खर्च करुन २ गडी बाद केले. तर वॉशिंग्टन सुंदरने १ गडी बाद केला. भारतीय संघाने हा सामना १७० धावांनी जिंकून मालिकेत २-० ने विजयी आघाडी घेतली आहे.

#### भारत महिला संघ गुणतालिकेत टॉपर | इंग्लंड ४ गुणांसह अव्वल स्थानी

## पाकिस्तानवर स्पर्धेतून बाहेर फेकले जाण्याचे संकट

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**




भारतीय संघाने पहिल्याच सामन्या दिलेल्या दणक्यानंतर पाकिस्तान महिला संघाला सावरणे अवघड झाले आहे. ट्वेंटी-२० वर्ल्ड कप स्पर्धेत त्यांना बुधवारी दक्षिण आफ्रिकेकडून पराभव पत्करावा लागला.

या पराभवामुळे त्यांचे उपांत्य फेरीत पोहोचणे अशक्य झाले आहे. तेच हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली खेळणारा भारतीय संघ बलाढ्य ऑस्ट्रेलियाला नेट रन रेटच्या जोरावर मागे टाकून गुणतालिकेत टॉपर झाला आहे.

पाकिस्तानला दुसऱ्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना ९ बाद १२६ धावा करता आल्या. ८ फलंदाज ५० धावांवर माघारी परतल्यानंतर पाकिस्तानचा डाव कर्णधार फातिमा सना व तुबा हसन यांनी सावरला. पाकिस्तानचे चार फलंदाज रन आऊट होऊन माघारी परतल्या. मॅरिझाने कॅपने सुरुवातीलाच धक्के देताना पाकिस्तानच्या पहिल्या तीन खेळाडूंना स्वस्तात माघारी पाठवले. तिने ४-०-२३-३ अशी स्पेल संपवली. त्यानंतर गोंधळलेले पाकिस्तानी धावा घेण्याच्या नादात स्वतःच्या विकेट्स फेकताना दिसले.

लक्ष्याचा पाठलाग करताना आफ्रिकेने १६.५ षटकांत ८ बाद १२७ धावा करून बाजी मारली. तुबा हसनने आफ्रिकेला सुरूवातीला धक्के दिले, त्यात फातिमा सना व सादीया इक्बाल यांनीही विकेट्स टिपल्या. पण, एनेरीए डेर्कसेन व नॅडीने डे क्लेर्क यांच्या खेळी आफ्रिकेला दोन विकेट्स व १९ चेंडू राखून विजय मिळवून दिला.

पाकिस्तान महिला संघाचा हा सलग दुसरा पराभव ठरला आणि ते ग्रुप १ मध्ये पाचव्या क्रमांकावर आहेत. त्यांचा नेट रन रेटही -२.२६३ असा खूप कमी आहे.

त्यामुळे त्यांना उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी गटातील अव्वल दोन स्थानावर पोहोचायला हवे आणि त्यासाठी त्यांना उर्वरित तिन्ही सामने जिंकावे लागणार आहेत. त्यांच्यासमोर बलाढ्य ऑस्ट्रेलियासह बांगलादेश व नेदरलँड्सचे आव्हान आहे.

सध्यातरी या गटात भारत व ऑस्ट्रेलिया हे प्रत्येकी ४ गुणांसह अव्वल दोन स्थानावर आहेत. आफ्रिका व बांगलादेश यांनी प्रत्येकी २ विजय मिळवून स्पर्धेत स्वतःला कायम ठेवले आहे. ग्रुप २ मध्ये इंग्लंड ४ गुणांसह अव्वल स्थानी आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)